सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, १९ जुलै २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २५० | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## महत्त्वाचे...

### ८ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशन

#### विधिमंडळाचे सूप वाजले

**मुंबई, दि.१८ जुलै**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस होता. काल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड व भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांत विधानभवनाच्या लॉबीत हाणामारी झाली. त्याचे तीव्र पडसाद सभागृहात उमटले.

विरोधकांनी या मुद्यावरून टीकेची झोड उठवत सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. पण सरकारने तेवढ्याच शिताफीने त्यांचा डाव उधळवून लावला. पावसाळी अधिवेशनाचा शेवटचा दिवस होता. दरम्यान, आज विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले. आता राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबर २०२५ रोजी नागपुरात भरेल. अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत, तर सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी विधानपरिषदेत ही घोषणा केली.

# सगळेच आमदार माजलेत अशी सर्वत्र चर्चा

- **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विधानसभेत संतापले**
- **विधिमंडळ परिसरातील हाणामारीची विधानसभा अध्यक्षांकडून गंभीर दखल**

**मुंबई, दि.१८ जुलै**

विधिमंडळाच्या परिसरात गुरूवारी झालेल्या हाणामारीमुळे आज ज्या शिव्या बाहेर पडत आहेत, त्या एकट्या पडळकरला नाहीत तर सगळेच आमदार माजलेत अशी चर्चा सुरु असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात संताप व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कालच्या घटनेमुळे कुणा एकाची प्रतिष्ठा गेली नाही. इथे बसलेल्या प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा मलिन झाली आहे. आज या ज्या शिव्या बाहेर पडत आहेत, त्या एकट्या पडळकरला किंवा यांच्या माणसाला पडत नाहीत. आपल्या सगळ्यांच्या नावाने याठिकाणी बोलले जाते की, हे सगळे आमदार माजले आहेत. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कालच्या घटनेवर आज विधानसभेत निवेदन केले. त्यानंतर भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी दिलगिरी व्यक्ती केली. अध्यक्षांनी केलेल्या सूचनांचे मी तंतोतंत पालन करेन. तसेच काल जी घटना घडली आहे, त्यावर मी खेद व्यक्त करतो दिलगिरी व्यक्त करतो, असे ते म्हणाले.

पडळकर यांच्यानंतर आमदार जितेंद्र आव्हाड बोलण्यास उठले. ते म्हणाले, आपण बोलत असताना नितीन देशमुख हे माझ्यासोबत आले होते. पण सभागृहात येताना मी दररोज एकटाच येतो. माझ्यासोबत मी कुणालाही आणत नाही. माझ्यामागे केवळ माझा पीए चालत असतो. त्याच्याशिवाय माझ्यासोबत कुणीही नसतो. मी कधीही कुणाला पासवर सही करत नाही. कुणाला पासही इश्यू करत नाही. त्यामुळे नितीन देशमुखला मी घेऊन आलो होतो हे रेकॉर्डवर चुकीचे जाऊ नये. ते आपल्या ताब्यात आहेत. त्यांना विचारा ते कसे आले होते? मी हे कृत्य करण्यास भाग पाडले असा कुठेही महाराष्ट्रात समज होऊ नये म्हणून मी हे स्पष्टीकरण देत आहे. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये. काल ही घटना घडली तेव्हा मी सभागृहात नव्हतो. मी परिसरातही नव्हतो. मी मरीन लाईन्समध्ये होतो. त्यामुळे या घटनेशी डायरेक्ट किंवा इनडायरेक्ट असा माझा कोणताही संबंध नाही. ही घटना घडावी म्हणून मी कुणाला उद्युक्त केले नाही. मी कुणाला खुणावलेही नाही. राहिली गोष्ट या लोकशाहीच्या मंदिराची... ही मंदिरात घडलेली घटना कुणीही घडवली असेल, कशीही घडली असेल, या इमारतीच्या दगडात लोकशाही जिवंत आहे. या मंदिरात झालेली ती अप्रिय घटना कशी घडली हे आम्ही मुख्यमंत्र्यांना सांगितले. मला यावर बोलायचे नाही. पण अध्यक्ष महोदय मी आपल्याकडे एक निवेदन केले होते. माझ्या




व्हॉट्सएपवर अत्यंत गलिच्छ भाषेत शिवीगाळ करण्यात आली. मला मारण्याची धमकी देण्यात आली. मला बोलू द्या अध्यक्ष महोदय, असे आव्हाड म्हणाले. यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी मध्येच हस्तक्षेप केला. या विषयाचे गांभीर्य या सभागृहातील सर्व सदस्यांनी घेणे आवश्यक आहे. तुम्ही इतर सर्व गोष्टी मला माझ्या दालनात येऊन सांगितल्या आहेत. त्या सर्व गोष्टींचा विचार करून सुरक्षा रक्षकांकडून अहवाल मागितला. पण आता तुम्हाला या विषयाचे राजकारण करायचे असेल तर हे योग्य नाही. मला वाटते आपल्याला सभागृहाच्या भावनेचा आदर केला पाहिजे, असे ते म्हणाले.

अध्यक्षांच्या या भूमिकेवर शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांनी जोरदार आक्षेप घेतला. जितेंद्र आव्हाड यांना धमकी आली आहे, त्यामुळे त्याचा उल्लेख करण्यास बंदी करणे हे योग्य नाही, त्यांना बोलू द्या, असे ते म्हणाले.

> जयंत पाटील यांच्या या विनंतीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चर्चेत हस्तक्षेप केला. ते म्हणाले, धमकीचा उल्लेख करण्यास कुणाचीही मनाई नाही. पण विषय काय चालला आहे? आज जो विषय अध्यक्षांनी एखादा प्रस्ताव मांडल्यानंतर आपण कधीतरी राजकारणाच्या पलिकडे जाणार आहोत की नाही? ते वेगळे मांडता येईल ना. पण अध्यक्षांनी एक विषय मांडला एक निर्देश अध्यक्षांनी मांडला, तर असे नाही होत. जयंतराव एक लक्षात घ्या. फार सिनिअर आहात आपण. ही प्रतिष्ठा काही कुण्या एका व्यक्तीची नाही. इथे बसलेल्या प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा खराब झाली आहे. आज या ज्या शिव्या बाहेर पडत आहेत, त्या एकट्या पडळकरला किंवा यांच्या माणसाला पडत नाहीत. आपल्या सगळ्यांच्या नावाने याठिकाणी बोलले जाते की, हे सगळे आमदार माजले म्हणून. त्यामुळे थोडे गांभिर्याने घ्या. प्रत्येक गोष्टीचे राजकारण करून तुम्ही महाराष्ट्राच्या जनतेला काय सांगणार आहात जयंतराव? हे बरोबर नाही. अशा प्रकारे समर्थन करणे योग्य नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.




## इस्लामपूरचे नाव ईश्वरपूर होणार

**मुंबई, दि.१८ जुलै**

राज्य सरकारने आज सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर शहराचे ईश्वरपूर असे नामांतर करण्याची घोषणा केली. सरकार यासंबंधीचा एक प्रस्ताव शिफारशीसह केंद्र सरकारला सादर करणार आहे. सरकारच्या या घोषणेमुळे इस्लामपूरच्या जनतेने आपली मागणी पूर्ण होण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले आहे.

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत इस्लामपूरचे ईश्वरपूर असे नाव करण्यासंबंधी निवेदन केले. ते म्हणाले, महाराष्ट्र विधानसभा नियम ४७ अन्वये सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर शहराचे नाव ईश्वरपूर करण्याबाबतच्या विषयावर मी निवेदन करत आहे. इस्लामपूर तालुका वाळवा जिल्हा सांगली या शहराचे नाव बदलून ईश्वरपूर करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. जनभावना लक्षात घेता इस्लामपूरचे नाव ईश्वरपूर असे करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या शिफारशीसह केंद्र सरकारला सादर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी लगबग!

## महापालिकेतील मतदान यंत्राची प्राथमिक स्तरावरील तपासणी आजपासून

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जुलै -**

सोलापूर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार महापालिकेतील उपलब्ध असलेल्या मतदान यंत्रांची मास्टर ट्रेनर कडून प्राथमिक स्तरावरील तपासणी शनिवारपासून सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांनी दिली.

राज्य निवडणूक आयुक्तांनी दि. ११ जुलै २०२५ रोजी च्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीत दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक



२०२५ अंतर्गत राज्य निवडणूक आयोगानी उपलब्ध असलेल्या मतदान यंत्रांची मास्टर ट्रेनर कडून प्राथमिक स्तरावरील तपासणी करुन घेण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार कर्मचाऱ्यांची सोलापूर महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या मतदान यंत्रांची तपासणी करण्यासाठी मास्टर ट्रेनर म्हणून १२ कर्मचारी व अधिकाऱ्यांची नियुक्ती



करण्यात आली आहे. दरम्यान, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशान्वये उपलब्ध मतदान यंत्राचा आढावा घेण्याबाबत सूचित केलेले होते. त्यानुसार महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी काही दिवसांपूर्वी कौन्सिल हॉल येथे असलेल्या ईव्हीएम गोडाऊनचा आढावा घेतला आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या नियंत्रणाखाली ही कार्यवाही करण्यात येत आहे. मतदान यंत्र तपासणी कामासाठी कौन्सिल हॉल येथील मशीन गोडाऊन शेजारी मंडप टाकण्यात आला आहे. आवश्यक ती सर्व तयारी करण्यात आली आहे. आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महापालिका आवारातील कौन्सिल हॉल येथील ईव्हीएम मशीन गोडाऊन(स्टोअर रूम) मध्ये १२१८ कंट्रोल युनिट व २२८४ बॅलेट युनिट आहेत.महापालिकेकडे उपलब्ध असलेले सर्व कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिट मास्टर ट्रेनिंग कडून तपासले जाणार आहेत. त्यातील नादुरुस्त यंत्र वेगळे केले जातील. त्यानुसार आणखी किती मशीन लागणार आहेत याचा आढावा घेतला जाणार आहे. त्याचा अहवाल निवडणूक आयोगाला सादर करण्यात येणार आहे, असे सहाय्यक नियंत्रण अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांनी सांगितले.

## महत्त्वाचे...



### महापालिकेच्यावतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १८ जुलै -**

महानगरपालिकेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथील त्यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सहाय्यक आयुक्त मनिषा मगर, माजी गटनेते आनंद चंदनशिवे, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, गटनेते आनंद चंदनशिवे, मध्यवर्ती अध्यक्ष शांतीलाल साबळे, माजी अध्यक्ष सुरेश पाटोळे,जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, सतीश बगाडे, श्रीमंत जाधव, बिपीन साबळे, प्रवीण वारे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

### लिमयेवाडी येथे साडीने गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १८ जुलै -**

अज्ञात कारणावरून एका ३५ वर्षीय तरुणाने घरातील लाकडीवाशाला साडीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना लिमये वाडी परिसरात गुरुवारी मध्यरात्री घडली. शंकर हनुमंतु गायकवाड (वय ३५ वर्ष, रा. सनद नगर ,लिमये वाडी सोलापूर )असे त्या गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. मयत तरुणाचे घरातील सदस्य परगावी गेले




होते .त्यादरम्यान त्याने राहत्या घरात गळफास घेतला असल्याचे गुरुवारी मध्यरात्री साडेअकरा वाजता शेजारच्या लोकांना आढळून आले. नातेवाईकांच्या साह्याने त्याचा गळफास सोडवून बेशुद्ध अवस्थेत येथील शासकीय रुग्णालयात सलगर वस्ती पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक एस आर चौधरी यांनी आज शुक्रवारी पहाटे पावणे एक वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### अल्पवयीन मुलीचा छळ करणाऱ्या तरूणाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १८ जुलै -**

फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन अल्पवयीन मुलीचा छळ करणाऱ्या तरुणाविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत मुलीच्या फिर्यादीवरुन प्रथमेश राजू राऊळ (रा. मराठा वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात




आला आहे. यातील पिडीता आणि प्रथमेश हे एकमेकांच्या ओळखीचे असून प्रथमेशने पिडीतेसोबत त्याच्या मोबाईलमध्ये फोटो काढलेले आहेत. त्यानंतर प्रथमेश हा पिडीतेला भेटण्यासाठी जबरदस्ती करीत होता. पिडीतेला जबरदस्तीने मोबाईल फोन देऊन त्यावर फोन करून आपण दोघे लग्न करू, तु जर माझ्यासोबत लग्न नाही केले तर मोबाईलमधील फोटो व्हायरल करतो अशी धमकी देत होता. म्हणून याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक येळे पुढील तपास करीत आहेत.

# ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

## ट्रक चालकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १८ जुलै**

मंगळवेढा शहरा जवळ बायपास रोडवर एका मोटर सायकल स्वारास समोरुन येणाऱ्या अशोक लेलँड ट्रकचालकराने अविचाराने वाहन चालवून जोराची धडक दिल्याने मोटर सायकलस्वार बिभिषण शशिकांत पाटील (वय २० रा.बठाण) याला गंभीर जखमी केल्याप्रकरणी ट्रक चालक कार्तिक के.कालियामुर्ती (तामिळनाडू) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी अविनाश पाटील (रा.बठाण) याचा पुतण्या बिभिषण शशिकांत पाटील (वय २०) हे दि.१५ रोजी दुपारी ३.३० वाजता मंगळवेढा शहराजवळील बायपास रोडवर एम आयडीसी समोर मोटर सायकल क्रमांक एम.एच.१३ बी.एक्स ८८३७ वरुन पाहुण्याकडे जात असताना समोरुन येणारा ट्रक क्रमांक टी एन.५४ आर ८५२७ वरील चालक तथा आरोपी कार्तिक कालियामुर्ती याने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहन चालवून मोटर सायकल स्वारास जोराची धडक देवून डोकीस,हातास,पायास मार लागून गंभी जखमी केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# पंढरपूरच्या जगताप मायलेकाच्या हत्येचे गुढ कायम

## ७२ तास लोटले तरी आरोपीही अन कारणही सापडेना

## १५० ते २०० जणांची चौकशी; परिसरातील १६० सीसीटीव्हीची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ जुलै -**

शहरातील कुंभार गल्ली परिसरात राहणाऱ्या जगताप माय-लेकराचा सत्तुर सारख्या धारदार शस्त्राने निर्घृण खून केल्याची घटना घडून तब्बल ७२ तास झाले. तरी शहर पोलिसांना अद्याप खून करणाऱ्यांच्या मुसक्या आवळणे दूरच साधे खूनाचे कारण देखील शोधण्यात यश आले नाही. तपास सुरु असल्याचे सांगितले जात आहे. मात्र या तपासातून अद्यापपर्यंत कोणतेही ठोस पुरावे तसेच काही महत्वपुर्ण धागेदोरे मिळालेली नाहीत. त्यामुळे जगताप मायलेकराच्या खूनाचे गुढ दिवसेंदिवस वाढतच आहे.

येथील कुंभार गल्ली भागात राहणाऱ्या जगताप मायलेकराचा खून मंगळवारी (ता.१५) सायंकाळी साडेनऊ ते दहाच्या सुमारास झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान या खूनप्रकरणी १५०-२०० जणांची चौकशी करण्यात आली. सहा वेगवेगळ्या पोलिसांच्या पथकाद्वारे या खूनाचा तपास केला जात आहे. मात्र अद्याप या प्रकरणी खुनाचे कारण व आरोपी याबाबत पोलिसांच्या हाती काहीच लागले नाही. दरम्यान घटनेनंतर शहर पोलिसांनी तातडीने रात्रीपासूनच तपास सुरू केला होता. शहरातील विविध ठिकाणचे १६० सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले असून सहा पथकाद्वारे मारेकऱ्याचा शोध घेतला जात आहे. यासाठी दीडशे ते दोनशेहून अधिक जणांची चौकशी करण्यात आली असून विविध जबाब घेण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी घटनास्थळी भेट देवून पथकातील पोलिसांनी खूनाच्या तपासासाठी मार्गदर्शन देखील केलेले आहे. पोलिसांचा तपास सुरु आहे.

> शहरातील कुंभार गल्ली येथील लखन जगताप व त्याची आई सुरेखा संजय जगताप या माय-लेकरांचा अज्ञात व्यक्तीने खून केल्याची घटना समोर आली होती. सदर घटनेस ७२ तासांहून अधिकचा अवधी लोटला आहे तरी देखील पोलिसांच्या हाती अद्याप ठोस अशी कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे शहर पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी सांगितले.

# मेसर्स पुलगम टेक्सटाईल्स शोरुमचा ट्रेडमार्क गैरवापर केल्याचा अर्ज नामंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जुलै -**

येथील सुप्रसिध्द मेसर्स पुलगम टेक्सटाईल्स् शोरुम असून सदर मेसर्स पुलगम टेक्सटाईल्स् या नावाने रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे या नावाने ते मागील अनेक वर्षापासून व्यवसाय करीत आहेत. मेसर्स पुलगम टेक्सटाईल्स् शोरुमच्या समोर अनुराधा पुलगम व रमाकांत पुलगम यांनी पुलगम सारीज या नावाने मागील अनेक वर्षापासून साड्या विक्रीचा व्यवसाय करित आहेत. असे असतांना मेसर्स पुलगम टेक्सटाईल्स् शोरुमचे भागीदार श्री. सिध्देश्वर रामय्या पुलगम यांनी मेसर्स पुलगम सारीज यांच्या विरुध्द ट्रेडमार्कचा गैरवापर केल्याप्रकरणी सोलापूर येथील मे जिल्हा व सत्र न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. ०१/२०२५ हे दाखल केले.



सदर प्रकरणात प्रतिवादी म्हणजेच पुलगम सारीजचे मालक अनुराधा पुलगम च रमाकांत पुलगम यांनी सदर प्रकरणात हजर होऊन पुलगम सारीज या नावाने मागील अनेक वर्षापासून साड्या विक्रीचा व्यवसाय करित असुन सदर व्यवसायाचे मालक यांचे आडनाव हे देखील पुलगम असल्याने त्यानावाने व्यवसाय करण्याचा कायदेशिर अधिकार असल्याचे च सदर पुलगम सारीज या दुकानात वादी म्हणजेच मेसर्स पुलगम टेक्सटाईल्स् हे देखील लाखो रुपयांचा माल खरेदी केल्याचे बिल व कागदपत्रे मे न्यायालयात दाखल करुन बाजु मांडला व तसेच मेसर्स पुलगम टेक्सटाईल्स् यांच्या ट्रेडमार्कचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केले नसल्याचे मे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आणि ट्रेडमार्क ॲक्टच्या कलम ३५ च्या अनुषंगाने में सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिवाड्याचा आधारे वकिल ॲड. मनोज नागेश पामुल यांनी युक्तीवाद केले असता सदर युक्तीवादस ग्राहय धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. मोहितेसाहेब यांनी मेसर्स पुलगम टेक्सटाईल्स् शोरुम यांचा अंतरिम अर्ज नामंजूर केली आहे.

सदर प्रकरणात प्रतिवादीतर्फे ॲड. मनोज नागेश पामुल, ॲड. राकेश कॉपेल्ली, ॲड. बालराज कैरमकोंडा, ॲड. श्रीनिवास बंडी, आणि ॲड. ज्योती आल्ली, यांनी काम पाहिले आहे.

# आंधळगाव येथील एका चोरीच्या घटनेत अल्पवयीन मुलगा ताब्यात

## मुद्देमाल केला जप्त

## अल्पवयीन मुलास सोलापूर येथील रिमांड होममध्ये दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १८ जुलै**

आंधळगाव येथे एका अज्ञात चोरट्याने घरासमोर लावलेली मोटर सायकल पेटवून दिली. तसेच दुकानातील रोख रक्कम व कॉम्प्युटरचे साहित्य असे एकूण १६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेल्याचा प्रकार घडला होता. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाल्याने पोलीसांनी त्या चोराचा कसून शोध घेतला असता तो अल्पवयीन मुलगा असल्याची बाब पोलीसांच्या तपासात समोर आली आहे.

या घटनेची हकीकत अशी, आंधळगाव येथील फिर्यादी समाधान दगडू लेंडवे (वय ४५) यांचे येथे सिध्दनाथ पशू खाद्य दुकान असून घटनेच्या आदल्या दिवशी नेहमी प्रमाणे दुकानातील सर्व लाईट बंद करुन कुलूप लावून फिर्यादी हे दि.१० जुलै रोजी रात्री ९.३० वाजता घरी निघून गेले. तद्नंतर वापरण्याकरीता आणलेली मोटर सायकल घराच्या समोर लावून फिर्यादी हे घरी झोपी गेले. पहाटे ३.३० वाजता फिर्यादीची पत्नी दिपाली लेंडवे ही बाथरुम करिता उठल्यावर सदर ठिकाणी लावलेली मोटर सायकल जळत असल्याची दिसून आली. पत्नीने आपल्या पतीस उठविले व पाहणी केली असता कोणी तरी अज्ञात इसमाने मोटर सायकल पेटवून दिली असल्याचे निदर्शनास आले. यावेळी फिर्यादीने पशुखाद्य दुकानाकडे नजर टाकली असता दरवाजाचा कडी कोयंडा तोडून दरवाजा अर्धवट उघडा दिसला. आत जावून पाहणी केली असता दुकानातील कॉम्प्युटरचा सीपीयू,मॉनिटर दिसला नाही, गल्ल्याचा ड्रॉवर अर्धवट उघडा दिसला. त्यामध्ये ठेवलेली रक्कम सहा हजार रुपये दिसून आली नाही. त्यामुळे चोरट्याने तीन हजार रुपये किंमतीचे मोटर सायकलचे नुकसान केले. सहा हजार रुपये रोख दहा हजार रुपये किंमतीचा सीपीयू,मॉनिटर असा मुद्देमाल चोरून नेला. याची फिर्याद दाखल होवून लक्ष्मी दहिवडी बीटचे पोलीस हवालदार धनंजय आवताडे यांच्याकडे तपास सुपुर्द करताच त्यांनी तपासाची सुत्रे वेगाने फिरवून खुपसंगी येथील एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले. याबाबत त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने गुन्हा कबूल केल्याने सर्व मुद्देमाल त्याच्याकडून जप्त करण्यात येवून त्याला सोलापूर येथील रिमांड होम मध्ये पाठविण्याचे सांगण्यात आले. दरम्यान दुकानातील चोरी करताना सी.सी.टी. व्ही. कॅमेऱ्यामध्ये त्याचा चेहरा कैद झाल्याचे लक्षात येताच त्याचीही तोडफोड केली होती. मात्र पोलीसांनी कॅमेऱ्याच्या आधारे त्यास ताब्यात घेतले.

# मंदिरांचे नियंत्रण अन् व्यवस्थापन हिंदूंच्या हाती हवे

## ‘विहिंप’चे राष्ट्रीय महामंत्री बागडा यांची माहिती

## आंतरराष्ट्रीय बैठकीत होणार चर्चा मंथन

**तभा वत्तसेवा**
**जळगाव, १८ जुलै**

देशातील जगप्रसिद्ध मंदिरांवर शासनाचे नियंत्रण असून, मंदिरांचे नियंत्रण व व्यवस्थापन हिंदूंकडे देऊन मंदिरात दान येणाऱ्या धनसंपत्तीचा उपयोग हिंदू समाजहितासाठी व्हावा. तसेच व्यसनाधीन युवक देशासाठी गंभीर मुद्दा आहे. यासाठी बजरंग दल व दुर्गा वाहिनीतर्फे जनजागृतीपर विशेष अभियान राबविले जाईल. यांसह इतर विषयांवर जळगावातील केंद्रीय प्रबंध समितीच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील बैठकीत चर्चामंथन होऊन अभियानाची दिशा ठरविली जाईल, असे विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय महामंत्री बजरंग लालजी बागडा यांनी सांगितले.

शहरातील एमआयडीसी परिसरातील बालाणी लॉन्सच्या नवीन इमारतीत अखिल भारतीय विश्व हिंदू परिषदेच्या केंद्रीय प्रबंध समितीची आंतरराष्ट्रीय स्तरावरील बैठक होत आहे. यानिमित्त शुक्रवारी (१८ जुलै) दुपारी श्री. बागडा यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेच्या अखिल भारतीय प्रचार समितीचे विजय




शंकर तिवारी, देवगिरी प्रांतमंत्री योगेश्वर गर्गे, भय्यालाल आदी उपस्थित होते. बैठकीत आगामी दोन दिवसांत कोणकोणत्या विषयांवर चर्चामंथन होईल याविषयी श्री. बागडा यांनी माहिती दिली.

श्री. बागडा म्हणाले की, बैठकीला केंद्रीय पदाधिकारी, क्षेत्रीय, सर्व प्रांतांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी असून, सुमारे ४०० पदाधिकारी उपस्थित राहतील. हिंदू समाजासमार अनेक आव्हाने आहेत. त्यांना समोरे देण्यासाठी आगामी कार्यक्रम, अभियानाची रूपरेषा बैठकीत ठरविली जाईल.

देशातील मंदिरे शासन नियंत्रणमुक्त व्हावीत
देशभरातील प्रसिद्ध हिंदू मंदिरांवर राज्य व केंद्र शासनाचे नियंत्रण आहे. मंदिरांचे व्यवस्थापन व नियंत्रण पूर्णतः हिंदू समाजाकडे असावे. मंदिरात येणाऱ्या दान व देणगीरूपी धनसंपत्तीचा उपयोग फक्त हिंदू समाजाच्या कल्याणासाठी केला जावा. ब्रिटिशकालीन कायद्यांमध्ये बदल करून मंदिरे शासनाच्या नियंत्रणातून मुक्त व्हावीत, असे श्री. बागडा यांनी स्पष्ट केले.

देशभरातील धर्मांतर रोखण्याची गरज
श्री. बागडा यांनी होत असलेल्या धर्मांतरावर भाष्य केले. बांगलादेशातून मोठ्या संख्येने घुसखोरी होत असल्याचे सांगत देशात धर्मांतर होण्याचे प्रकार वाढले आहेत. हिंदू समाजाची अस्मिता वाचविण्यासाठी अवैध पद्धतीने होणारे धर्मांतर रोखण्याची गरज आहे. अनेक हिंदू बांधवांना वेगवेगळी आमिषे, पैशांची आशा लावून धर्मांतर करण्यासाठी भाग पाडले जाते. ते षड्यंत्र आहे. यासाठी बजरंग दल व दुर्गा वाहिनी यांच्यातर्फे देशभर जनजागृती अभियान राबविले जात आहे. गोमातांचे संरक्षण, युवतींच्या संरक्षणासाठी बजरंग दल व दुर्गा वाहिनी कार्यरत आहेत, असे ते म्हणाले.

युवकांमध्ये व्यसनाधीनता चिंताजनक
श्री. बागडा यांनी देशातील युवक व्यसनाच्या आहारी गेल्याच्या मुद्यावर चिंता व्यक्त केली. देशभरातील युवक व्यसनाच्या आहारी जात आहेत. हा विषय आता चिंताजनक झाला आहे. ही देशासमोर मोठी समस्या आहे. युवकांना व्यसनांपासून रोखण्यासाठी राष्ट्रव्यापी नशामुक्ती अभियान राबविले जाईल. अभियानाला अंतिम रूप देण्यासाठी विश्व हिंदू परिषदेचे युवा संघटन, बजरंग दल, दुर्गा वाहिनी प्रामुख्याने सहभाग होईल. याअंतर्गत शाळा- महाविद्यालय व विविध समाजघटकांमध्ये जनजागृतीपर उपक्रम राबविले जातील. यासाठी शासन-प्रशासनासोबत समन्वय बैठका घेण्यात येतील.

देशात हिंदू बांधवांच्या संख्येत घट
भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा देशात हिंदूंची संख्या ९० टक्के होती. आता ती ७० टक्क्यांपर्यंत घटली आहे. हा मोठा चिंतेचा विषय आहे. हिंदूंची वृद्धी कमी होत असल्याची विविध कारणे आहेत. धर्मांतरासह बांगलादेशातून भारतात होणारी घुसखोरी ही प्रमुख कारणे आहेत. ९९ टक्के धर्मांतर अवैध पद्धतीने होतात. धर्मांतर रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनांनी पुढाकार घेत पावले उचलण्याची आवश्यकता आहे. यासाठी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गा वाहिनी जनजागृती करीत आहे, असेही श्री. बागडा यांनी सांगितले.

देशात दहशतवाद धोकादायकच
जम्मू-काश्मीरमधील पहेलगाम येथे काही महिन्यांपूर्वी झालेला हिंदूंवरील दहशतवादी हल्ला देशासाठी संतापजनकच होता. परकीय शक्तींचे त्यात षडयंत्र होते. दहशतवादाचा धोका पूर्वी अमेरिकेला होता. आता भारताला आहे. दहशतवादाला पोसणे कोणत्याही देशाला नुकसानकारकच आहे. यामुळे जगभरातील देशांनी दहशतवादाचा विरोध केला पाहिजे, असे श्री. बागडा यांनी नमूद केले.

जनजागृती, निवेदन अन् आंदोलनाची तयारी
जळगावात होत असलेल्या अखिल भारतीय विश्व हिंदू परिषदेच्या केंद्रीय प्रबंध समितीच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील बैठकीत हिंदू समाजहितासाठी मंदिरे शासन नियंत्रणमुक्त व्हावीत, युवकांना व्यसनांपासून रोखणे, धर्मांतर या प्रमुख मुद्यांसह विविध विषयांवर चर्चामंथन करीत, शासन-प्रशासनाशी चर्चा करून योग्य निर्णय घेण्यासाठी दिशा ठरविली जाणार आहे. त्यानंतर जनजागृती अभियानासह आवश्यक असल्यास शासन-प्रशासनाला निवेदने आणि आवश्यकतेनुसार आंदोलनही केले जाईल, असे श्री. बागडा यांनी सांगितले.

# प्रा. महावीर शास्त्री यांना जिनदत्त स्मृती पुरस्कार

**सोलापूर, दि. १८ जुलै -**

बारामती येथील चंदूकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सौजन्याने सौ कुसुम व जिनदत्त चंदुलाल शहा वेल्फेअर फाउंडेशन तर्फे धार्मिक सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्वानांना दिला जाणारा राज्यस्तरीय जिनदत्त स्मृती सन्मान २०२५ येथील प्राकृत विद्वान डॉ. महावीर शास्त्री यांना जाहीर झाला आहे. स्मृतिचिन्ह व ७५ हजार रुपयांची सन्मान राशी या निमित्ताने त्यांना दिली जाणार आहे. देश विदेशातील उल्लेखनीय कार्य व शैक्षणिक क्षेत्रात प्राचीनतेची जपणूक याकरिता शास्त्री यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे असे समितीचे अध्यक्ष किशोर शहा यांनी यावेळी सांगितले. शनिवार दिनांक १९ जुलै रोजी एका भव्य कार्यक्रमात बारामती येथे हा सन्मान संपन्न होणार आहे.



### बीबी दारफळ येथे तरुणाची आत्महत्या

**सोलापूर :** अज्ञात कारणावरून एका ३३ वर्षीय तरुणाने आजाराला कंटाळून घरातील छताच्या अँगल ला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ येथे आज शुक्रवारी पहाटे चार वाजता उघडकीस आली. रोहित सुरेश बारस्कर ( वय ३३ वर्षे, रा. बीबी दारफळ) असे त्या मयत तरुणाचे नाव आहे. त्याने आजाराला कंटाळून आपल्या राहत्या घरात गळफास घेतल्याचे आज पहाटे चार वाजता घरच्यांना आढळून आले. त्याला नातेवाईकांच्या साह्याने गळफासातून सोडवून बेशुद्ध अवस्थेत येथील शासकीय रुग्णालयात भाऊ राहुल वारसकर यांनी सकाळी आठ वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घषित केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य शासनाकडून सहकार्य राहिल

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकास व्हावा यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत आवश्यक सहकार्य करण्यात येईल तसेच प्रलंबित प्रकल्प वेळेत पूर्ण करून नागरिकांना दर्जेदार सेवा देण्याचे उद्दिष्ट ठेवून कार्य करण्याचे निर्देश मुख्यमंत्री सचिवालयातील मुख्य आर्थिक सल्लागार तथा महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांनी दिले. आज महापालिकेतील इंद्रभुवन मिटिंग हॉल येथे मुख्यमंत्री सचिवालयातील मुख्य आर्थिक सल्लागार तथा महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त रवी पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, उपजिल्हाधिकारी अमोलसिंग भोसले,उपसंचालक नगररचना विभाग मनीष भिष्णुरकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे एम.हरीश, नॅशनल हायवे चे प्रकल्प संचालक जवादे, प्र. सार्वजनिक आरोग्य अभियंता सतीश एकबोटे, तपण डंके,रामचंद्र पेंटर, संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी सोलापूर महानगरपालिकेच्या महात्मा गांधी प्राणी संग्रहालय,शहरातील उड्डाणपूल व सांडपाणी प्रक्रिया आणि बायोगॅस (ड्शुरसश ढीशरींशपीं लीं इळेसरी ) प्लांट प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी व सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने चर्चा झाली. भुयारी गटारी योजना, अमृत व नगरोत्थान योजना (राज्यस्तर), सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (डढझ), देगाव टर्शरी ट्रीटमेंट प्लांट प्रकल्प, तसेच महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाचा विकास आराखडा (उझठ) व उड्डाणपूल प्रकल्प यावर सविस्तर चर्चा झाली.अमृत व नगरोत्थान योजनांची प्रगती, शहरातील भुयारी गटारी योजना, अमृत योजना व राज्यस्तरीय नगरोत्थान योजनेतील कामांची सद्यस्थिती व प्रगतीचा आढावा घेण्यात आला. अडचणींचे निराकरण व तात्काळ काम पूर्ण करण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याचे निर्देश प्रवीणसिंह परदेशी यांनी दिले. देगाव एसटीपी व एनटीपीसी सहकार्याने देगाव येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्रात टर्शरी ट्रीटमेंट प्लॅन्ट उभारून प्रक्रिया केलेले सांडपाणी एनटीपीसीला देण्याची योजने संदर्भात चर्चा झाली. या उपक्रमाअंतर्गत एनटीपीसी मार्फत मनपाला ७२ एमएलडी क्षमतेची पाईपलाइन पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्ध करून देण्याची योजना असून, यामुळे शहरातील जलसंपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी होणार आहे. महात्मा गांधी प्राणी संग्रहालयासाठी २०२५ ते २०३० पर्यंतचा ५ वर्षांचा डीपीआर (विकास आराखडा) तयार करण्यात आला असून, फेजवाइज काम हाती घेण्यात येणार आहे.या प्रकल्पासाठी एनटीपीसी कडून सीएसआर फंड व जिल्हा नियोजन समिती मार्फत काही निधी उपलब्ध झाला आहे. उर्वरित निधी अन्य स्रोतांतून मिळवण्याबाबतही आढावा घेण्यात आला.

**मुख्य आर्थिक सल्लागार परदेशी यांनी घेतला विविध योजनांचा आढावा**

**महापालिकेतील बैठकीत अधिकाऱ्यांना दिल्या विविध सूचना**

#### उड्डाणपूल प्रकल्पावर चर्चा

शहरातील वाहतुकीस चालना देणाऱ्या उड्डाणपूल प्रकल्पाच्या तांत्रिक व आर्थिक अडचणी, तसेच भविष्यातील अंमलबजावणीबाबत चर्चा करण्यात आली. संबंधित विभागांना प्रस्ताव सादर करून शासनाशी समन्वय साधण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची उद्या पुण्यात प्रांत समन्वय बैठक

**पुणे, दि. १८ जुलै-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताची वार्षिक प्रांत समन्वय बैठक येत्या २० जुलै रोजी (रविवारी) पुण्यात पार पडणार आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीत प्रांतातील विविध संघप्रेरित संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होणार असून, ५० संघटनांमधून सुमारे ४३४ प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती पश्चिम महाराष्ट्र प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री यांनी दिली. बैठकीमध्ये संघाच्या प्रेरणेतून कार्यरत असलेल्या सेवा, आर्थिक, वैचारिक, सुरक्षा, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील संघटनांचे संघटनात्मक कार्य यावर चर्चा होणार आहे. संघटनात्मकदृष्ट्या ही बैठक अत्यंत महत्त्वाची असते. बैठकीत प्रांत पातळीवर कार्यरत असलेल्या संघटनांमध्ये आपापल्या क्षेत्रातील संघटनात्मक स्थिती, संघ शताब्दीनिमित्तचे कार्यक्रम, पंच परिवर्तन या विषयावर चर्चा होईल. विविध संघटनांनी आपापल्या क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा घेतला जाईल. या बैठकीत पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक आणि सोलापूर या जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांचा व महिला कार्यकर्तींचा सहभाग असणार आहे. ही बैठक फर्ग्युसन महाविद्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

### जनसुरक्षा विधेयक पुनर्विचारासाठी शासनाकडे परत पाठवा

**मुंबई, दि. १८ जुलै-**

महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयकाला मान्यता न देता जनप्रक्षोभ विचारात घेऊन पुनर्विचार करण्यासाठी शासनाकडे परत पाठविण्यात यावे, असे साकडे महाविकास आघाडीच्यावतीने राज्यपाल सी. पी.राधाकृष्णन यांना करण्यात आले आहे. आघाडीच्या नेत्यांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी त्यांची भेट देऊन ही मागणी केली. राज्यपालांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात बहुमताने संमत झालेले २०२४ चे विशेष जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्यात आले आहे. वास्तविक त्याच्या अभ्यासासाठी नेमलेल्या संयुक्त समितीपुढे एकूण १२,५०० हरकती आल्या. त्यापैकी,५०० या विधेयक रद्द करण्याबाबत होत्या. तसेच विरोधी पक्षाच्यावतीने त्या विरोधात देण्यात आलेल्या पत्राचाही विचार करण्यात आलेला नाही. बहुमताच्या आधारावर ते मंजूर करण्यात आले. त्यामुळे जनभावना विचारात हे विधेयक शासनाकडे पुर्नविचारासाठी पाठवावे, ही विनंती. शिष्टमंडळात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार सर्वश्री नाना पटोले,विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, सतेज पाटील,अमीन पटेल, अस्लम शेख, जितेंद्र आव्हाड, अनिल परब आदींचा समावेश होता.

**महाविकास आघाडीचे राज्यपालांना साकडे**

# मुंबई ‘क्रिएटिव्ह इकॉनॉमी’चे जागतिक केंद्र होणार : फडणवीस

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १८ जुलै-**

मुंबई ही देशाची ‘एंटरटेनमेंट कॅपिटल’ आहे आणि याच शहरातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ’क्रिएटिव्ह इकॉनॉमी’साठी जागतिक पातळीवर पुढाकार घेण्याची घोषणा केली होती. ती घोषणा आज यशस्वीरित्या प्रत्यक्षात उतरली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केले.

मुंबई येथे १ ते ४ मे दरम्यान झालेल्या वेव्हज् परिषदेच्या निष्कर्ष अहवालाचे प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. त्याचप्रमाणे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (आयआयसीटी) आणि एनएफडीसी कॅम्पसचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्रीय माहिती व प्रसारण, माहिती तंत्रज्ञान व रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार, मुख्य सचिव राजेशकुमार, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, केंद्रीय सचिव संजय जाजू तसेच प्रसून जोशी, साकेत मिश्रा, शेखर कपूर आदी उपस्थित होते.

क्रिएटिव्ह इकॉनॉमीशी संबंधित वेव्हज् इंडेक्सचे महत्त्व सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या इंडेक्सची किंमत काही महिन्यांपूर्वी ९३,००० कोटी होती. आता ती १ लाख कोटींवर पोहोचली आहे. क्रिएटर्स इकॉनॉमीच्या पुढील टप्प्याला चालना देण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून □१५० कोटींचा विशेष निधी मंजूर करण्यात येणार आहे. वेव्हज् परिषद आता दरवर्षी किंवा दोन वर्षांनी मुंबईतच होईल. पुढील कार्यक्रम हा याहून भव्य असेल, याची हमी देत असल्याचे सांगून ते म्हणाले,



आयआयसीटी केवळ प्रशिक्षण संस्था नसून एक ’आयकॉनिक डेस्टिनेशन’ ठरेल. लोक इथे शिकण्यासाठीच नव्हे, तर पाहण्यासाठीही येतील. ही संस्था पुढील पिढ्यांसाठी क्रिएटिव्ह इकॉनॉमीचा केंद्रबिंदू बनेल. ’

यावेळी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले,’ही केवळ सुरुवात असून, क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीसाठी आयआयटी-आयआयएम प्रमाणे एक संपूर्ण शैक्षणिक साखळी उभी करण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी कल्पना आहे. देशातील तरुणांसाठी नव्या संधी निर्माण करणारा हा उपक्रम आहे. क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये काम करणाऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान, कौशल्ये आणि जागतिक दर्जाची साधने देण्याचा हेतू या संस्थेमागे आहे. ‘आयआयसीटी’च्या स्थापनेसाठी आतापर्यंत ४०० कोटीचा निधी मंजूर झाला असून, मुंबई फिल्म सिटीमध्ये पुढील मोठा कॅम्पस उभारला जाणार आहे. त्याची रचना पर्यावरण व भौगोलिक वैशिष्ट्ये लक्षात घेऊनच ‘आयआयसीटी’ची इमारत तयार करण्यात येणार आहे, असे स्पष्ट करुन

वैष्णव म्हणाले की, या ‘आयआयसीटी’मध्ये गुगल, मेटा, एनव्हिडिया, मायक्रोसॉफ्ट, ॲपल, डोबी, यांसारख्या जागतिक कंपन्यांसोबत औपचारिक भागीदारी झाली असून, न्यू यॉर्क विद्यापीठासोबतही करार झाल्याचे त्यांनी सांगितले. हे अभ्यासक्रम उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन आखण्यात आले आहेत. यात व्हीएफएक्स, गेमिंग, एक्सआर, पोस्ट-प्रॉडक्शन, ॲनिमेशनसारख्या क्षेत्रांमध्ये प्रगत प्रशिक्षण देण्यात येईल. प्रथम वर्षी ३०० विद्यार्थी व प्रशिक्षकांना पूर्ण प्रशिक्षण देणे हे लक्ष्य ठेवण्यात आले असून, ३ महिन्यांपासून ते २ वर्षांपर्यंतचे विविध कालावधीचे अभ्यासक्रम असतील, असे त्यांनी सांगितले.यावेळी प्रसार भारती आणि महाराष्ट्र फिल्म ण्ड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्यामध्ये माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात नाविन्यता, कौशल्यस्पर्धा आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकतेला चालना देण्यासाठी सामंजस्य करार झाला. त्याबरोबर, ‘आयआयसीटी’च्या लोगोचे अनावरण करण्यात आले. केंद्रीय सचिव संजय जाजू यांनी मुंबईत झालेल्या वेव्हज् परिषदेच्या निष्कर्षाची माहिती

# कोणी कोणाला भेटले म्हणजे युतीसाठी भेटले असे नाही

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्टीकरण
- सत्तेत येण्याच्या ऑफरनंतर उद्धव ठाकरेंनी घेतली होती भेट

**मुंबई, दि. १८ जुलै-**

शिवसेना ठाकरे गटाचे नेते व विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा बुधवारी निरोप समारंभ पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दानवे यांचे कौतुक करत टोलेबाजी देखील केली. यावेळी सभागृहात उद्धव ठाकरे देखील उपस्थित होते. यावेळी फडणवीस यांनी त्यांना थेट सत्तेत येण्याची ऑफर दिली होती. तिकडे स्कोप नाही पण इकडे आहे, तुम्ही येऊ शकता, असे देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंना उद्देशून म्हटले.

देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या या



ऑफरनंतर दुसऱ्या दिवशी फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्यात बैठक देखील झाली. या बैठकीला आदित्य ठाकरे देखील उपस्थित होते. या बैठकीची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. या बैठकीत हिंदी भाषा सक्ती, त्रिभाषा सूत्र आणि विरोधी पक्षनेते पदावर चर्चा झाली. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या दालनात ही बैठक झाली. या बैठकीवर देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीवर प्रतिक्रिया देताना म्हटले, हिंदी सक्ती हवीच कशाला या लेखाचा संग्रह प्राप्त झाला. ठाकरेंनी काल दिलेले पुस्तक मी वाचले. कोणी कोणाला भेटले म्हणजे युतीसाठी भेटले असे होत नाही, असे स्पष्टीकरण देखील फडणवीसांनी दिले. तसेच पहिली ते बारावी हिंदी सक्तीचा अहवाल ठाकरेंच्या कॅबिनेटसमोर आला होता आणि ठाकरेंच्या कॅबिनेटने अहवाल स्वीकारला होता, असा दावाही फडणवीस यांनी केला.

दरम्यान, सध्या महाराष्ट्रात भाषेचा मुद्दा चांगलाच पेटला आहे. मराठी भाषेसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र देखील आले. ५ जुलै रोजी त्यांनी विजयी मेळावा देखील घेतला. ही जवळीक मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर असल्याचे सत्ताधाऱ्यांकडून बोलले जात आहे.

# अधिवेशन काळात फक्त आमदार, पीए, अधिकाऱ्यांनाच प्रवेश

## विधानसभा अध्यक्षांचा मोठा निर्णय; मंत्र्यांनाही बैठका घेण्यास बंदी

**मुंबई, दि. १८ जुलै:**

विधानसभा अध्यक्षांनी काल झालेल्या हाणामारीच्या घटनेनंतर मोठा निर्णय घेतला आहे. यापुढे विधान भवन परिसरामध्ये अधिवेशन चालू असताना केवळ आमदार, त्यांचे स्वीय सहाय्यक आणि अधिकाऱ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. काल झालेल्या हाणामारीच्या घटनेनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कठोर भूमिका घेत, हा निर्णय आज जाहीर केला.

विधानसभा अध्यक्षांच्या आदेशानुसार आता आमदारांच्या खासगी कर्मचाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना अधिवेशन सुरु असताना विधिमंडळ परिसरामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. इतकेच नाही तर अधिवेशन काळात विधिमंडळातील सभागृहांमध्ये मंत्र्यांना बैठका न घेण्याचे निर्देश अध्यक्षांनी दिले आहेत. मंत्र्यांनी त्यांच्या मंत्रालयातील दालनात या बैठका घ्याव्यात, असे देखील अध्यक्षांनी सांगितले आहे. आमदारांच्या नैतिक आचरणाचे उच्च मापदंड राखण्यासाठी लोकसभेच्या धर्तीवर नीती मूल्य समिती गठीत करण्याचा विचार असल्याचे राहुल नार्वेकर यांनी म्हटले आहे. त्यासाठी विधान परिषदेच्या सभापतींशी विचार विनिमय करून तसेच गटनेत्यांशी चर्चा करुन, या विषयाचा निर्णय पुढील आठवड्यात घेण्यात येणार असल्याचे राहुल नार्वेकर यांनी सांगितले आहे. यावेळी राहुल नार्वेकर यांनी सांगितले की, बऱ्याच वेळा मंत्र्यांच्या वतीने देखील विधिमंडळाच्या सभागृहांमध्ये बैठका आयोजित करण्यासाठी अभ्यागतांना प्रवेश देण्याची विनंती करण्यात येते. मात्र, आता त्यांना त्यांच्या बैठका या मंत्रालयातील त्यांच्या दालनात घ्याव्या लागतील. अत्यंत महत्त्वाच्या परिस्थितीत, माननीय अध्यक्ष आणि सभापती यांचा समावेश असलेल्या मंडळाची मान्यता घेतल्याशिवाय मंत्र्यांना देखील विधानमंडळात बैठक घेण्याचे आणि अभ्यागतांना प्रवेश देण्याची परवानगी देण्यात येणार नाही, असे देखील नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

### अभ्यागतांच्या वर्तणुकीची जबाबदारी त्या आमदारांवर

या विषयी बोलताना विधानसभा अध्यक्ष म्हणाले की, सर्वांचे उत्तरदायित्व हे संविधानाशी आहे. संविधानानुसार आपले विधानमंडळ आणि इतर सर्व संस्था आहेत. विधिमंडळाचे सदस्य म्हणून शपथ घेताना आपण संविधानाबद्दल खरी श्रद्धा, निष्ठा बाळगण्याची व कर्तव्य निष्ठापूर्वक पार पाडण्याची शपथ घेतली आहे. त्याचे काटेकोरपणे पालन करणे अपेक्षित आहे. त्या दृष्टिकोनातून विधिमंडळ परिसरामध्ये अधिवेशन काळात कालावधीत यापुढे केवळ सन्माननीय सदस्य त्यांचे अधिकृत स्वीय सहाय्यक आणि शासकीय अधिकारी यांनाच केवळ प्रवेश देण्यात येईल. इतर अभ्यागतांना प्रवेश देण्यात येणार नाही. तसेच आमदारांसोबत येणाऱ्या अभ्यागतांच्या वर्तणुकीची जबाबदारी देखील त्या आमदारांवर निश्चित करण्यात येणे आवश्यक असल्याचे अध्यक्षांनी म्हटले आहे.

# गृहराज्यमंत्री कदम यांच्या आईच्या नावाने मुंबईत डान्सबार

- २२ बारबाला पकडल्या
- अनिल परबांचा विधान परिषदेत आरोप

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १८ जुलै:**

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावे कांदिवलीतील सावली डान्सबार आहे, मे महिन्यात पोलिसांनी त्या ठिकाणी टाकलेल्या छाप्यात २२ बारबाला सापडल्या होत्या, असा खळबळजनक आरोप ठाकरे गटाचे नेते आ.अनिल परब यांनी विधान परिषदेत शुक्रवारी केला.डान्सबारवर बंदी असताना हे कसे सुरु होते?, याबाबत सरकारने खुलासा करून त्यांचा राजीनामा घ्यावा , अशी मागणीही त्यांनी केली.

पावसाळी अधिवेशनाच्या अखेरच्यादिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना परब यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे काढत कुपनच शेत खात असल्याचे सांगत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर गंभीर आरोप केले. ते म्हणाले, कांदिवलीत सावली डान्सबार असून तो गृह राज्यमंत्री कदम यांच्या आई ज्योती कदम यांच्या नावेआहे. पोलिसांनी या बारवर ३० मे रोजी धाड टाकून २२ बारबाला ताब्यात घेतले. २२ कस्टमर आणि ४ कर्मचाऱ्यांना पकडण्यात आले. या ठिकाणी कस्टमरवर गुन्हा दाखल झाला. या ठिकाणी पोलिसांनी पंचनामा केला. त्या बारचे परमिट हे ज्योती रामदास कदम यांच्या नावे आहे.

एकीकडे लाडक्या बहिणीचा तुम्हाला आशीर्वाद आहे आणि दुसरीकडे तुम्ही आया बहिणीना डान्सबारमध्ये नाचवता? आजच्या आज गृह राज्यमंत्री यांचा राजीनामा घ्यावा. अजित दादा तुम्ही योग्य ती कारवाई कराल. जे मुख्यमंत्री आज कारभार सांभाळतात त्यांनी गृहराज्यमंत्री यांचा राजीनामा घेतला पाहिजे. जर कारवाई झाली नाही तर सरकारचा पाठींबा आहे, हे सिद्ध होईल, असे देखील अनिल परब म्हणाले. सध्या शरमेने मान खाली जातं आहे. आजू बिहारमध्ये म्हणत आहे की, तुमचा महाराष्ट्र बिहार झाला आहे का? आज आम्ही राज्यपालांकडे आम्ही गेलो होतो. त्याठिकाणी आमच्या पीएला राज्यपाल यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव खाली उतरवण्यात आले. आता राज्यपाल सुरक्षित नसेल तर काय उपयोग? जनसुरक्षा विधेयक चाटायचे आहे का? काल विधीमंडळात मारामारी झाली, आमदार सुरक्षित नाहीत. सचिन पाटील नावाचा आरटीओ अधिकारी आहे, त्याचा ड्रायव्हर कंत्राटी होता. त्याचं कंत्राट संपलं आहे तरी हा ड्रायव्हर आहे. अधिकाऱ्याचे कपडे घालून चलन कापत आहे. तो अधिकारी गाडीत बसतोय आणि त्याचा ड्रायव्हर मशीन हातात घेऊन चलन काढत आहे. मी याचे फोटो पाठवतो. त्याच्यावर कारवाई करा, अशी मागणी देखील त्यांनी यावेळी केली.

# आम्ही हिंदू आहोत, हिंदी नव्हे; हिंदी लादण्याचा प्रयत्न करू नका


- राज ठाकरे : दुबे मुंबईत येऊन दाखवा, डुबो-डुबो के मारेंगे

**मुंबई, दि. १८ जुलै:**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे मीरा भाईंदर येथे दाखल झाले असून आज येथील मराठी जनतेशी संवाद साधणार आहेत. मीरा भाईंदर येथे मराठी व मनसैनिकांनी काही दिवसांपूर्वी मोठे आंदोलन करत मोर्चा काढला होता. त्यानंतर आज राज ठाकरे यांनी सभा घेतली. राज ठाकरे व्यासपीठावर आल्यावर एकच जल्लोष पाहायला मिळाला. यावेळी तिथे घोडा आणलेला होता, ते पाहून राज ठाकरे म्हणाले, मी काय बोलतो हे माणसांना कळत नाही घोड्याला काय कळणार? यावेळी एकच हशा पिकला.

बिहारचा खासदार दुबे हा आम्हाला म्हणतो की, तुम्ही आमच्याकडे येऊन दाखवा, तुम्हाला पटक पटक के मारेंगे. या खासदारावर केस झाली का? याचा विचार तुम्ही आम्ही करायला हवा. कारण या नेत्यांना बोलतांना माहिती असते की, सरकार आपल्या पाठिशी आहे. त्यामुळे ही अशा प्रकारची भाषा करत असतात. पण दुबे मी तुम्हाला सांगतोय की, तुम्ही मुंबईत येऊन दाखवा. तुम्हाला मुंबईच्या समुद्रात डुबो डुबो के मारेंगे.

मीरा भाईंदरला मी मुद्दाम आलो आहे. त्या दिवशी जो प्रसंग घडला होता, मिठाईवाल्याचा काही तरी झाला होता. कानावर मराठी बसत नसेल तर कानाखाली बसणारच. इथल्या व्यापाऱ्यांनी संप पुकारला, त्यांच्या कानाखाली मारली होती का? कुठल्या तरी पक्षाचे ऐकून हे संप वगैरे काढणार, तुम्हाला काय वाटले मराठी व्यापारी नाही? महाराष्ट्रात राहत आहात शांततेत रहा, मराठी शिका. इथे मस्ती करणार असाल तर फटका बसणार म्हणजे बसणार.



मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देऊन वर्ष झालं पण निधी मिळाला नाही कमीत कमी १४०० वर्ष जुनी भाषा असायला हवी. हिंदीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. या भाषेचा इतिहास १२०० वर्षांचा आहे आणि ती भाषा तुम्ही आमच्यावर लादणार का? हिंदीमुळे केवळ बॉलिवूडच्या नट आणि नट्यांचं भलं झालं. हिंदीमुळे तुम्ही का पुढे गेला नाहीत. मग तुम्ही आमच्या मुंबईत कामासाठी का येता? हिंदीने तुमचं काय भलं केलं? कोणती भाषा घेऊन बसले आपण? असा सवाल राज ठाकरे यांनी केला.

ठाकरे पुढे म्हणाले, अन् या हिंदीसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पेटलेत. याचे काही मला समजू शकले नाही. हिंदी कुणाचीही राजभाषा होऊ शकत नाही. हिंदी ही इकडच्या तिकडच्या भाषा मिळून २०० वर्षापूर्वी तयार झालेली भाषा आहे. हिंदीने जवळपास १५०० भाषा मारल्या. आणि आपल्या मराठीला २००० वर्षांचा इतिहास आहे. तर मग तुम्ही कोणत्या दिशेने चालला आहात?

ते पुढे म्हणाले- हनुमान चालिसा ही अरबी आहे, ती हिंदी नाही. हे तुम्ही समजून घ्यायला पाहिजे. प्रथम तुम्ही भाषा समजून घेतली पाहिजे. माझे तर सर्वच भाषेवर प्रेम आहे. मला तुम्हाला सांगायचे आहे की तुम्ही सतर्क राहिले पाहिजे. तुम्ही खडकासारखे टणक असले पाहिजे. महाराष्ट्राची भक्कमपणे बाजू उभी केली पाहिजे. सव्वाशे वर्ष या महाराष्ट्राने देशावर राज्य केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज काय म्हणायचे, हे हिंदवी स्वराज्य व्हावे, हिंदी राज्य नव्हे. या प्रांतावर आमचा अधिकार आहे. पाकिस्तानच्या अटक किल्ल्यावर भगवा फडकवला होता आम्ही. आणि हा महाराष्ट्र हतबल आहे? हा महाराष्ट्र हात पसरतोय? आम्ही भिका मागायच्या का? तुम्ही या महाराष्ट्राचे मालक आहात? ते नाही.

# ७२ वरिष्ठ अधिकारी, नेत्यांच्या हनी ट्रॅपचा पेनड्राइव्ह विधानसभेत सादर

## नाना पटोलेकडून कारवाईची माहिती

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७ जुलै :**

राज्यातील तब्बल ७२ वरिष्ठ सरकारी आणि अधिकारी हनी ट्रॅपच्या जाळ्यात अडकल्याचे खळबळजनक प्रकरण चर्चेत असताना काँग्रेसचे जेष्ठ नेते आ. नाना पटोले यांनी गुरुवारी विधानसभेत त्याबाबत व्हिडीओ असलेला पेनड्राइव्ह सादर करीत याबाबतची माहिती जाहीर करण्याची मागणी केली. अधिकाऱ्यांबरोबरच आजी-माजी मंत्री आणि राजकीय नेते सहभागी असल्याचा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, असा प्रकार नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात स्पष्ट केले आहे.

नाशिक मधील एका आलिशान फार्महाऊसमध्ये हे कांड घडले असून या प्रकरणी नाशिक पोलिसांकडून तपास करण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे, असे सांगून नाना पटोले म्हणाले, राज्यात हे प्रकरण चर्चेत असून अधिकारी व राजकीय नेत्यांकडून कोट्यावधीची रक्कम घेण्यात आले असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे त्याबाबतची माहिती जनेतला होणे आवश्यक आहे. हे प्रकरण सवेदनशील असून आपल्याला कोणाच्या वैयक्तिक आयुष्य आणि चारित्र्य उध्वस्त करायचे नाही, मात्र सरकारने त्याबाबत सभागृहात स्पष्टीकरण दिले पाहिजे, अशी मागणी केली. शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड यांनी या प्रकरणाचा तपास तातडीने करून सत्य समोर आणण्याची मागणी केली. हनी ट्रॅपच्या जाळ्यात अडकलेल्यांमध्ये नाशिक, मुंबई, पुणे,ठाणे जिल्ह्यातील अधिकारी असल्याचे सांगण्यात येत आहे. व्हिडीओबद्दलही त्याने भाष्य केले. हे व्हिडीओ हनी ट्रॅपचा भाग आहेत की वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या रासलीला आहेत, याबाबत नेमकी स्पष्टता नाही. मात्र, नाशिकच्या एका पंचतारांकित सुविधा असलेल्या हॉटेलमध्ये हा प्रकार घडला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अग्रलेख...

# लोकशाहीची मान झुकली

राज्यातील लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र विधानभवनात गुरुवारी सायंकाळी जे काही घडले, त्यामुळे लोकशाहीवर प्रेम करणाऱ्यांची मान शरमेने खाली झुकली, असे म्हणायला हरकत नाही. एखाद्या ॲक्शनपॅक्ड चित्रपटातील हाणामारीचे शूटिंग आपण पाहात असल्याचे प्रत्यक्षदर्शींना वाटले. हा सारा प्रकार 'याचि देही याचि डोळा' पाहून यातील अनेकांच्या डोळ्यांचे पारणेही फिटले असेल. तर अशा मोक्याच्या क्षणी त्याठिकाणी आपण नव्हतो, म्हणून अनेकांनी आपल्या नशिबाला दोष दिला असेल. एखाद्या महाविद्यालयात निवडणुकीच्या वेळी विद्यार्थ्यांच्या दोन गटांत जशी हाणामारी होत असते, तशीच हाणामारी आमदारांच्या दोन गटांत विधानमंडळात घडल्यामुळे आम्ही कोणत्या लायकीचे लोकप्रतिनिधी निवडून दिले, असा प्रश्न मतदारांना पडणे स्वाभाविक म्हणावे लागेल. ही हाणामारी बाहेर रस्त्यावर झाली असती तर लोकांना त्याचे फारसे वाईट वाटले नसते. पण विधानसभवनात झाल्यामुळे त्याचे गांभीर्य कित्येक पटींनी वाढले. महाविद्यालयीन विद्यार्थी तरी हाणामारी करताना थोडीफार लाजलज्जा ठेवतात, मर्यादा पाळतात, पण या दोन आमदारांच्या समर्थकांनी तर सगळ्या मर्यादा आणि लाजलज्जा सोडून तमाशा केला. त्यामुळे विधानभवनाच्या परिसरात जो काही राडा झाला, त्याचे वर्णन नंगानाच असे केले तरी ते फारसे चूक ठरणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांनी जो काही तमाशा केला, ते पाहून 'हेचि फळ काय मम तपाला' असे राज्यातील जनतेला वाटले तर त्यांना दोष देता येणार नाही. यात सुदैवाची बाब म्हणजे जे काही घडले त्यात आव्हाड आणि पडळकर यांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता, तर अप्रत्यक्ष सहभाग होता. म्हणजे दोघांनी आपल्याला कार्यकर्त्यांना चिथावणी दिली, असे म्हणायला हरकत नाही. विधानभवनाच्या दोन्ही सभागृहांत आतापर्यंत गोंधळ आणि गदारोळ नेहमीच होत होता. पण आता सभागृहाच्या बाहेर म्हणजे विधानभवनाच्या आवारात नाही तर प्रत्यक्ष विधानभवनातही हाणामाऱ्या सुरू झाल्या आहेत.

या प्रकाराला सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत आळा घातला नाही तर उद्या विधानभवनाच्या आवारात गोळीबार झाला, चाकूने वार करत खून झाला तरी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण आम्ही आजपर्यंत जे पेरत आलो, तेच उगवायला आता सुरुवात झाली आहे. या घटनेसाठी कोणत्याही एका पक्षाच्या आमदारावर ठपका ठेवता येणार नाही. टाळी जशी एका हाताने वाजत नाही, तसेच विधानभवनातील गुंडागर्दीच्या या घटनेसाठी दोन्ही पक्षांचे आमदार सारखेच जबाबदार म्हणायला पाहिजेत. आतापर्यंत बिहार आणि उत्तरप्रदेश विधानभवनात जे घडत होते, ते आता महाराष्ट्राच्या विधानभवनातही घडू लागले आहे. आमचे डोळे आताही उघडले नाहीत तर याच्यापेक्षाही गंभीर स्वरूपाच्या गुन्हेगारी घटना विधानभवनात घडलेल्या आम्हाला पाहाव्या लागतील. जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर म्हणजे एकाला झाकावे आणि दुसऱ्याला काढावे, असे म्हटले पाहिजे. दोन-तीन दिवसांपासून या दोघांमधील तणाव वाढला होता, एक दुसऱ्याला शिवीगाळ करण्यापर्यंत आणि धमक्या देण्यापर्यंत दोघांची मजल गेली होती. त्यामुळे हे दोन्ही आमदार ज्या पक्षाचे आहे, त्या पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांनी याची तातडीने गंभीर दखल घेत दोघांनाही समज द्यायला पाहिजे होती, पण तसे झाल्याचे दिसले नाही. त्यामुळे या दोघांनी आणि त्यांच्या समर्थकांनीही सर्व मर्यादा ओलांडल्या. आपण कसंही वागलो तरी आपले कोणीही काही वाकडे करू शकत नाही, असा समज या दोन्ही नेत्यांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी करून घेतला असावा असे वाटते. जो घटनाक्रम समोर आला, त्यावरून दोन तीन दिवस आधी जितेंद्र आव्हाड यांनी गोपीचंद पडळकर यांना पाहून आणि त्यांना ऐकू जाईल अशा आवाजात मंगळसूत्र चोर असे म्हटले. मुळात आव्हाड यांनी अशी चिथावणीखोर कृती का केली, हे त्यांनाच माहिती. याचीच परिणती गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्यात दुसऱ्या दिवशी एकदुसऱ्याला शिवीगाळ करण्यात आणि धमक्या देण्यात झाली. या दोन आमदारांमधील गंभीर स्वरूपाचे मतभेद समोर आले, पण थोड्याफार फरकाने असेच मतभेद आणखी काही आमदारांमध्येही असू शकतात, त्यामुळे झाला तो प्रकार म्हणजे हिमनगाचे वरचे टोक म्हणायला हरकत नाही. राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्याचे आतापर्यंत म्हटले जात होते, त्याची प्रचीती या घटनेने आणून दिली आहे. काही वर्षांपूर्वी राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचा आढावा घेण्यासाठी वोरा समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने काँग्रेस राजवटीतच आपला अहवाल सादर केला होता, पण अन्य अहवालांचे जसे होते, तसेच या अहवालाचेही झाले. हा अहवालही दाबून ठेवण्यात आला. तो बाहेरही येऊ दिला नाही. पण अहवाल जरी दाबला तरी राजकारणातील गुन्हेगारी दबून थोडीच राहणार? ती वेगवेगळ्या निमित्ताने आणि रूपात समोर येतच असते. जशी ती महाराष्ट्र विधानभवनात पडळकर आणि आव्हाड यांच्यात रूपात समोर आली. विधानभवनाचा परिसर हा विधानसभेच्या अध्यक्षांच्या विशेषाधिकारात असतो. याठिकाणी घडलेल्या कोणत्याही घटनेवर कारवाई करण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांचाच असतो. त्यांनी परवानगी दिल्याशिवाय वा बोलावल्याशिवाय या ठिकाणच्या घटनेसाठी पोलिसही कारवाई करू शकत नाही. मात्र या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवला आहे, असे दिसते. पोलिसांनी या प्रकरणी आ. जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांच्याविरोधात गुन्हा नोंदवला आहे. देशमुख यांना पोलिस घेऊन जात असताना आव्हाड यांनी पोलिस गाडीसमोर धरणे देत कार्यकर्त्यांवरील आपल्या प्रेमाचे प्रदर्शन केले असले तरी आमदार म्हणून त्यांची वागणूक समर्थनीय म्हणता येणारी नाही. आपल्या कार्यकर्त्याची पाठराखण करण्याचा, त्याला कायदेशीर मदत करण्याचा आव्हाड यांना पूर्ण अधिकार आहे, पण याचा अर्थ ते पोलिस कारवाईत अडथळा आणू शकत नाही. त्यामुळेच सरकारी कामकाजात अडथळा आणल्याचा गुन्हा पोलिसांना त्यांच्यावर दाखल करावा लागला. आपण जबाबदार लोकप्रतिनिधी आहे, याचे भान जसे गोपीचंद पडळकर यांनी ठेवायला पाहिजे होते, तसेच ते जितेंद्र आव्हाड यांनीही ठेवायला पाहिजे होते. आपल्या मतदारसंघातील जनतेने आपल्याला त्यांचे प्रश्न सोडवायला, समस्यांना वाचा फोडायला निवडून दिले आहे, याचे भान या दोन्ही आमदारांनी ठेवले नाही. गुंडागर्दीच्या घटनांनी आपण आपल्या पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांच्या गुडबुकमध्ये जाऊ, असा कोणाचा समज असेल तर तो चुकीचा आहे. अशा कृत्यांनी तुम्ही तुमच्या नेत्याच्या गुडबुकमध्ये नाही तर बॅडबुकमध्ये जाता. कारण अशा घटनांनी पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांचीडी अडचण होत असते.

विधानभवनात जे काही घडले, त्याचे कोणालाच समर्थन करता येणारे नाही. प्रत्येकाला या घटनेचा निषेध करावाच लागला. दोषींवर कारवाई करण्याची मागणी करावी लागली. यावेळी जे झाले ते झाले, पण भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, याची काळजी सर्वपक्षीय नेत्यांना घ्यावी लागणार आहे. कारण 'बुंद से गई वो हौद से नहीं आती', याचे भान सगळ्यांनाच ठेवावे लागणार आहे. महाराष्ट्र हे देशातील प्रगतिशील आणि औद्योगिकदृष्ट्या विकसित राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था ही देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत खूप चांगली आहे. त्यामुळे देशात गुंतवणुकीच्यादृष्टीने महाराष्ट्र सर्वांत पुढे आहे. महाराष्ट्राची ही प्रतिमा आम्हाला कायम ठेवायची आहे. महाराष्ट्राचा आम्हाला महाराष्ट्रच ठेवायचा आहे. त्याचा बिहार आणि उत्तरप्रदेश होऊ द्यायचा नाही. त्यासाठी या प्रकरणातील दोषींवर, मग तो कोणत्याही पक्षाचा, सत्ताधारी पक्षाचा का असेना त्याच्यावर कठोरातील कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. हाच या प्रकरणाचा शोध आणि बोध म्हणावा लागेल.

## यंगिस्तान

# आव्हाडांच्या तोंडी गीता!

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या सुरुवातीच्या टप्प्यात सावरकरांच्या सन्मानार्थ एक बैठक झाली. त्यात छोटेसे भाषण करताना सावरकर म्हणाले, ''माझ्याविषयी अनुकूल ग्रह असणारीच मंडळी येथे जमली आहेत; पण प्रतिकूल ग्रह असणारे लोक कोणी जमवले तर मला आनंदच होईल. कारण आपल्याविषयी उलटसुलट सर्व विचार कळणे आवश्यक आहे.'' राजकारणात विरोधक असतात, शत्रू नसतात हे धोरण स्वा. सावरकरांनी व्यवस्थित अंमलात आणलं होतं. इतकंच काय तर समाजकारणातही वैचारिक विरोधकांचा त्यांनी कधीच द्वेष केला नाही. मात्र दुर्दैव असे की त्यांच्या विरोधकांनी त्यांना सुरुवातीपासूनच शत्रू मानले. आजही त्यांचे विरोधक त्यांना शत्रू मानतात. काँग्रेसचे अहिंसक नेते इंग्रज व जिहादींशी वागताना मिळमिळीत धोरण ठेवत, मात्र आपल्याच बांधवांशी ते कठोरपणे वागत. तेव्हा त्यांच्या अहिंसेची नौका कोणत्या वैचारिक वादळात सापडायची कुणास ठावूक. गांधी हत्येनंतर अहिंसेच्या पुजाऱ्यांनी घातलेला हैदोस महाराष्ट्र अजूनही विसरलेला नाही. १०५ मराठी माणसांचा जीव घेणाऱ्या काँग्रेसचा इतिहास रक्ताने माखलेला आहे. हे संस्कार राजकारणात रुजत गेले आणि राजकारण खुनशी होऊन बसले. जर सावरकर प्रभृती नेत्यांच्या हाती सुरुवातीला सत्ता गेली असती तर खरोखरच देशावर चांगले राजकीय संस्कार झाले असते. मात्र चांगले होत असताना दुर्दैव आपल्या माथी लिहिलेलेच आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना दीर्घायुष्य लाभलं असतं तर हिंदू-मराठ्यांचा इतिहास वेगळा असता. कदाचित इंग्रजी सत्ता भारतावर आलीच नसती. पण दुर्दैव पाहा, संभाजी महाराजांची इस्लामी पद्धतीने हत्या झाली. पुढे बाजीराव पेशव्यांनाही कमी आयुष्य लाभले. त्यामुळे पुढची अनेक गणिते चुकली. त्याचप्रकारे स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर काँग्रेसच्या हाती सत्ता गेल्यामुळे चुकीच्या सवयी अंगवळणी पडल्या. चुकीचे धोरण हेच संस्कार झाले तर सज्जनांनाही त्याच धोरणांचा अवलंब करून दुर्जनांशी तसाच व्यवहार करावा लागतो.

हा इतिहास आठवण्याचं कारण म्हणजे सध्या महाराष्ट्रात पडळकर-आव्हाड यांच्यामधील वाद पेटला आहे. गोपीचंद पडळकर हे गावरान तरुण आहेत आणि जितेंद्र आव्हाडांचा इतिहास सर्वांनाच ठावूक आहे व तो तितकासा चांगला नाही. सत्तेचा व पदाचा वापर करून आव्हाडांनी यापूर्वी अनेकदा सर्वसामान्य माणसांवर गुंडगिरी केलेली आहे. तुम्ही त्यांच्या टीव्हीवरील चर्चा पाहिल्या की ते नक्की आमदार आहेत की अरेरावीचा वेगळा व्यवसाय करत असताना चुकून ते आमदार झाले आहेत, असा प्रश्न आपल्याला पडावा इतका त्यांचा इतिहास लोकशाहीला व ते ज्या संवैधानिक पदावर बसले आहेत त्या पदाला लाजवेल असा आहे. थिएटरमध्ये त्यांच्या कार्यकर्त्यांनी एका सज्जन प्रेक्षकाला केलेली मारहाण असो किंवा एका महिलेला आव्हाडांनी दिलेला धक्का असो, ज्यासाठी त्यांच्यावर घाणेरडे आरोप व तक्रारही झाली होती. आव्हाडांची भाषा ही संसदीय नाही हे आपण सर्वच जण जाणतो. अनंत करमुसे या प्रकरणात तर त्यांनी माणुसकीला काळिमा फासणारे वर्तन केले आहे. एका तरुणाला, त्यांच्यावर टीका केली अशा क्षुल्लक कारणावरून त्याचे अपहरण करून त्याला अमानुष मारहाण केली होती. या प्रकरणातील एका हवालदाराला आत्महत्या करावी लागली. करमुसे यांच्या कुटुंबाला प्रचंड मानसिक तणावाखालून जावे लागले. अनंत करमुसे यांना दोन मुली आहेत. त्या मुलींच्या मनावर काय परिणाम झाले असतील? त्यांच्या पत्नीला किती वेदना झाल्या असतील? पण या सर्वांचा विचार सत्ता असताना, मंत्रिपद असताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संवैधानिक पद असताना आव्हाडांनी केला नाही आणि वर राक्षसी कृत्य केलं, संविधानाची गळचेपी केली, लोकशाहीची हत्या केली. हा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान आहे. तो अपमान ते वेळोवेळी करत असतात. तरीही मुखातून ते संविधान व आंबेडकर असे नामस्मरण करत असतात. हा इतका विरोधाभास करणे हे त्यांना कसे जमते हाच मोठा प्रश्न आहे. म्हणजेच ते उत्तम अभिनेते देखील आहेत, असे म्हणावे का?

सर्वांशीच अरेरावीने वागणारे आव्हाड आज पुन्हा एकदा संविधान वगैरेची भाषा करू लागले आहेत. कारण ''मंगळसूत्र चोर'' अशा नाक्यावरच्या पोरासारखी चिडवाचिडवी त्यांनी केली. खोटं वाटत असेल तर तो व्हिडीओ सोशल मीडियावर फिरत आहे. तो पाहिल्यावर आपल्याला या वाक्याची प्रचीती येईल. अशा चिडवाचिडवीनंतर गोपीचंद पडळकर आणि आव्हाडांमधील संघर्ष आणखी पेटला. पडळकरांकडून आपल्यावर शिवीगाळ झाली असल्याचे आरोप आव्हाडांनी केले आहेत. आता तर दोघांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाल्याची बातमी झळकते आहे. यानंतर आव्हाडांनी व्हिक्टिम कार्ड खेळायला सुरुवात केली आहे. ते कार्यकर्ते आपल्यालाच मारायला आले होते, असा आरोप त्यांनी केला आहे. काही दिवस आधी संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड यांच्यावर शाईफेक झाली होती. त्यानंतर ते शरद पवारांना भेटले असल्याची बातमी आली. जितेंद्र आव्हाड हे शरद पवार गटाचे नेते आहेत. संभाजी ब्रिगेड या संघटनेने महाराष्ट्राचं वातावरण दूषित करण्याचा विडा उचलला आहे. हिंदुद्वेष, जातीयवाद, ब्राह्मणद्वेष इत्यादी मुद्दे या व अशा तत्सम संघटनांनी निर्माण केले व त्यास बळ दिले. गायकवाड आणि आव्हाड दोघांचाही शरद पवारांशी जवळचा संबंध आहे. पवार हे अत्यंत ज्येष्ठ नेते आहेत. मात्र त्यांचा संबंध अशा लोकांशीच का येतो, हे कोडं महाराष्ट्राला पडलेलं आहे. असो. तर मुद्दा असा की आव्हाड आता व्हिक्टिम कार्ड खेळत असून लोकशाही व संविधानाचे रक्षण कसे करायचे याचे धडे देत आहेत. हे म्हणजे अफझलखानाने मूर्तिपूजेवर प्रवचन देण्यासारखे झाले नाही का! काही का असेना. आव्हाडांच्या तोंडून गीतेचे पाठ ऐकायला मिळत आहेत. आता तरी त्यांनी या वचनाला धरून वागायला हवे. लोकशाही, संविधानाचे रक्षण ही बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात न होता जितेंद्र आव्हाड यांच्या अंगवळणी पडावे ही ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांनी यापुढे कोणालाच त्रास न देण्याची शपथ घ्यायला हवी व लोकशाहीचे रक्षण करण्याचा खरोखर विडा उचलायला हवा. यासाठी त्यांना माझ्या पूर्ण शुभेच्छा आहेत. बाकी माझे असे स्पष्ट मत आहे की लोकप्रतिनिधींनी कायद्याचे पालन करावे जेणेकरून जनतेला कायदा पाळण्याचे प्रोत्साहन मिळेल. वैचारिक विरोधकांना त्यांनी शत्रू मानू नये म्हणजे राजकारण हसतखेळत होत राहील. परंतु ही जबाबदारी काँग्रेस, डावे व त्या संस्कृतीतील पक्ष व नेत्यांची आहे. कारण वर उल्लेख केल्याप्रमाणे राजकारण दूषित करण्याचं काम यांनीच केलं आहे. आता झालेला चिखल स्वच्छ करण्याचे कामही त्यांनी मोठ्या मनाने हाती घ्यायला हवे. नाहीतर सगळेच पडतील चिखलात आणि तोंड होईल काळं!

जय संविधान. जय लोकशाही!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल फेकरीकर**

# शासकीय सदनिकांचा सदुपयोग व्हावा!

प्रकल्प अथवा शासकीय उपक्रम सुरू करण्यापूर्वी कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांकरिता खास सदनिकांची अथवा वसाहतींची निर्मिती केली जाते. त्या सदनिका उभारताना हेतू चांगला असतो, पण कालांतराने त्यांची वाट लागते अन् शासनाचा पैसा पाण्यात जातो. परिणामी या सदनिका चोरांसाठी नंदनवन ठरतात. असे प्रकार का होतात, का म्हणून शासकीय विभाग याकडे कानाडोळा करतात, याचे उत्तर शोधायची आता वेळ आलेली आहे.

नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील गुमगावात पोलिस कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून सन २०२१ मध्ये सदनिका बांधण्यात आल्या. पण चार वर्षांचा काळ लोटला तरी तिथे राहण्यासाठी पोलिस कर्मचारी, अधिकारी आलेच नाहीत. असाच प्रकार नागपुरातील राजनगरात सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेल्या सदनिकांच्या संदर्भात घडला होता. या राजनगरातील सदनिकांमध्ये लावण्यात आलेली महागडी वीज उपकरणे, दरवाजे, खिडक्या, नळाचे पाईप, तोट्या सर्व काही सामान चोरांनी अक्षरशः लुटून नेले होते. विशेष म्हणजे सर्व सामान चोरांनी लुटल्यानंतर संबंधित विभागाला जाग आली व त्यांनी पुन्हा नव्याने निविदा काढून त्यांची डागडुजी केली. पण वाया गेलेल्या पैशांचे काय? त्याचे उत्तर राज्यकर्त्यांनी विचारलेच नाही.

तसे पाहता शासकीय सदनिका मिळाव्यात याकरिता पूर्वी आणि आजही गरजवंत कर्मचारी, अधिकारी सतत आटापिटा करीत असतात. तिथेही त्यांना वशिला लावून तोडपाणी करावी लागते. एवढे महत्त्व त्या सदनिकांचे आहे. पण संबंधित विभागाचे थोडे दुर्लक्ष झाल्यास त्याच सदनिका चोरांचे धन होते, असे का व्हावे याचे उत्तर शोधून उपाय करण्याची वेळ आलेली आहे. विदर्भात जलसंपदा विभागाकडून अनेक ठिकाणी वसाहती उभारण्यात आल्या आहेत. पशुसंवर्धन विभागानेही शासकीय निवासस्थाने बांधली आहेत. पोलिसांनीही कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधली आहेत. वन विभागासह महसूल खात्यानेही कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उपलब्ध करून दिली आहेत. पण आज त्या सर्व वसाहतींची अवस्था दयनीय झाली आहे. कालांतराने घरे खराब होतात, हे मान्य करावेच लागेल. पण समजा त्या निवासस्थानांची योग्य देखभाल केल्यास ती घरे सहजतेने १०० वर्षे टिकतात. पण ते घर वैयक्तिक नसून, शासनाचे असल्याने त्याकडे लक्ष देण्याची कुणालाही गरज भासलेली नाही. याच कारणाने शासनाने बांधलेली शेकडो घरे आज कचराघर आणि चोरांची निवासस्थाने बनली आहेत.

गावखेड्यात राहण्यासाठी चांगली घरे नाहीत, असे म्हणत कर्मचारी, अधिकारी अपडाऊनला प्राधान्य देतात. अशा कर्मचाऱ्यांना मुख्यालयी ठेवायचे झाल्यास अशा शासकीय सदनिकांचा चांगला उपयोग होऊ शकतो. यातून अनेक फायदे होतील. एक तर शासनाला एचआरए अर्थात घरभाडे भत्ता देण्याची गरज भासणार नाही व कर्मचारी/अधिकारी मुख्यालयी राहतील. लोकहिताच्या कामांना प्राधान्य मिळेल. अशावेळी शासकीय सदनिका कुठल्याही विभागाच्या असो, तिथे त्या रिकाम्या राहिल्यास एक खिडकी योजनेनुसार त्यांची व्यवस्था लावण्याचे काम दोन चार अधिकाऱ्यांवर सोपवायला हवे. याकरिता उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, ठाणेदारांच्या नेतृत्वात प्रत्येक तालुक्याची एक समिती गठित केली जावी. त्यांनी आपल्या तालुक्यात नेमकी किती शासकीय निवासस्थाने आहेत, त्यांची वस्तुस्थिती याचा अभ्यास करून गरजवंत कर्मचाऱ्यांना तिथे राहण्याची व्यवस्था करून द्यावी. जेव्हा शासकीय कर्मचाऱ्यांना अशा सदनिका सहजतेने मिळतील तेव्हा ती घरे चांगली राहतील. तेथील सामान चोरण्याची हिंमत कुणाचीही होणार नाही. शासकीय मालमत्तेचे विद्रुपीकरण थांबेल. तिजोरीतून काढलेल्या पैशाचा विनियोग चांगला होईल. खाजगी लोकांना या सदनिका भाडेतत्त्वावर राहायला दिल्या तरीही फायदा शासनाचा होऊ शकतो. उलट अशा योजनेला अधिक प्रतिसाद मिळेल अन् लोक शासकीय निवासस्थानात राहण्यासाठी प्राधान्य देतील. कारण तिथे घरमालकाची अरेरावीसह कटकट राहणार नाही. शासनाकडे चटई क्षेत्राप्रमाणे दर महिन्याचे भाडे भरायचे अन् आनंदात राहायचे, असाही पवित्रा अनेक जण घेतील. ही योजना चांगली वाटत असली तरी यात अनेक अडचणी आणल्या जातील. मात्र सरकारची ताकद अमर्याद आहे. त्यामुळे सरकारने मनावर घेतले तर नक्कीच शासकीय सदनिकांचा सदुपयोग सहज शक्य आहे. केवळ याकरिता इच्छाशक्तीची गरज आहे. ही इच्छाशक्ती प्रत्यक्षात कृतीत उतरल्यास 'घर असावे शासकीय सदनिकांसारखे' असे गाणे म्हणत लाभार्थी सुखावतील.

९८८१७१७८५९


## तंत्रवेध

# व्हिज्युअल डबिंगमध्ये एआयची चमक

**डॉ. दीपक शिकारपूर**

'ऑटोमेशन' आणि 'कृत्रिम बुद्धिमत्ता' ही आज सगळ्यात वेगाने वाढणारी क्षेत्रे बनत चालली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा ॲनालिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा अधिकाधिक ऑटोनॉमस म्हणजे स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आणि स्वयंभू बनत आहेत यात शंका नाही. इंडस्ट्री ४.०, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि डेटा अनॅलिटिक्स हे उद्याच्या तंत्रजीवनपद्धतीचे अविभाज्य घटक असतील. व्यक्तिगत तर सोडाच, परंतु औद्योगिक, सामाजिक आणि सार्वजनिक पातळीवर संगणकाच्या या विविध अवतारांचे अत्यंत क्रांतिकारी आणि दूरगामी परिणाम होतील. अनेक पारंपरिक संकल्पना मोडीत निघून नव्या पद्धती चटकन रुळतील. आज संगणकीय सूक्ष्म तंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल, किंबहुना तो तसा असणे हेच आपण गृहीत धरू इतक्या सहज हा बदल होणार आहे. याला 'इंटेलिजंट कॉम्प्युटिंग' असे म्हटले जाते. या क्षेत्रातील सतत बदलणारे तंत्रज्ञान आपल्या जगण्याच्या कल्पनाच बदलेल. बदलांचा हा वेग येत्या पाच-दहा वर्षांमध्ये अधिक वाढणार आहे. तो अधिक सर्वव्यापी होईलच, पण ज्या पैलूंमध्ये बदल दिसण्याची आपण कल्पनाही केली नव्हती अशा ठिकाणी तो आढळेल

आगीचा वापर किंवा चाकाच्या शोधापेक्षा कृत्रिम बुद्धिमत्ता हा एक महत्त्वाचा शोध टप्पा ठरू शकतो. हे जगात आतापर्यंतचे सर्वांत वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान आहे. यामध्ये भाषा मॉडेल्स आणि सॉफ्टवेअर एजंट्सद्वारे अनेक व्हाईट-कॉलर नोकऱ्या पूर्णपणे संपवण्याची क्षमता आहे तसेच बुद्धिमान ह्युमनॉइड रोबोट्सच्या वाढत्या पिढीद्वारे अनेक ब्लू-कॉलर नोकऱ्याही संपू शकतात. हा असा पहिला शोध आहे, जो जवळजवळ प्रत्येक प्रकारे मानवापेक्षा श्रेष्ठ असण्याची धमकी देतो. कदाचित आपण विचार केला त्यापेक्षा लवकर. स्टिफन हॉकिंग्ज यांनी हा इशारा अनेक वर्षांपूर्वी दिला होता. आतापर्यंत शास्त्रीय आणि तांत्रिक बाबींमध्ये या तंत्राचा वापर झाला होता. मात्र कलाक्षेत्र यापासून दूर कसे राहील? चित्रपट एका भाषेत बनवला जातो. तो जगभरातील वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचा असतो, तेव्हा डबिंगचा उपयोग केला जातो. यामुळे प्रेक्षकांना चित्रपट त्यांच्या स्वतःच्या भाषेत समजण्यास मदत होते आणि ते कथेला अधिक चांगल्या प्रकारे जोडले जातात. डबिंगमुळे चित्रपटाचा प्रेक्षकवर्ग अनेक पटींनी वाढतो. प्रेक्षकांना उपशीर्षके (सबटायटलस) वाचण्याऐवजी डब केलेला चित्रपट पाहणे अधिक सोयीचे आणि आरामदायक वाटते. विशेषतः, लहान मुले किंवा वाचायला त्रास होणाऱ्यांसाठी डबिंग अधिक उपयुक्त ठरते. एकाच चित्रपटाच्या आवृत्त्या वेगवेगळ्या भाषांमध्ये तयार केल्याने तो प्रादेशिक बाजारपेठेत यशस्वी होऊ शकतो. वेगवेगळ्या भाषांमध्ये चित्रपट पुन्हा शूट करण्यापेक्षा डबिंग करणे अधिक सोपे आणि कमी खर्चाचे ठरते. यामुळे निर्मात्यांना कमी गुंतवणुकीत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचता येते. आपण हे दाक्षिणात्य चित्रपटांबद्दल पाहिले आहे . आता अनेक चित्रपट एकाच दिवशी अनेक भाषांमध्ये प्रदर्शित केले जातात .



डबिंग ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. यामध्ये अनेक टप्पे असतात. सर्वांत आधी मूळ चित्रपटातील संवाद दुसऱ्या भाषेत अचूकपणे भाषांतरित केले जातात. हे काम व्यावसायिक भाषांतरकार करतात, जे दोन्ही भाषा आणि चित्रपटाच्या सांस्कृतिक संदर्भांचे जाणकार असतात. भाषांतर केलेले संवाद पडद्यावर बोलणाऱ्या कलाकारांच्या ओठांच्या हालचालींशी जुळतील अशा प्रकारे तयार केले जातात. यासाठी शब्दांची निवड आणि वाक्यांची रचना काळजीपूर्वक करावी लागते. प्रत्येक पात्रासाठी योग्य आवाज असलेल्या कलाकारांची निवड केली जाते. हे कलाकार मूळ कलाकारांच्या आवाजाशी मिळताजुळता किंवा त्या पात्राच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा आवाज देतात. यासाठी ऑडिशन्स घेतल्या जातात. निवडलेले आवाज देणारे कलाकार स्टुडिओमध्ये जातात आणि पडद्यावर चित्रपट पाहताना भाषांतरित संवाद मायक्रोफोनवर रेकॉर्ड करतात. त्यांना मूळ कलाकारांच्या अभिनयाची आणि वेळेची जुळवाजुळव करावी लागते. रेकॉर्ड केलेले आवाज मूळ चित्रपटातील आवाजाच्या जागी व्यवस्थित जोडले जातात. आवाजाची गुणवत्ता, पार्श्वसंगीत आणि इतर ध्वनी प्रभावांची काळजी घेतली जाते, जेणेकरून डब केलेला भाग नैसर्गिक वाटेल. प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यात, डब केलेले संवाद, संगीत आणि ध्वनी प्रभाव एकत्र मिसळले जातात. यामुळे संपूर्ण चित्रपट एकसंध आणि प्रभावी वाटतो. डबिंग करताना मूळ चित्रपटातील भावना, पोत आणि अभिनयाचा अंदाज कायम राखणे महत्त्वाचे असते. चांगल्या डबिंगमुळे प्रेक्षकांना चित्रपट इतर प्रदेशातील आहे असे वाटत नाही आणि ते कथेमध्ये पूर्णपणे सामील होऊ शकतात.

आज डबिंगमध्ये एआयचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि या प्रक्रियेत अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवत आहे. एआय-आधारित सॉफ्टवेअर मूळ संवादांचे जलद आणि अचूक भाषांतर करू शकते. एआय आता मानवासारखे नैसर्गिक आवाज तयार करू शकते. हे आवाज मूळ कलाकारांच्या आवाजाच्या टोन, लय आणि भावनांशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. 'टेक्स्ट-टू-स्पीच' तंत्रज्ञानाचा वापर करून भाषांतरित मजकूर स्वयंचलितपणे आवाजात रूपांतरित केला जातो. एआय अल्गोरिदम व्हिडीओतील पात्रांच्या ओठांच्या हालचालींचे विश्लेषण करून तयार केलेला आवाज त्यांच्याशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. एआय तंत्रज्ञान मूळ कलाकाराच्या आवाजाची नक्कल करू शकते. यामुळे डब केलेल्या संवादातही मूळ कलाकाराचाच आवाज असल्याचा अनुभव येतो. मूळ कलाकार डबिंगसाठी उपलब्ध नसतात किंवा त्यांचे निधन झालेले असते, अशा वेळी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. काही प्रगत प्रणाली तर व्हिज्युअल माहितीचा वापर करून अधिक नैसर्गिक लिप-सिंक तयार करू शकतात. यामुळे डब केलेला भाग मूळ भागासारखाच दिसतो.

पूर्णपणे एआय-आधारित डबिंगमध्ये भाषिक आणि सांस्कृतिक बारकावे गमावले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे या कामी मानवी देखरेख आवश्यक आहे. एकंदरीत, डबिंग उद्योगासाठी एआय गेम-चेंजर ठरले आहे. यामुळे निर्मिती प्रक्रिया अधिक कार्यक्षम, जलद आणि परवडणारी होत आहे. यामुळे मनोरंजन उद्योगात नवनवीन शक्यता निर्माण होत आहेत. भविष्यात, मानवी सर्जनशीलता आणि एआय तंत्रज्ञानाचे सहकार्य या क्षेत्रांना अधिक उंचीवर घेऊन जाईल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वाचक पत्रे

### विधिमंडळ परिसरातील हाणामारी अशोभनीय

विधिमंडळ परिसरात आ. पडळकर आणि आ. आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये जोरदार हाणामारी झाली. महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारी आहे. महाराष्ट्र विधिमंडळात आजपर्यंत अनेक दिग्गज नेत्यांनी जनतेचे प्रतिनिधित्व केलेले आहे, हा इतिहास आहे. पण काल विधिमंडळ परिसरात जे घडले त्यावरून संपूर्ण देशात महाराष्ट्राची मान खाली झाली आहे.

विधिमंडळात सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधित्व केले जाते. परंतु कालच्या घटनेवरून आपण निवडणुकीत पाठवलेला प्रतिनिधी योग्य आहे का याचा विचार करण्याची वेळ आली आहे. कारण विधिमंडळात सर्वसामान्य जनतेचे प्रश्न कमी अन् राजकीय हेवेदावे यांचीच चर्चा जास्त केली जाते. प्रश्न, समस्या जैसे थे असतात. आमदारांचे समर्थक विधिमंडळ परिसरात येऊन हाणामारी झाल्याची बातमी प्रत्येक टीव्ही वाहिनीवर झळकली. ही बाब निश्चितच चिंतेची आहे. ज्या आमदारांचे समर्थक विधिमंडळ परिसरात आलेत ते गोंधळ घालण्याच्याच उद्देशाने आले असल्याची शंका आमच्यासारख्या सामान्य नागरिकाला आहे. हा गोंधळ पूर्वनियोजित असावा असेच एकंदरीत वाटायला लागले. कारण दोन्ही आमदारांनी



एकमेकांना धमकी दिली होती अन् लगेच ही घटना घडली. टाळी एका हाताने कधीच वाजत नाही. विधानसभा अध्यक्षांनी या दोन्ही आमदारांवर चौकशी करून त्यांची आमदारकीच रद्द करायला हवी. तसेच जे समर्थक आले होते त्याच्यावरही कडक कारवाई करायला हवी. यापुढे अशाप्रकारची कृत्ये करायला धजावणार नाही अशी शिक्षा द्यायला हवी अशीच सर्वसामान्य जनतेची इच्छा आहे.आज कायद्याचा धाक राहिलेला नाही असेच कालच्या घटनेवरून दिसून येते. या गुंडांना अटकही होईल. या गुंडांवर कारवाई केली जाईल. प्रकरण न्यायालयात जाईल. परंतु कालांतराने सबळ पुरावा नाही म्हणून त्यांना न्यायालयाकडून मोकळे सोडले जाईल. परत ते गुंडागर्दी करायला मोकळे. आपले प्रतिनिधी कसे असावे याचा विचार करण्याची वेळ आली आहे. आपला प्रतिनिधी तो कोणत्याही राजकीय पक्षाचा असो, विचारांचा असो तो प्रतिनिधित्व करायला लायक आहे का याचा विचार व्हायला हवा.

**रवींद्र गोविंद पांडे**/नागपूर

### तिसऱ्या कसोटी सामन्याची कारणमीमांसा

लॉर्ड्सवर झालेला भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसरा कसोटी सामना भारताने थोडक्यात गमावला. भारताने इंग्लंडला पहिल्या डावात ३८७ धावांवर रोखल्यानंतर भारताला पहिल्या डावात आघाडी घेण्याची चांगली संधी होती. परंतु आघाडीच्या फलंदाजांनी निराशा केल्यानंतर के. एल. राहुल आणि ऋषभ पंत चांगले जमलेले असताना उपाहाराला तीन चेंडू शिल्लक असताना, उपाहाराच्या आधी शतक पूर्ण करायचे या के. एल.राहुलच्या हट्टापायी ऋषभ पंतला धावबाद व्हावे लागले आणि तिथेच आघाडीची आशा मावळली. कशीतरी इंग्लंडच्या पहिल्या डावाची बरोबरी झाल्यानंतर आपल्या भारतीय गोलंदाजांना इंग्लंडला दुसऱ्या डावात १९२ धावांत रोखण्यात यश आले. तेव्हा भारताला दुसऱ्या डावात इंग्लंडचे हे माफक आव्हान घेऊन जिंकण्याची चांगली संधी असताना तिथेही भारताच्या आघाडीच्या फलंदाजांनी घोर निराशा केली. रवींद्र जडेजाच्या खेळामध्ये कसोटी जिंकण्याची तडफ दिसत नव्हती. तसे पाहता बुमराह आणि मोहम्मद सिराज यांनी तुलनेने चांगला संयम दाखवला. असो खेळ आहे कोणाची तरी हार जीत असणारच. २३ तारखेपासून सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटी सामन्यासाठी भारताला हार्दिक शुभेच्छा.

**धनंजय पांडे**/नागपूर

### शिवकालीन गडांवर उमटली जागतिक मोहर!

छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्र आणि तामिळनाडू या राज्यांतील १२ गडांना 'जागतिक वारसा मानांकन' मिळणे, हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या गडांचे नाव घेताच त्यांनी केलेले पराक्रम डोळ्यांसमोर येतात आणि ऊर अभिमानाने भरून येतो. गनिमी काव्याच्या साहाय्याने पाच पातशाह्यांचा पराभव करून हिंदवी स्वराज्य निर्माण करणे, हा पराक्रम जागतिक स्तरावर गणल्या गेलेल्या अनेक पराक्रमांमधील एक महान पराक्रम आहे. म्हणूनच, छत्रपतींच्या गडांना 'युनेस्को'कडून मिळालेले मानांकन हा केवळ त्या गडांचा नव्हे, तर हिंदवी स्वराज्याचा सन्मान आहे, असे म्हणणे योग्य ठरेल.

या निमित्ताने एकच मागणी करावीशी वाटते, केवळ १२ गड नव्हे, तर छत्रपतींच्या प्रत्येक गडाला जागतिक वारसाचे मानांकन मिळायला हवे. तसेच गडांवर अन्य धर्मीयांनी केलेली अतिक्रमणे तत्काळ दूर करून सर्व गड अतिक्रमणमुक्त करावेत. हीच खऱ्या अर्थाने छत्रपतींच्या गडांना दिलेली मानवंदना ठरेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# युवा सेनेच्या साप्ताहिक श्रमदान मोहिमेस वृक्षारोपणाने प्रारंभ

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

युवा सेनेतर्फे केलेल्या साप्ताहिक श्रमदान मोहिमेचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी वृक्षारोपणाने झाले. शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांच्या हस्ते मंजुषा सोसायटीत वृक्षारोपण करण्यात आले. मंजुषा सोसायटीत गवत आणि झुडपांमुळे सापांचा उपद्रव वाढला होता. परिसरात पाणी साचल्यामुळे डासांचाही त्रास होत होता. त्यामुळे युवा सेनेने परिसराची स्वच्छता करून झाडे लावली. यावेळी देशी झाडांचे महत्त्व वृक्षमित्र मनोज देवकर यांनी दिले. श्री. क्षीरसागर यांच्या हस्ते झाडे लावण्यात आली. यावेळी चंद्रकांत माने, पराग माने, मल्लिकार्जुन वाडेकर, सदाशिव उंब्रजकर, प्रवीण कुलकर्णी, आशिष सराफ, दिनेश बिराजदार, विकास माने, प्रकाश बंडगर, निशिकांत खेडेकर, सुदर्शन साठे, दीपक पाटील, गजानन कदम, रमेश कुमार, सचिन गुंतूनल, गणेश तुपडोळे, इरफान गडावले व सभासद उपस्थित होते.

**नागरिकांच्या समस्या सोडवू**

आठवड्यात एक दिवस श्रमदान करून नागरीकांच्या समस्या जाणून घेउन त्या सोडवण्याचा उपक्रम हाती घेणार आहोत.

**-प्रियदर्शन साठे,**
**जिल्हाप्रमुख, युवा सेना**



---

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १२/२०२५

### अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

**१. श्री. श्रीशैल अंबादास साळुंखे** -- **अर्जदार**
**२. सौ. लक्ष्मी देवराज गाडीवड्डर**
**विरुध्द**
**कोणीही नाही** -- **सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदारांने अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात मयत आई कलावती अंबादास साळुंखे व वडील अंबादास चौडप्पा साळुंखे यांचे कायदेशीर वारसदार अर्जदार नं. १ व २ यांनीच असून, सदर अर्ज या मे. कोर्टाकडे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी याबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत अथवा नेमलेल्या तारखेस दिनांक २०/८/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण केले दिनांक :-१६/०७/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

**हुकुमावरुन**
**सही/-**
**सह. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय,**
**अक्कलकोट**

---

**SJSB सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
Multi-State Scheduled Coop.Bank
मल्टी-स्टेट शेड्युल्ड को.ऑप.बँक

गगनभरारी, शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर ४१३००७
फोन क्र.: ०२१७-२७४ ११०१ ते ०५
ई-मेल: info@sjsbbank.com. वेबसाईट: www.sjsbbank.com

## जाहीर ताबा नोटीस

**नियम ८(१)**

(दि सेक्युरिटायझेशन रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस & इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये)

तमाम लोकांस, कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्या अर्थी सोलापूर जनता सहकारी बँक लि. मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम १३ (२) अन्वये दि.२२/०४/२०२५ रोजी **कर्जदार ॲग्रीम इंटरनॅशनल प्रो. प्रा. सौ. अनुराधा अमित चंडक, पत्ता ६९५, चाटी गल्ली, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर. ४१३००२**

**जामीनदार (१) श्री. जगदीशप्रसाद चुनीलाल खंडेलवाल, (२) श्री. पवन जयकिशन खंडेलवाल, (३) सौ. कांता नंदकिशोर खंडेलवाल, (४) श्री. दीपक नंदकिशोर खंडेलवाल, (५) श्री. दिनेश नंदकिशोर खंडेलवाल,** यांना मागणी नोटीस पाठवून रक्कम **रु.१,३३,५९,०५६.६२ (अक्षरी रुपये एक कोटी तेहतीस लाख एकोणसाठ हजार छप्पन आणि पैसे बासष्ट मात्र)** आणि देय असलेले पुढील व्याज व इतर खर्च अशी संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्यापासून ६० (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते. परंतु नोटीस मिळूनही सदर उपरोक्त कर्जदार/गहाणकार व जामीनदार यांनी उपरोक्त रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत दि. ०१/०४/२०२५ पासूनचे व्याज इतकी येणेबाकी असल्यामुळे त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, खालील सही करणार यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेल्या तारण स्थावर मिळकतीचा दि. १५/०७/२०२५ रोजी दि सेक्युरिटायझेशन रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३ (४) नियम ९ अन्वये **प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे.**

सबब उपरोक्त कर्जदार/गहाणकार/जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये. या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही, याची नोंद उपरोक्त कर्जदार/गहाणकार/जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी.

**परिशिष्ट**

**तारण स्थावर मालमत्ता वर्णन**

१) सौ. कांता नंदकिशोर खंडेलवाल २) श्री. दीपक नंदकिशोर खंडेलवाल ३) श्री. दिनेश नंदकिशोर खंडेलवाल यांचे मालकीची जिल्हा सोलापूर ता. उत्तर सोलापूर येथील सोलापूर महानगरपालिका, सोलापूर, या हद्दीतील भवानी पेठ, येथील टी.पी. स्कीम क्रमांक २, सि.स.नं. ८९अ/२६, लेआउट क्रमांक ए/९/१ याचे एकूण क्षेत्र १९४.९० चौ.मी. आणि त्यावर जुने आरसीसी बांधकाम असलेले ज्याचे बांधकाम क्षेत्र १८५.०० चौ.मी. आहे. त्यावरील सध्याचे आणि भविष्यातील बांधकामासहची जागा ज्याची सीमा पूर्वः रस्ता, पश्चिमः सि.स.नं. ८९ अ/३१, दक्षिणः सि.स.नं. ८९ अ/३२, उत्तरः सि.स.नं. ८९अ/१८.

दिनांक : १९/०७/२०२५
ठिकाण : सोलापूर.

शिक्का

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप. बँक)**

---

## मनोरमा मल्टीस्टेट को-ऑप. केडीट सोसायटी लि. सोलापूर

**मुख्य कार्यालय : प्लॉट नं. बी-१५९, इंदिरा नगर, विजापूर रोड, सोलापूर फोन : ९४०४७४७०९९**
manoramamultistatehrrediffmail.com

**पाहिजेत**

मनोरमा मल्टीस्टेट मुख्य कार्यालय सोलापूर येथे खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. नं. | पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | पद संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | MANAGER | 1) B.COM/M.COM/M.B.A./ G.D.C & A.<br>2) Digital Banking Knowledge<br>3) बँकींग किंवा सहकारी पतसंस्था १० ते १५ वर्षाचा अनुभव | ०६ | १ ते ३ सर्व पात्रता व पुर्तता आवश्यक |
| २ | MRKETING OFFICER | 1) B.COM/M.COM/M.B.A.<br>2) Digital Banking Knowledge,<br>3) बँकींग क्षेत्रातील १० ते १५ वर्षाचा अनुभव,<br>4) सोशल मिडीयाचा अनुभव<br>5) मार्केटींगचा ५ते १० वर्षाचा अनुभव आवश्यक | ०६ | १ ते ५ सर्व पात्रता व पुर्तता आवश्यक |

सोलापूर शहरातील स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

इच्छुक उमेदवारांनी manoramamultistatehrrediffmail.com या मेलवर अर्ज पाठवावेत किंवा प्रत्यक्ष अर्जासह वरील पत्यावर समक्ष भेटून प्रशासन विभागाकडे अर्ज सादर करावेत.

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

---

## जाहीर प्रसिध्दीकरण

तमाम लोकांना कळविण्यात येते की, डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर महानगरपालिका सोलापूर शहर हद्दीतील **न्यु पाच्छा पेठ** येथील **लक्ष्मी नरसिंह झोपडपट्टी** मधील म्युनिसीपल घर नंबर १४, यांसी यांसी सो.म.पा मिळकत क्र.०८०९३०१९३२, यांसी एकूण क्षेत्रुळ ३६० चौ. फूट इतकी असून या वर्णनाची घरजागा व यातील तंदगभूत वस्तूसह.

ज्याअर्थी वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही मूळतः **यल्लप्पा ईरय्या यनगंटी** यांच्या कब्जे वहिवाटीची होती. आमचे अशिल नं. १ भूमय्या यल्लप्पा यनगंटी, २ लक्ष्मण यल्लप्पा यनगंटी व ३. विरेश यल्लप्पा यनगंटी यांचे वडिल **यल्लप्पा ईरय्या यनगंटी** यांचे **ता.०९/१०/२०१८** रोजी निधन झाले आहे तसेच आमचे अशिलांचे आई **मल्लव्वा यल्लप्पा यनगंटी** यांचे **ता.१०/१२/२०२३** रोजी निधन झाले आहे. वर नमूद मिळकतीचे मयताच्या पश्चात आमचे अशिल नं. १ ते ३ हेच वारसदार आहेत. तरी नमूद केलेल्या मिळकतीच्या ग.व.सु च्या कर आकारणी दप्तरी मयत यल्लप्पा ईरय्या यनगंटी यांचे नाव कमी करून आमचे अशिलांची नावाची नोंद करण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना विशेषतः जिल्हा सोलापूर शहर सोलापूर लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यानंतर ०८ दिवसांचे आंत मयत यल्लप्पा ईरय्या यनगंटी यांचे वारसदारांचे नावे वर नमूद मिळकतींस नोंद करण्यासाठी कोणाचीही व कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास याखाली नमूद विधिज्ञ यांचे पत्यावर लेखी स्वरूपात पुराव्यानिशी सादर करावी. ही जाहीर नोटीस दिली ता.१८/०७/२०२५.

**सही/-**
**ॲड दिपाली बी. मद्दूर**
**बी.ए., एल एल. बी.,**
**पदमाई निवास, प्लॉट नं. ३३, आदर्श नगर,**
**सोलापूर ९८२३४३०२२२**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

---

## जाहिर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३६ /२०२५

### अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

**श्री. जमील अहमद जंगबहादूर बाबुडे** -- **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** -- **सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदारांने अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात अर्जदाराचे वडील कै. जंगबहादूर चाँदसाब बाबुडे हे दि. ०२/१०/२०११ रोजी मयत झालेले असून, तसेच अर्जदारांची आई रजियाबी जंगबहादूर बाबुडे ह्या दि.१२/११/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. त्या दोघांच्या मृत्यू पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत हे जाहीर होऊन मिळणेकरिता या मे. कोर्टाकडे वारसा असलेबाबत जाहीर करणाचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी याबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत अथवा उक्त नेमलेल्या तारखेस दिनांक २२/८/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस जाहीर करुन देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण केले दिनांक : १८/०७/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सह. अधिक्षक**
**दिवाणी व फोजदारी न्यायालय, अक्कलकोट**

---

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** : डि. व सब डि. सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील जुना सर्व्हे नं. २५९/१ यासी गट नं. ५१८/१/२ यापैकी प्रियदर्शनी नगर मधील प्लॉट नं. ७६ यापैकी उत्तर बाजुची खुली प्लॉट जागा याचे एकुण क्षेत्र ७२० चौ. फुट अथवा ६६.९१ चौ. मीटर इतकी आहे.

यासी चतुः सीमा :- पुर्वेस :-प्लॉट नं. ७५ दक्षिणेस : प्लॉट नं. ७६ पैकी उर्वरीत प्लॉट जागा पश्चिमेस :-रस्ता उत्तरेस :- ओपन स्पेस

येणेप्रमाणे चतुःसीमेतील प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

ही मिळकत, १. श्रीमती कस्तुराबाई सोमनाथ गुंजटकर, २. श्री. लक्ष्मण सोमनाथ गुंजटकर, ३. उज्वला सोमनाथ गुंजटकर, ४. विशाल सोमनाथ गुंजटकर, सर्व रा.डी-२०८, भारत नगर, कुमठा नाका, सोलापूर, यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे, आमचे अशिल ही प्लॉट जागा खरेदीने घेणार आहेत, तरीही या प्लॉट जागेवर कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. १८/०७/२०२५

शिक्का

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड. राजरतन द.श्रीराम**
**ऑ. १६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

---

## जाहिर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८१/२०२५
नि.नं. ५

### बार्शी येथील मे. अति. जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात

**रुद्रनील देवानंद वारगड, वय - १०**
अ.पा.क. आई लतीका देवानंद वारगड
वय २९ वर्षे, धंदा शेती व घरकाम, -- **अर्जदार**
रा. शिवाजी नगर, माढा, ता. माढा.
जि. सोलापूर
**विरुध्द**
**महाराष्ट्र शासन** -- **सा.वाला**

**अर्ज गार्डीयन शीप ॲक्ट १९५६ व कलम २९ गार्डीयन ॲण्ड वॉर्डस् ॲक्टप्रमाणे-**

ज्या अर्थी, जिल्हा व जिल्हा परिषद सोलापूर, सब जिल्हा व तालुका माढा पैकी मौजे माढा येथील अर्जदाराचे मालकीची व कब्जा वहिवाटीची व ७/१२ सदर नांवे मालकी हक्काने असलेली शेत जमीन मौजे माढा जि. सोलापूर

| गट नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ४२/१ | १-३६ | ३-७५ |

मुळ जमीन याच्या चतुःसिमा पुर्वेस गट नं. ४५, पश्चिम रस्ता, दक्षिण - गट नं. ४१ व उत्तर गट नं. ४३. उपअधिक्षक भूम अभिलेख, माढा यांचे कार्यालयातून प्राप्त संयुक्त मोजणी नकाशा नुसार संपादित/खरेदी क्षेत्राचा तपशील प्रत्यक्ष पंचनाम्यानुसार संपादित/खरेदी क्षेत्र खालील प्रमाणे-

| गट नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै |
|---|---|---|
| ४२/१ | ०-११ | ०-३३ |

**चतुःसिमा**

| पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
|---|---|---|---|
| गट नं. | रस्ता | गट नं. | गट नं. |
| ४५ | | ४२ | ४२ |

येणे प्रमाणे मिळकती आतील तद्ंगभूत वस्तुसह सदर मिळकत ही अज्ञान अर्जदार रुद्रनील देवानंद वारगड यांचे पालनकर्ता आई लतीका देवानंद वारगड यांचे मालकी वहिवाटीची तसेच सहहिस्सेदार १३ लोक यांची असून रेकॉर्डला मालकी हक्कात नोंद आहे. यातील अर्जदार हा अज्ञान असून त्याचे तर्फे अ.पा.क म्हणून पालनकर्ता आई लतीका देवानंद वारगड यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. अज्ञान अर्जदार यांचे पुढील उच्च शिक्षणासाठी व घरगुती अडचणी, कपडालत्ता, औषधपाणी यासाठी तसेच अज्ञान अर्जदाराचे हिम्म्याची मिळकत महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागातर्फे कार्यकारी अभियंता उजनी धरण व्यवस्थापन भिमा नगर, ता. माढा यांना अशान' अर्जदाराचे हिश्श्याची मिळकत विक्री करणे जरूरीचे झाले आहे, अशा परीस्थितीत वर नमूद यातील अज्ञान अर्जदार याचे हिस्स्याचे मालकीची मिळकत महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागातर्फे कार्यकारी अभियंता उजनी धरण व्यवस्थापन भिमा नगर, ता. माढा यांना विक्री करणेस मे. कोर्टाची परवानगी मिळणे जरूरीचे आहे त्यासाठी अर्जदाराचा हा अर्ज आहे.

त्या अर्थी, वरील मिळकतीचे अज्ञान अर्जदारांचे हिस्स्याचे मालकी हक्काबाबत अगर विक्री हस्तांतरण करणेचे व्यवहारास कोणाची काहीही हरकत अडथळा असल्यास त्यांनी सदर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाचे आत किंवा पुढील नेमली ता. २२/८/२०२५ रोजी सदर अर्जाचे कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर त्यांचे तर्फे मुखत्यार वकील यांनी हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाची हरकत अडथळा न आल्यास कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून अर्जाप्रमाणे अर्जदाराची मागणी मंजूर करणेत येईल. कळावे हे प्रसिध्दीकरण दिले. ता. १६/७/२०२५

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**

---

## जाहीर समन्स

### मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा), सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप असोसिएशन लि., सोलापूर ११३ (अ), सिध्देश्वरपेठ, स्टेट बैंक ऑफ इंडीया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर** -- **अर्जदार बँक**
अंत्रोळीकर शॉपींग सेंटर, दत्तचौक, सोलापूर
**विरूध्द**
खालील तपशीलातील नमूद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद -- **जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | दावा रक्कम | जाब देणार क्रमांक जाम देणार याचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ८०/२५-२६ | ८४८३६.०० | ३<br>४ | लक्ष्मीबाई अशोक पाटील<br>रा.३५९, कैकाडी गल्ली, उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>फरीदा युसुफ पठाण<br>रा.६१७, पंजाब तालीम, उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर |
| २ | ८१/२५-२६ | ८३६३८.०० | २<br>३<br>४ | श्रीविद्या शेखर वसम<br>रा. वज्रेश्वरी नगर, पुलगम कारखाना जावळ, अक्कलकोट रोड एमआयडीसी, उत्तर सोलापूर, सोलापूर,<br>करुणा श्रीधर यनगंदुल<br>रा. नवीन पाच्छा पेठ, पंचमुखी हनुमान मंदिर, उत्तर सोलापूर, सोलापूर<br>रुक्मिणी राजेश वडजे<br>रा. झोपडपट्टी क्रमांक ५, गांधी नगर, उत्तर सोलापूर, सोलापूर |
| ३ | ८२/२५-२६ | ८३६३८.०० | १<br>३<br>४ | वसम श्रीविद्या शेखर<br>रा. वज्रेश्वरी नगर, पुलगम कारखाना जावळ, अक्कलकोट रोड एमआयडीसी, उत्तर सोलापूर, सोलापूर,<br>करुणा श्रीधर यनगंदुल<br>रा. नवीन पाच्छा पेठ, पंचमुखी हनुमान मंदिर, उत्तर सोलापूर, सोलापूर<br>रुक्मिणी राजेश वडजे<br>झोपडपट्टी क्रमांक ५, गांधी नगर, उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| ४ | ८३/२५-२६ | ८३६३८.०० | १<br>३<br>४ | यनगंदुल करुणा श्रीधर<br>रा. नवीन पाच्छा पेठ, पंचमुखी हनुमान मंदिर, उत्तर सोलापूर, सोलापूर<br>श्रीविद्या शेखर वसम<br>रा. वजेश्वरी नगर, पुलगम कारखाना जावळ, अक्कलकोट रोड एमआयडीसी, उत्तर सोलापूर, सोलापूर<br>रुक्मिणी राजेश वडजे<br>रा. झोपडपट्टी क्रमांक ५, गांधी नगर, उत्तर सोलापूर, सोलापूर, |
| ५ | ८४/२५-२६ | ८३६३८.०० | १<br>३<br>४ | वडजे रुक्मिणी राजेश<br>रा. झोपडपट्टी क्रमांक ५, गांधी नगर, उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>श्रीविद्या शेखर वसम<br>रा. वज्रेश्वरी नगर, पुलगम कारखाना जावळ, अक्कलकोट रोड एमआयडीसी, उत्तर सोलापूर, सोलापूर,<br>करुणा श्रीधर यनगंदुल<br>रा. नवीन पाच्छा पेठ, पंचमुखी हनुमान मंदिर, उत्तर सोलापूर, सोलापूर |
| ६ | ८५/२५-२६ | ८५७७७.०० | १<br>२<br>४<br>५ | शेख सीमा इम्तियाज<br>रा. मित्रा नगर, शेळगी, उत्तर सोलापूर, सोलापूर,<br>पद्मा संजय शिरूडे<br>रा. २६/२, लोकमंगल बँक जवळ, हैदराबाद रोड, शेळगी, उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>सुनिता संजय सुरवसे<br>रा. धायगोडे वाडा, लक्ष्मी मंदिराजवळ, शेलागी, मित्रा नगर, अक्कलकोट रोड एमआयडीसी, दक्षिण सोलापूर, सोलापूर.<br>निलाबाई दिलीप शिंदे<br>रा. शिवगंगा नगर, मारुती मंदिराजवळ, शेळगी, अक्कलकोट रोड एमआयडीसी, दक्षिण सोलापूर, सोलापूर. |
| ७ | ८६/२५-२६ | ८५७७७.०० | १<br>२<br>३<br>५ | शिंदे निलाबाई दिलीप<br>रा. शिवगंगा नगर, मारुती मंदिराजवळ, शेळगी, अक्कलकोट रोड एमआयडीसी, दक्षिण सोलापूर, सोलापूर,<br>सीमा इम्तियाज शेख<br>रा. मित्रा नगर, शेळगी, उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>पद्मा संजय शिरूडे<br>रा. २६/२, लोकमंगल बँक जवळ, हैदराबाद रोड, शेळगी, उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>सुनिता संजय सुरवसे<br>रा. धायगोडे वाडा, लक्ष्मी मंदिराजवळ, शेलागी, मित्रा नगर, अक्कलकोट रोड एमआयडीसी, दक्षिण सोलापूर, सोलापूर. |
| ८ | ८७/२५-२६ | ८३२५२.०० | १ | शिंदे ज्योती बाबुराव<br>रा. २६, पत्रा तालीम जवळ, उत्तर कसाबा, सोलापूर, |
| ९ | ८८/२५-२६ | ८३२०२.०० | २ | ज्योती बाबुराव शिंदे<br>रा. २६, पत्रा तालीम जवळ, उत्तर कसाबा, सोलापूर |
| १० | ८९/२५-२६ | ८३५२४.०० | ३ | मंजुश्री शिवलिंग भद्रशेट्टी<br>रा. ७. तोडकरी वस्ती, आकाश नगर, बाळे, उत्तर सोलापूर, सोलापूर, |
| ११ | ९०/२५-२६ | ८३३०२.०० | १<br>२<br>३ | जठाडे मंगल मारुती<br>रा. १५६, उत्तर कसबा, लोणार गल्ली, उत्तर सोलापूर, सोलापूर,<br>कल्पना मदन वाडेकर<br>रा. २२५/२६, उत्तर कसबा, उत्तर सोलापूर, सोलापूर<br>रुपाली अनिकेत थोरात<br>रा. ३०, उत्तर कसबा, उत्तर सोलापूर, सोलापूर, |
| १२ | ९१/२५-२६ | ७०२३२.०० | २<br>३<br>४ | स्मिता चंद्रकांत नायकु<br>रा. ३९९, दक्षिण कसाबा, चौपाड, उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>आशा पंकज यादव<br>रा. ११, दक्षिण कसबा, लक्ष्मी मार्केट रोड, उत्तर सोलापूर, सोलापूर,<br>सुनिता अशोक बंडगर<br>रा. २२१, उत्तर कसाबा, लोणार गल्ली, उत्तर सोलापूर, सोलापूर, |
| १३ | ९२/२५-२६ | ८३३०२.०० | १<br>३<br>४ | बंडगर सुनिता अशोक<br>रा. २२१, उत्तर कसाबा, लोणार गल्ली, उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>स्मिता चंद्रकांत नायकु<br>रा. ३९९, दक्षिण कसाबा, चौपाड, उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>आशा पंकज यादव<br>रा. ११, दक्षिण कसबा, लक्ष्मी मार्केट रोड, उत्तर सोलापूर, सोलापूर |
| १४ | ९३/२५-२६ | ८३३०२.०० | १<br>३<br>४ | यादव आशा पंकज<br>रा. ११, दक्षिण कसबा, लक्ष्मी मार्केट रोड, उत्तर सोलापूर, सोलापूर<br>स्मिता चंद्रकांत नायकु<br>रा. ३९९, दक्षिण कसाबा, चौपाड, उत्तर सोलापूर, सोलापूर<br>सुनिता अशोक बंडगर<br>रा.२२१, उत्तर कसाबा, लोणार गल्ली, उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| १५ | ९६/२५-२६ | ८४१८६.०० | ३<br>४ | लक्ष्मीबाई अशोक पाटील<br>रा. ३५९, कैकाडी गल्ली, उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>फरीदा युसुफ पठाण<br>रा-६१७, पंजाब तालीम, उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| १६ | ९७/२५-२६ | ८३८७०.०० | २<br>४ | प्रतिभा सतीश साळुंके<br>रा-१०४, गोल्ड फिंच पेठ, चौपाड विठ्ठल मंदिर समोर, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>संगीता राजेंद्र भागानागरे<br>रा. घर क्र. २७६/६, माळी गल्ली, उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| १७ | ९८/२५-२६ | ८६५२०.०० | १<br>२ | भागानागरे संगीता राजेंद्र<br>रा. घर क्र. २७६/६, माळी गल्ली, उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर<br>प्रतिभा सतीश साळुंके<br>रा. १०४, गोल्ड फिंच पेठ, चौपाड विठ्ठल मंदिर समोर, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| १८ | ९९/२५-२६ | ८६४७०.०० | १<br>३ | शिंदे निर्मला बाबुराव<br>रा. २६, उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>रेखा गणेश माने<br>रा. उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर |
| १९ | १००/२५-२६ | ८६४७०.०० | १<br>३ | माने रेखा गणेश<br>रा. उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर,<br>निर्मला बाबुराव शिंदे<br>२६, उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर, |
| २० | १०२/२५-२६ | ८६९५३.०० | २<br>३ | सायराबानु रफीक शेख<br>रा. उत्तर कसबा, उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>साहेरा समीर तांबोळी<br>रा-६१२, उत्तर कसबा, उत्तर सोलापूर, सोलापूर |
| २१ | १०३/२५-२६ | ८९६५३.०० | ३<br>४ | सायराबानु रफीक शेख<br>रा. उत्तर कसबा, उत्तर सोलापूर, सोलापूर,<br>साहेरा समीर तांबोळी<br>रा. ६१२, उत्तर कसबा, उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| २२ | १०४/२५-२६ | ९२६०१.०० | १<br>४ | शेख कामृना फारुक<br>रा. ६१२ उत्तर कसबा, उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>बीबी बेगम मेहबुब बिजापुरे<br>रा.६१४, उत्तर कसबा, उत्तर सोलापूर, सोलापूर |
| २३ | १०५/२५-२६ | ७८९३७.०० | २<br>४ | कामृना फारुक शेख<br>रा.६१२ उत्तर कसबा, उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>बीबी बेगम मेहबुब बिजापुरे<br>रा. ६१४ उत्तर कसबा, उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| २४ | १०६/२५-२६ | ८९६८७.०० | १ | कांबळे रसिक कैलास<br>रा. एमआयडीसी चिंचोली, कोंडी, उत्तर सोलापूर, सोलापूर |
| २५ | १०९/२५-२६ | ८९५८७.०० | २<br>३ | मंगल विवेकानंद रेड्डी<br>रा. मु पोस्ट राहुती, कोंडी, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>सविता रमेश चव्हाण<br>रा. घर क्रमांक ४२, कोंडी, उत्तर सोलापूर, सोलापूर, |
| २६ | ११०/२५-२६ | ८९६८७.०० | १<br>३ | रेड्डी मंगल विवेकानंद<br>रा. मु पोस्ट राहुती, कोंडी, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर<br>सविता रमेश चव्हाण<br>रा. घर क्रमांक ४२, कोंडी, उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| २७ | १११/२५-२६ | ८९६८७.०० | १<br>३ | चव्हाण सविता रमेश<br>रा. घर क्रमांक ४२, कोंडी, उत्तर सोलापूर, सोलापूर<br>मंगल विवेकानंद रेड्डी<br>रा. मु पोस्ट राहुती, कोंडी, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर |
| २८ | ११२/२५-२६ | ९२६१२.०० | २ | नंदा दिलीप सरडे<br>रा. हांडे प्लॉट, जुना पुना नाका, मुरारजी पेठ, उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| २९ | ११४/२५-२६ | ९०५९८.०० | ३ | विजय पांडुरंग भोसले<br>रा. मु. गुळवंची, पोस्ट करंबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| ३० | ११५/२५-२६ | ९२५०९.०० | ३ | पद्मिनी गोकुळ गायकवाड<br>रा. पुणे रोड, मु पोस्ट कोंडी, उत्तर सोलापूर, सोलापूर |
| ३१ | ११६/२५-२६ | ९२५०९.०० | १ | गायकवाड पद्मिनी गोकुळ<br>रा. पुणे रोड, मु पोस्ट कोंडी, उत्तर सोलापूर, सोलापूर, |
| ३२ | ११७/२५-२६ | ९२५०९.०० | ३ | पद्मिनी गोकुळ गायकवाड<br>रा. पुणे रोड, मु पोस्ट कोंडी, उत्तर सोलापूर, सोलापूरः |
| ३३ | १२२/२५-२६ | ९२१३०.०० | १<br>२ | केंगरे सुजाता हणमंतू<br>रा. निलम नगर, मराठी शाळेजवळ, सोलापूर.<br>गुरुबाई नागेश कल्लूर<br>रा.५५२ प्रियदर्शनी नगर, शरण मठजवल, ता. दक्षिण सोलापूर, सोलापूर. |
| ३४ | १२७/२५-२६ | ९२४४३.०० | १<br>३ | माने लक्ष्मी सुनील<br>रा.-४३८, बाळीवेस, उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>जकिया शेरखान खान<br>रा.६१५, उत्तर कसबा, पंजाब तालीम, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| ३५ | १२८/२५-२६ | ९२४४३.०० | १<br>२ | खान जकिया शेरखान<br>रा. ६१५, उत्तर कसबा, पंजाब तालीम, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर, ४१३००७.<br>लक्ष्मी सुनील माने<br>रा. ४३८, बाळीवेस, उत्तर कसबा, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| ३६ | १२९/२५-२६ | ९१५६३.०० | ३ | शाहीन यासीन चंदरगे<br>रा. लक्ष्मी नगर, ता. उत्तर सोलापूर, बाळे, सोलापूर |

याकामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाब देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतू जाब देणार समन्स रूजू न झाल्याने/त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार- **शुकवार दि. ०१.०८.२०२५ रोजी दुपारी १२.००** वाजता दाव्यासंबंधीच्या कागदपत्रासह आपण या कार्यालयात हजर व्हावे.

या नोटीसीद्वारे जाव देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रदद् समजण्यात येईल.

म्हणून दिनांक - १८/०७/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुदेसह हे जाहीर समन्स दिले.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स्**
**को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - २१

## लाँग रनसाठी तयारी कशी करावी?

लाँग रन म्हणजे दीर्घ अंतरासाठी धावणे, जे स्टॅमिना वाढवण्यासाठी आणि मॅरेथॉनसारख्या स्पर्धांसाठी अत्यंत महत्त्वाचे असते. योग्य तयारी न करता लाँग रन केल्यास थकवा, दुखापत किंवा प्रेरणेत घट येऊ शकते. त्यामुळे लाँग रनसाठी योग्य तयारीची काही आवश्यक पावले

### लाँग रनची पूर्वतयारी

**१. लक्ष्य आणि अंतर निश्चित करा :** आपल्या फिटनेस पातळीच्या आधारे लाँग रनचे लक्ष्य निश्चित करा. सुरुवातीला तुमच्या आठवड्यातील सरासरी अंतराच्या १०-१५% जास्त अंतर ठरवा. उदाहरणार्थ, जर तुम्ही आठवड्यात ३० किमी धावत असाल, तर लाँग रनसाठी ३३-३५ किमीचे लक्ष्य ठेवा.

**२. योग्य मार्ग, वेळ निवडा :** ट्रॅफिक फ्री, सुरक्षित, आणि थोडे चढ-उतार असलेला मार्ग निवडा. सकाळची वेळ उत्तम असते, कारण वातावरण थंड आणि ताजेतवाने असते.

**३. शूज आणि कपड्यांची तयारी :** आरामदायक आणि टिकाऊ रनिंग शूज निवडा. हलके, किंचित मोठे आणि कुशनिंग असलेले शूज लाँग रनसाठी उत्तम असतात. श्वासोच्छ्वासक्षम कपडे घाला आणि थंड वातावरणात थरदार कपड्यांचा वापर करा.

### धावण्याआधीची तयारी

**१. वॉर्म-अप :** धावण्याआधी १०-१५ मिनिटे डायनॅमिक स्ट्रेचिंग आणि लाइट जॉगिंग करून शरीर गरम करा. यामुळे स्नायूंची लवचिकता वाढते.

**२. आहार व हायड्रेशन :** धावण्याच्या २-३ तास आधी कार्बोहायड्रेट्सयुक्त नाश्ता घ्या. उदा. ओट्स, केळी,बटाटा, रताळे, भात किंवा संपूर्ण धान्याचे ब्रेड. धावण्याआधी आणि दरम्यान हायड्रेशनची काळजी घ्या. लाँग रनसाठी पाणी, इलेक्ट्रोलाइट्स, खजूर, संत्री, मीठ, चॉकलेट, कॅफेन युक्त कोल्डड्रिंग, जेल सोबत ठेवा.

### लाँग रन दरम्यानचे तंत्र :

**१. स्लो आणि स्टेडी सुरुवात :** सुरुवात नेहमी हळू गतीने करा. पहिल्या काही किलोमीटरनंतर गती वाढवा.पूर्ण अंतर च्या निम्यापेक्षा जास्त अंतर झाल्यावर थोडा वेगाने धावण्याचा सराव करा.

**२. इंधन पुरवठा, पेसिंग आणि ब्रेथिंग :** ९० मिनिटांपेक्षा जास्त लाँग रनसाठी दर ३०-४५ मिनिटांनी एनर्जी जेल, ड्रायफ्रूट्स, किंवा स्पोर्ट्स ड्रिंकचे सेवन करा. सुसंगत पेस ठेवा आणि नाकातून श्वास घेऊन तोंडातून सोडण्याची पद्धत वापरा.

### लाँग रननंतरची रिकव्हरी :

**१. कूल-डाउन :** धावल्यानंतर ५-१० मिनिटे हलके चालणे वा जॉगिंग करा आणि स्थिर स्ट्रेचिंग करून स्नायू रिलॅक्स करा.

**२. पोस्ट-रन न्यूट्रिशन :** धावल्यानंतर ३० मिनिटांच्या आत प्रोटीन आणि कार्बो हायड्रेट्सयुक्त आहार घ्या. उदा. प्रोटीन शेक्स, फ्रूट स्मूदीज.

**३. फोम रोलिंग आणि आइस बाथ :** स्नायूंमधील ताण कमी करण्यासाठी फोम रोलिंग करा. थकवा कमी करण्यासाठी आणि जळजळ कमी करण्यासाठी १०-१५ मिनिटे आइस बाथ घ्या.

**४. विश्रांती:** लाँग रननंतर किमान १-२ दिवस रेस्ट घ्या किंवा हलके स्ट्रेचिंग किंवा योगा करा.

### मानसिक तयारी आणि प्रेरणा :

**१. लक्ष्य निश्चित करा :**
धावण्यापूर्वीच स्पष्ट लक्ष्य ठेवा, जसे की वेळ पूर्ण करणे, विशिष्ट अंतर गाठणे किंवा विशिष्ट पेस राखणे.

**२. धावण्याचा आनंद घ्या :**
वेग आणि स्पर्धात्मकतेवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी धावण्याचा आनंद घ्या. प्लेलिस्ट तयार करा किंवा धावताना पॉडकास्ट ऐका.

**३. स्वतःला प्रोत्साहित करा :**
लाँग रन दरम्यान प्रेरणा टिकवण्यासाठी पॉझिटिव्ह सेल्फ-टॉकचा वापर करा. उदाहरणार्थ, ''मी हे करू शकतो'' किंवा ''फक्त पुढील ५ किमी पर्यंत पोहोचायचंय''.

**(क्रमशः)**

**-अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो.९१७५८२८२०३

# जडेजाची झुंज 'अविश्वसनीय'

### मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर कडून कौतुक



◆ **लंडन, १८ जुलै**

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजाचे कौतुक केले आणि इंग्लंडविरुद्धच्या लॉर्ड्स कसोटीत त्याच्या शौर्याचे वर्णन 'अविश्वसनीय झुंज' असे केले.

जडेजाने १८१ चेंडूत ६१ धावा केल्या, परंतु त्याच्या धाडसी खेळीनंतरही, तिसऱ्या कसोटीत भारताचा २२ धावांनी पराभव झाला.

ती एक अविश्वसनीय लढाई होती. जडेजाची लढाई पूर्णपणे उत्कृष्ट होती, असे गंभीरने शुक्रवारी बीसीसीआयच्या संकेतस्थळावर पोस्ट केलेल्या द एमव्हीपी फूट. रवींद्र जडेज या व्हिडीओमध्ये म्हटले आहे.

१९३ या माफक धावांचा पाठलाग करताना भारताची फलंदाजी फळी कोसळली आणि अव्वल आठ फलंदाज ४० षटकांपेक्षा कमी वेळातच तंबूत परतले, पण ७ व्या क्रमांकावर आलेला जडेजा खंबीरपणे उभा राहिला व त्याने तळाच्या फळीतील फलंदाज - जसप्रीत बुमराह व मोहम्मद सिराजसोबत प्रचंड धैर्य व जिद्द दाखवली. त्यांनी मिळून ३४ षटकांपेक्षा जास्त वेळ फलंदाजी करून भारताच्या विजयाच्या आशा पल्लवीत ठेवल्या. बुमराहने ५४ चेंडूत ५ धावा दिल्या आणि सिराजने ३० चेंडूत ४ धावा केल्या आणि शोएब बशीरला शेवटचा बळी मिळाला. पाच सामन्यांच्या मालिकेत भारताने ७४.५ षटकात १७० धावा केल्या आणि भारतीय संघ ॲण्डरसन-तेंडुलकर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-२ असा पिछाडीवर पडला.

जडेजाची फलंदाजी आणखी एका पातळीवर पोहोचली आहे. गत दोन कसोटी सामन्यांमध्ये त्याने सातत्य आणि शांतपणा आणला. मी त्याला इतक्या वर्षांपासून पाहत आहे आणि आता तो खेळ विकसित करत आहे, त्याचा बचाव भक्कम आहे, तो योग्य फलंदाज दिसतो, असे गंभीर म्हणाले.

जडेजाचे माजी सौराष्ट्र संघातील सहकारी व भारतीय संघाचे फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक यांनी दबावाखाली असलेल्या अष्टपैलू खेळाडूच्या स्वभावावर प्रकाश टाकला.'मला नेहमीच वाटायचे की त्याच्याकडे दबाव पेलण्याची क्षमता आहे. इतका अनुभव असल्यामुळे तो सहसा कोणत्याही आव्हानात्मक परिस्थितीत संघाला आवश्यक असलेली खेळी करतो. तो खरोखरच, संघासाठी खरोखर मौल्यवान आहे, असे कोटक म्हणाला.

जडेजाच्या अष्टपैलू गुणांना अधोरेखित करत वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजनेही याच भावना व्यक्त केल्या. जडेजासारखा खेळाडू मिळणे खूप कठीण आहे व आमच्या संघात असा खेळाडू असणे हे आमचे भाग्य आहे, असे सिराज म्हणाला.


मालिका जिंकण्याच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी भारताला २३ जुलैपासून मॅन्चेस्टरमध्ये सुरू होणारा चौथा कसोटी सामना जिंकावा लागेल. ◀(वृत्तसंस्था)

### जडेजा मौल्यवान खेळाडू : गिल

सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत बोलताना सलामीवीर शुभमन गिलने जडेजाच्या प्रभावाचे सारांश दिला. रवींद्र जडेजा हा भारतातील सर्वात मौल्यवान खेळाडूंपैकी एक आहे. त्याच्या फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात तो जे कौशल्य आणतो. तो असा खेळाडू आहे जो दुर्मिळ आहे. जडेजाने ज्या पद्धतीने फलंदाजी केली ती खूप अभिमानास्पद कामगिरी होती. त्याने दाखवलेले चारित्र्य आणि धाडस जबरदस्त होते, असे गिल म्हणाला होता. ■

# अर्जुन एरिगासी उपांत्य फेरीत, आर. प्रज्ञानंद बाहेर

### फ्रीस्टाईल बुद्धिबळ



अर्जुन एरिगासी व आर. प्रज्ञानंद

◆ **लास वेगास, १८ जुलै**

ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगासीने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हचा पराभव करत फ्रीस्टाईल ग्रॅण्ड स्लॅम बुद्धिबळ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली, परंतु आर. प्रज्ञानंदला फॅबियो कारुआनाकडून पराभव पत्करावा लागला, त्यामुळे तो विजेतेदाच्या शर्यतीतून बाहेर झाला आहे.

अर्जुनने अब्दुसत्तोरोव्हवर १.५-०.५ असा विजय मिळवला, तर प्रज्ञानंदने कारुआनाविरुद्ध ३-४ अशी तीव्र लढत गमावली.

लेव्हॉन एरोनियन आणि हॅन्स मोके निमन या अमेरिकन जोडीने उपांत्यपूर्व फेरीत अनुक्रमे देशबांधव हिकारू नाकामुरा व उझबेकिस्तानचा जावोखिर सिंदारोव्हचा पराभव केला. एरोनियनने चार डावांमध्ये २.५-१.५ फरकाने विजय मिळवला, तर निमनने सिंदारोव्हला ४-२ ने पराभूत केले.

उपांत्य फेरीत अर्जुनचा सामना एरोनियनशी होईल, तर निमनची लढत कारुआनाशी होईल.

अन्य गटात प्रथम विश्वमानांकित नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनने आपला विजयी लूक परत मिळवला आणि विदित गुजरातीला २-० असे पराभूत केले. अमेरिकेच्या वेसली सो याने आपल्याच देशबांधव सॅम्युअल सेव्हियनविरुद्ध १.५-०.५ असा विजय मिळवला, तर लेनियर डोमिंग्वेझ पेरेझने कझाकस्तानच्या बिबिसारा असाउबायेवाविरुद्ध १.५-०.५ असा सहज विजय मिळवला. पहिल्या टप्प्यातील विजेता जर्मनीचा व्हिन्सेंट केमरने अमेरिकेचाच रॉबसन रे याचा २.५-१.५ च्या फरकाने पराभव केला.

अर्जुनने दोन्ही सामन्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आणि सुरुवातीपासूनच त्याचा फायदा घेतला. दुसऱ्या सामन्यात पांढऱ्या सोंगट्यानिशी खेळताना अर्जुनने अब्दुसत्तोरोव्हवर मात केली.

प्रज्ञानंद व कारुआनाने सात निर्णायक डावांमध्ये सहभाग घेतला आणि भारतीय खेळाडू तीन वेळा आघाडीवर होता. प्रज्ञानंदने पहिला डाव जिंकला, दुसरा गमावला आणि सहाव्या डावापर्यंत ही खेळी चालू राहिली. कारुआनाने निर्णायक सातवा डाव जिंकला. ◀(वृत्तसंस्था)

# भारताचे इंग्लंडविरुद्ध वन-डे मालिका जिंकण्याचे लक्ष्य

◆ **लंडन, १८ जुलै**

आगामी विश्वचषकासाठी आपली उत्कृष्ट तयारी सुरू ठेवण्याचा निर्धार करत भारतीय महिला क्रिकेट संघाने शनिवारी लॉर्ड्स मैदानावर होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या वन-डे सामन्यात विजयासह तीन सामन्यांची वन-डे मालिका जिंकण्याचा निर्धार केला आहे.



प्रतीका रावलकडून मोठ्या खेळीची अपेक्षा

साऊदम्पटन येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात भारताने चार गड्यांनी विजय मिळवला आणि लॉर्ड्सवरील विजयामुळे पाहुण्या संघाला तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अजिंक्य आघाडी मिळेल. यामुळे अलिकडच्या काळात या फॉरमॅटमध्ये त्यांच्या विजयांची मालिका वाढेल, यात मे महिन्यात श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिकेचा समावेश असलेला तिरंगी मालिका विजय समावेश आहे.

इंग्लंडविरुद्धचे सामने या वर्षाच्या अखेरीस भारत आयोजित करणार असलेल्या आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषकासाठी महत्त्वाची तयारी म्हणून काम करत असल्याने त्यांना अधिक महत्त्व आहे. अनेक खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केल्याने, विश्वचषक संघात स्थान मिळविण्यासाठी स्पर्धा वाढत आहे, परंतु ही समस्या भारताचे प्रशिक्षक अमोल मुझुमदार व कर्णधार हरमनप्रीत कौर यांच्यासाठी आनंददायी डोकेदुखी आहे.

व्यवस्थापनाकडे काही भूमिकांसाठी निवडण्यासाठी अनेक पर्याय आहेत. संघाची ताकद यापूर्वी कधीच इतकी चांगली नव्हती.

दुखापतींमुळे वेगवान गोलंदाज रेणुका सिंग ठाकूर आणि पूजा वस्त्राकर यांच्या अनुपस्थितीत, संघाने थोड्या जास्त अनुभवी अरुंधती रेड्डीपेक्षा क्रांती गौडला पसंती दिली. २१ वर्षीय नवोदित खेळाडूने सलामीवीर अमनजोत कौरला उत्तम साथ दिली. स्मृती मंधानाच्या जोडीदारासाठी प्रतीका रावल ही अव्वल फळीसाठी पसंतीची निवड म्हणून उदयास आली आहे, तर टी-२० आंतरराष्ट्रीय, महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) आणि स्थानिक क्रिकेटमध्ये तिच्या फॉर्ममुळे शेफाली वर्मा देखील वादात आहे.

हरलीन देओल सुद्धा चांगल्या स्थितीत आहे. जर शेफाली जवळच्या भविष्यात अंतिम अकरामध्ये परतली तर रावलला तिसऱ्या क्रमांकावर ढकलली जाऊ शकते. तथापि, अशा परिस्थितीत हरमनप्रीत, जेमिमाह रॉड्रिग्ज, दीप्ती शर्मा आणि ऋचा घोषचा समावेश संघबांधणीत देओलला सामावून घेणे कठीण होईल.

डावखुरी फिरकी गोलंदाज एन. श्री चरणी हिच्यासोबत दीप्ती, स्नेहा राणा व राधा यादव यांच्याही फिरकी गोलंदाजीमध्ये भरपूर सखोलता आहे.मागील टी-२० मालिकेत १० बळी घेऊन सर्वाधिक बळी मिळवणाऱ्या चरणीला मालिकावीर म्हणून गौरविण्यात आले.

पहिल्या वन-डे सामन्यात अर्धशतकी खेळीदरम्यान ऋषभ पंतप्रमाणे एका हाताने षट्कार मारणारी वरिष्ठ अष्टपैलू दीप्ती हिच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष असेल. या एकदिवसीय मालिकेतील विजयामुळे ३० सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या जागतिक स्पर्धेपूर्वी भारताची तयारी आणि मनोबल आणखी वाढेल. ◀(वृत्तसंस्था)

### प्रतीका रावल, इंग्लंड संघाला दंड

**साऊदम्पटन :** येथे झालेल्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या एकदिवसीय सामन्यानंतर शुक्रवारी आयसीसीच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल भारताची फलंदाज प्रतीका रावल आणि इंग्लंड संघाला दंड ठोठावण्यात आला.

दोन वेगवेगळ्या घटनांबद्दल रावलला तिच्या सामना शुल्काच्या १० टक्के दंड आणि लेव्हल १ उल्लंघनासाठी एक डिमेरिट पॉइंट देण्यात आला. १८ व्या षटकात इंग्लंडच्या गोलंदाज लॉरेन फाइलरशी आणि त्यानंतरच्या षटकांत सोफी एक्लेस्टोनशी 'टाळता येण्याजोगा शारीरिक संपर्क' केल्याबद्दल रावल दोषी आढळली. भारतीय सलामीवीराला अल्पावधीत घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांसाठी दंड ठोठावण्यात आला, असे आयसीसीने म्हटले आहे.

१८ व्या षटकात तिने एक धाव घेताना गोलंदाज लॉरेन फाइलरशी टाळता येण्याजोगा शारीरिक संपर्क केला आणि पुढच्या षटकात बाद झाल्यानंतर तिने ड्रेसिंग रूममध्ये परतताना गोलंदाज सोफी एक्लेस्टोनशी असाच टाळता येण्याजोगा शारीरिक संपर्क केला, असे त्यात म्हटले आहे. ■

# मॅन्चेस्टर कसोटीपूर्वी भारतीय खेळाडूंनी केला जिममध्ये सराव

◆ **मॅन्चेस्टर, १८ जुलै**

मॅन्चेस्टर येथे ॲण्डरसन-तेंडुलकर चषक कसोटी मालिकेतील चौथा सामना खेळला जाणार असून या सामन्यातून मालिका बरोबरीत आणण्यासाठी भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडविरुद्ध आणखी एका कठीण सामन्यासाठी सज्ज झाला आहे. या चौथ्या कसोटीपूर्वी भारतीय संघातील काही सदस्यांनी जिम प्रशिक्षण सत्रात सर्वतोपरी मेहनत घेतली.



ऋषभ पंत, यशस्वी जयस्वाल, आकाश दीप, करुण नायर, ध्रुव जुरेल, अभिमन्यू ईश्वरन आणि मोर्ने मॉर्केलने जिममध्ये खूप घाम गाळला. भारतीय संघाच्या उपकर्णधार पंतने जिम सत्रातील फोटो समाज माध्यमावर सामायिक केले. या छायाचित्राखाली- वजन, हास्य, घाम आणि पुनरावृत्ती असे कॅप्शन दिले.

लॉर्ड्स कसोटीदरम्यान डाव्या तर्जनीला झालेल्या दुखापतीतून यष्टिरक्षक-फलंदाज पूर्णपणे सावरलेला नाही आणि तो फलंदाजी किंवा यष्टिरक्षणाच्या सरावापासून दूर राहिला, त्याऐवजी गुरुवारी हलका सराव करण्याचा पर्याय निवडला. त्याच्या बोटावर कोणताही टेप नव्हता, पण दुखापतीमुळे होणारा त्रास अजूनही कायम आहे असे समजते. पंत कसोटीपूर्वी मॅन्चेस्टरमध्ये फलंदाजी करेल, असे भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोशाटे यांनी पत्रकार परिषदेत म्हणाले. त्यांनी ध्रुव जुरेलबद्दलही संकेत दिले.

जुरेल समीकरणात आहे, पण जर ऋषभ तंदुरुस्त असेल तर तो पुढची कसोटी खेळेल आणि दोन्हीही करेल, असे त्याने नमूद केले. ◀(वृत्तसंस्था)



# जिल्हा १४ वर्षांखालील क्रिकेट निवड चाचणी २६ जुलैपासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

जिल्ह्याचे १४ वर्षांखालील मुलांचे क्रिकेट संघ निवडीसाठी २६ व २७ जुलै रोजी जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर सकाळी ९ ते १ व दुपारी २ ते ५.३० दरम्यान निवड चाचणी होणार आहे. १ सप्टेंबर २०११ नंतर जन्मलेले खेळाडू या चाचणीस पात्र आहेत.

निवड चाचणी अगोदर सर्व खेळाडूंनी खेळाडू रजिस्टर करून घेणे बंधनकारक आहे. निवड चाचणी शुल्क क्यू.आर. कोडद्वारे सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनच्या अकाउंट मध्ये जमा करावे. त्यानंतर आलेल्या ऑप्शनमध्ये खेळाडूचे नाव व जन्म तारीख टाकून त्याची प्रिंट काढून सिलेक्शनच्या दिवशी ती दाखवावी. रजिस्टर झालेल्या खेळाडूंनी सोबत रजिस्टर कार्ड आणणे बंधनकारक आहे व शुल्क भरल्याची पावती दाखवून निवड चाचणीस उतरावे. ही निवड चेअरमन राजेंद्र गोटे यांच्यासह सदस्य सत्यजित जाधव, विक्रांत पवार, डॉ. महेश ढेंबरे व राजू रंगम हे करणार आहेत.

# राज्य खो-खो पंच शिबिर आजपासून साताऱ्यात

■ **ठाण्याचा प्रशांत दळवी राज्य पंच परीक्षेत प्रथम**

**सातारा, १८ जुलै-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनतर्फे २०२५-२६ या वर्षासाठीचे राज्यस्तरीय खो-खो पंच शिबिर १९ व २० जुलै रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे आयोजन सातारा जिल्हा ॲम्युएचर खो-खो असोसिएशनच्या संयोजनाने करण्यात आले असून, कार्यक्रमाचे आयोजन सातारा एसटी स्टॅंडच्या पाठीमागे असलेल्या हॉटेल निर्मल येथे होणार आहे.

या दोन दिवसीय शिबिरामध्ये पूर्णवेळ सहभागी होणाऱ्या आणि पात्र ठरलेल्या पंचांनाच आगामी राज्य स्पर्धांसाठी नियुक्ती देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. नोंदणी केलेल्या इच्छुक पंचांनी अधिक माहितीसाठी श्री. महेंद्र गाढवे (९८२२५४४३७०) अथवा श्री. प्रशांत कदम (९७३०४५२३११) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर व सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी केले आहे.

दरम्यान, नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या राज्य पंच परीक्षेचा निकाल १००% लागला असून, राज्यातील ४८० परीक्षार्थी उत्तीर्ण झाले आहेत. हे सर्व उत्तीर्ण परीक्षार्थी साताऱ्यातील शिबिरात सहभागी होणार आहेत. या परीक्षेत ठाण्याच्या प्रशांत प्रभाकर दळवी याने प्रथम क्रमांक पटकावत सर्वोत्तम कामगिरी केली आहे. त्यानंतर लातूरच्या दिक्षा सुरेश सालमोटे हिने द्वितीय, तर पुण्याच्या ओंकार सुरेश ढवळे याने तृतीय क्रमांक पटकावला आहे.

### उत्तीर्ण परीक्षार्थ्यांची केंद्रनिहाय संख्या

अहिल्यानगर २०, बीड ३९, धुळे ३२, जालना ३१, लातूर २७, मुंबई २८, नांदेड २५, नंदुरबार ३३, पालघर ३५, पुणे ७८, सांगली २५, सोलापूर ५०, सिंधुदुर्ग २२, ठाणे ३५.

# स्वीडनला नमवून इंग्लंड उपांत्य फेरीत

### महिला युरोपियन चषक फुटबॉल

◆ **झुरिच, १८ जुलै**

सामना संपायला १२ मिनिटे शिल्लक असताना गतविजेता इंग्लंड महिला संघ पराभवासह युरोपियन चषक फुटबॉल स्पर्धेच्या बाहेर होण्याच्या उंबरठ्यावर होता, परंतु नंतर लायनेसेसने जोरदार मुसंडी मारली. तिने जलद गतीने दोन गोल केल्यामुळे इंग्लंडने निर्धारित वेळेतील सामन्यात स्वीडनविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधत अशक्य पुनरागमन केले. नंतर पेनॉल्टी शूट-आउट जिंकून इंग्लंडने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

महिला युरोच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या संघाने बाद फेरीत दोन गोलने मागे पडल्यानंतरही पुनरागमन केले आहे. पेनॉल्टी शूट-आउटमध्ये काही भयानक प्रयत्न झाले- एकूण नऊ चुकले. अखेर इंग्लंडने ३-२ असा



झुरिचमधील स्टेडियन लेटझिग्रंड येथे स्वीडनविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यात पेनॉल्टी शूट-आऊट जिंकल्यानंतर इंग्लंडच्या गोलरक्षक हन्ना हॅम्प्टनच्या डोक्यावर उड्या मारत आनंद साजरा करताना इंग्लंडच्या

विजय मिळवण्यापूर्वी १८ वर्षीय स्मिला हॉल्मबर्गने शेवटचा प्रयत्न गमावला, मात्र लुसी ब्रॉन्सने जोरदार पाठलाग करत इंग्लंडला निर्धारित वेळ बरोबरी मिळवून दिली.

हा हृदयाचे ठोके वाढवणारा सामना होता, हा आतापर्यंतचा सर्वात गोंधळलेला सामना होता ज्याचा मी भाग होती. खूपच रोमहर्षक व भावनिक सामना होता, असे इंग्लंड संघाच्या प्रशिक्षक सरिना विगमन म्हणाल्या. आमचे खेळाडू चांगले खेळत नाहीत, परंतु मजबुतीने एकत्र राहून खूप चांगले लढतात, संघात ही एक अशी गुणवत्ता आहे असे मला वाटते, असे त्या म्हणाल्या.

अतिशय तणावपूर्ण खेळ होता. प्रत्येक वेळी मी गोल वाचवताना देवाला कृपा ठेव म्हणून प्रार्थना करत होते, असे इंग्लंडची गोलरक्षक हन्ना हॅम्प्टनने शूटआउटबद्दल सांगितले. आता मंगळवार जिनेव्हा येथे होणाऱ्या उपांत्य फेरीत इंग्लंडचा सामना इटलीचा सामना होईल.

गत वेळी जर्मनीवर ४-१ असा संस्मरणीय विजय मिळवून स्वीडनने तीन विजयांसह सर्वाधिक गुणांसह आपल्या गटात अव्वल स्थान पटकावले होते. ◀(वृत्तसंस्था)

# बुमराहने उर्वरित दोन्ही कसोटीत खेळावे : कुंबळे

◆ **नवी दिल्ली, १८ जुलै**

इंग्लंडविरुद्धच्या उर्वरित दोन कसोटी सामन्यांमध्ये भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने खेळायला हवे, असे मत भारतीय संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक अनिल कुंबळे यांनी व्यक्त केले. त्यांनी उर्वरित कसोटी मालिकेसाठी जसप्रीत बुमराहच्या उपलब्धतेचे महत्त्व सांगितले.

बुमराह वर्कलोड व्यवस्थापनाचा भाग म्हणून मालिकेतील पाचपैकी केवळ तीन सामने खेळेल, असे भारतीय संघ व्यवस्थापनाने दौऱ्यापूर्वी जाहीर केले होते. बुमराह हेडिंग्ली व लॉर्ड्स येथे कसोटी सामन्यांमध्ये खेळला होता, तर त्याला एजबॅस्टन सामन्यातून विश्रांती देण्यात आली होती पण तिसऱ्या व चौथ्या कसोटी सामन्यात एका आठवड्याचे अंतर असल्यामुळे बुमराह २३ जुलैपासून ओल्ड ट्रॅफर्ड येथे सुरू होणाऱ्या कसोटीत खेळू शकतो, कारण लॉर्ड्सवर २२ धावांनी पराभव झाल्यानंतर भारत मालिकेतील बरोबरी साधण्याचे लक्ष्य ठेवत आहे. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# वन्यजीवांना उत्तम दर्जाचे पाणवठे बांधा

### आ. समाधान आवताडे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १८ जुलै-**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान, वन्यजीवांसाठी पाणी पिण्याची योग्य सुव्यवस्था करण्याकरिता हे पाणवठे वनविभागाच्या हद्दीत उभारण्यात येऊन ते कायमस्वरूपी टिकण्यासाठी सरकार तालुकास्तरीय समितीची स्थापना करणार आहे का? याबाबत आमदार आवताडे यांनी उपप्रश्न उपस्थित करून सभागृहाचे व मंत्री महोदयांचे लक्ष वेधले.



सदर मागणी मांडताना आ आवताडे यांनी सांगितले




की, पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील मंगळवेढा तालुका पाण्याअभावी दुष्काळी तालुका म्हणून गणला जातो. अगदी जानेवारीपासूनच नागरिकांना व जनावरांना पाण्याच्या शोधात मोठी भटकंती करावी लागत असते. अशा परिस्थितीमध्ये तालुक्यातील मारोळी येथे दोन तरस प्राणी पाण्यासाठी जंगला बाहेर आले असता नाहक त्रासापोटी भयभीत झालेल्या नागरिकांनी हल्ला होण्याच्या भीतीपोटी त्यातील एक तरस ठार केला.त्यातील एकाला आपला प्राण अनेक जंगलातील हरीण, मोर तसेच इतर सदर वन्यजीव प्राणी पिण्याच्या पाण्याच्या शोधात सर्वदूर फिरत असतात त्यामुळे त्यांचा आकस्मित अपघात होतो व प्रसंगी त्यांना आपला जीव गमवावा लागत आहे. अशा सर्व बाबींचा शासनदरबारी संवेदनशील मार्गाने विचार करुन लवकरात-लवकर नियोजित पाणवठे निर्माण करुन त्यामध्ये कायमस्वरूपी पाणी उपलब्ध करुन देण्याची मागणी यावेळी आ आवताडे यांनी केली आहे. सामाजिक व सांप्रदायिक कार्य सेवेसाठी केंद्रस्थानी असणाऱ्या मंगळवेढा येथील वारी परिवाराचे व त्यांच्या सेवाभावी कार्याचे देखील आ समाधान आवताडे यांनी भर सभागृहात कौतुक केले आहे. काळ्या शिवारातील पक्षांना उन्हाळ्याच्या दिवसात पाण्यासाठी वारी परिवार अहोरात्र झटून त्यांची सोय करत असतात. त्याचबरोबर आदर्श परिवाराचाही सामाजिक क्रियाशील बद्दल आमदार आवताडे यांनी विशेष उल्लेख केला आहे. सदर मुद्द्यावर सकारात्मक प्रतिसाद देत राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक यांनी वन्य अधिकाऱ्यांशी संपर्क साधून गरजेनुसार वनबंधारे बांधून त्याच्या देखभालीची संपूर्ण जबाबदारी वन खाते घेईल, असे आश्वस्त केले.

> गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक सेवेचा वसा आणि वारसा जतन करण्यासाठी मानवी व इतर सजीव जीवनमूल्यांशी निगडीत सेवाभाव डोळ्यासमोर ठेवून वारी परिवार एकदिलाने लोकाभिमुख कार्य करत आहे. अशा आमच्या प्रामाणिक कार्याची दखल घेऊन आमदार समाधान आवताडे यांनी राज्याच्या विधीमंडळात आमच्या कार्याचा उल्लेख केल्याने आम्हाला सार्वजनिक जीवनात आणखी मोठे कार्य करण्यासाठी मोठी चालना आणि प्रोत्साहन प्राप्त झाले आहे.
> **- सतिश दत्तू,**
> **संस्थापक वारी परिवार मंगळवेढा.**

## महत्वाचे...

### दिग्दर्शक सलीम खानकडून गायक मोहम्मद अयाज यांचे कौतुक

**मुंबई, दि. १८ जुलै-**



भारतीय चित्रपट सृष्टीतले जेष्ठ निर्माता दिग्दर्शक सलीम खान यांच्या गेलेक्सी निवास स्थानी सोलापूरचे सुपुत्र महागायक विजेते मोहम्मद अयाज यांनी भेट दिली. यावेळी मोहम्मद अयाज यांचा सलीम खान, अरबाज खानसह परिवार सोबत तासभर गप्पा गाणी झाली. सोलापूरचे नाव जगभरात लौकिक करणारे माजी गृहमंत्री सुशील कुमार शिंदे यांचे उल्लेख करत तुम्ही देखील असच सोलापूरचं नाव लौकिक करणार यात शंका नाही. यावेळी मोहम्मद अयाज यांचे डोळे पणावले होते.

### आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी ३० जुलैपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. १८ जुलै,**

पाच सप्टेंबर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त शिक्षकदिनी जिल्हा परीषद शिक्षण विभागाकडून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय व उत्कृष्ट कार्य केलेल्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात येणार आहे. म्हणून पात्र शिक्षक यांनी ३० जुलैपर्यंत विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी केला आहे. दरवर्षी पाच सप्टेंबर शिक्षकदिन म्हणून साजरा केला जातो. यावेळी प्रत्येक तालुक्यातून एका शिक्षकाला जिल्हा परीषदेकडून आदर्श शिक्षक यांना पुरस्कार देऊन गौरव करण्यात येते. संबंधित शिक्षकांनी केंद्रप्रमुख , विस्तार अधिकारी व गटशिक्षण अधिकारी यांच्या शिफारशीने ३० जुलैपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी शेख यांनी केला आहे.

### खुर्चीवरून पडल्याने बालक जखमी

**सोलापूर, दि. १८ जुलै -**

राहत्या घरी असताना खुर्चीवर बसलेला चार वर्षाचा बालक खाली पडून जखमी झाला. ही घटना शुक्रवारी सकाळी अकराच्या सुमारास एमआयडीसीतील निकम नगरात घडली. सोमल नागेश मंचीकटला (वय ४ वर्षे रा. निकम नगर) असे बालकाचे नाव आहे. निकम नगरातील राहत्या घरात असताना अचानक खुर्चीतून तो खाली पडला. ही घटना सकाळी अकराच्या सुमारास घडली असून तिला डोक्याला मुकामार लागल्याने आरती यांनी दुपारी बाराच्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## सेवानिवृत्त मुख्याध्यापकाची गहाळ बॅग पोलिसांनी शोधली

### ६० हजार रुपये होते बॅगेत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

सेवानिवृत्त मुख्याध्यापकाची गहाळ झालेली ६० हजार रुपये असलेली बॅग फौजदार चावडी पोलिसांनी शोधून ती परत केली.

महादेव विठ्ठल गव्हाणे (वय ७०, रा. श्रीदेवी नगर, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर) हे सेवानिवृत्त मुख्याध्यापक असून त्यांनी १८ जुलै रोजी होटगी रोडवरील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेतून पेन्शनेच ६० हजार रुपये काढून ते पैसे बॅगेत ठेऊन लकी चौकातील स्वस्तीक मिठाई या दुकानात जाऊन मिठाई खरेदी केली. त्यानंतर ते नवी पेठेतील दिवेकर बेकरी येथे बेकरीचे साहित्य खरेदी करण्यासाठी गेल्यानंतर त्यांना त्यांच्याकडील पैशाची बॅग कोठेतरी पडल्याचे समजून आले. त्यामुळे त्यांनी फौजदार चावडी पोलिस ठाणे गाठून याबाबत माहिती दिली. त्यावेळी फौजदार चावडी पोलिसांनी लागलीच हालचाली करून गव्हाणे हे फिरलेल्या ठिकाणावरील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. त्यावेळी गव्हाणे यांची बॅग एक अनोळखी व्यक्ती घेऊन बँक ऑफ महाराष्ट्रच्या नवी पेठ शाखेत गेल्याचे दिसून आले. त्यावेळी पोलिसांनी बँकेत जाऊन याबाबत चौकशी केली असता बॅग मिळून आली. त्या बॅगेत गव्हाणे यांची रोकडदेखील मिळून आली. पोलिसांनी पैशाची बॅग गव्हाणे यांना परत केली.

ही कामगिरी पोलिस निरीक्षक महादेव राऊत, तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार खरटमल यांनी केली.

### कुबेर गणपती गोल चावडी मंडळाच्या अध्यक्षपदी वडतीले

**सोलापूर, दि. १८ जुलै-**



मानाचा श्री कुबेर गणपती गोल चावडी तरुण मंडळाच्या २०२५ च्या उत्सव अध्यक्षपदी मयूर वडतीले यांची निवड करण्यात आली. जागृत हनुमान मंदिर येथे गणेशउत्सव २०२५ची बैठक १३ जुलै रोजी सायंकाळी गोलचावडी तरुण मंडळ येथे पार पडली. बैठकीत विविध सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. तसेच आगामी कार्यक्रम, सण यासाठी नियोजन ठरविण्यात आले. बैठकीस मंडळाचे आधारस्तंभ उदयशंकर चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपाध्यक्ष धनराज भावे, खजिनदार शरनू बिराजदार, मिरवणूक प्रमुख अक्षय वडतिले, आनंद खटके, लेझिम प्रमुख महेश साळुंखे, प्रसिद्धी प्रमुख संकेत व्हरपेट्टी, साई धनके व मंडळाच्या कार्यकर्ते आदी पदाधिकारी उपस्थित होते.



## सांगोला विद्यामंदिरमध्ये किशोरवयीन मुलींसाठी समुपदेशनपर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १८ जुलै-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज येथे महिला दक्षता समिती व लायन्स क्लब ऑफ, सांगोला यांचे संयुक्त विद्यमाने इयत्ता नववी ते बारावी मधील किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे सांगोला पोलीस उपनिरीक्षक स्नेहल चव्हाण, ड.सुप्रिया बोत्रे, डॉ.स्मिता गव्हाणे तर अध्यक्षस्थानी संस्था कार्यकारिणी सदस्या शीलाकाकी झपके तसेच प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक उत्तम सरगर, लायन्स क्लबचे अध्यक्ष प्रा.नवनाथ बंडगर उपस्थित होते.

यावेळी मनोगतात स्नेहल चव्हाण यांनी किशोरवयीन मुलींसाठी पोक्सो कायदा, बाल विवाह कायदा, संरक्षण कायदा, निर्भया पथक याद्वारे स्वसंरक्षण करत निर्भीडपणे स्वतःच्या पायावर उभे राहावे असे सांगितले. ॲड. सुप्रिया बोत्रे यांनी घरानंतर शाळा हे संस्काराचे मंदिर आहे. प्रत्येक अडचणीवर मात करण्याची तयारी ठेवा. मोबाईलचा अनावश्यक वापर टाळावा असे सांगत मुलींना स्वसंरक्षणास महत्त्व देण्यास सांगितले. डॉ.स्मिता गव्हाणे यांनी मानसिक आणि भावनिक बदल कसे होत जातात. आहाराविषयी काळजी कशी घ्यावी. आठ ते चौदा वर्षातील बदल कशा पद्धतीने होतात हे विविध उदाहरणाच्या माध्यमातून आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. शीलाकाकी झपके यांनी आपण विद्यामंदिरचे आदर्श विद्यार्थी आहोत. आपले ध्येय उच्च असले पाहिजे याची जाणीव करून देत अभ्यासाचे महत्त्व सांगितले. तसेच किशोरवयीन मुलींसाठी प्रबोधनपर 'जरा जपून जपून' ही कविता सादर केली. प्रास्ताविक शहिदा सय्यद यांनी तर सूत्रसंचालन प्रा.माधुरी केदार यांनी केले. आभार उज्वला कुंभार यांनी मानले.

## निधन वृत्त...

### लियाकत शेख

**सोलापूर, दि. १८ जुलै-**



जुळे सोलापुरातील सर विश्वेश्वरय्या सोसायटीत राहणारे पाटबंधारे विभागातील निवृत्त उप-अभियंता हाजी लियाकत अ.रऊफ शेख ( वय ७२) यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, ४ मुले, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. ॲड. खिजर शेख यांचे ते वडील तर पत्रकार अखलाक शेख यांचे ते थोरले बंधू होत. त्यांच्या पार्थिवावर बडी कब्रस्तान येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महादेव जाधव

**सोलापूर, दि. १८ जुलै-**



दमानी नगर गवळी वस्ती येथील महादेव नामदेव जाधव यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने गुरुवार दि. १७ जुलै रोजी सायंकाळी निधन झाले. देगाव रोड कोयनानगर येथील स्मशानभूमीत काल गुरुवारी रात्री त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, एक सून आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. द न्यूज प्लस चैनलचे संचालक तात्यासाहेब पवार यांचे ते सासरे होत.

### चक्कर येऊन पडलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. १८ जुलै -**

घरात चक्कर येऊन पडल्याने शुध्द हरपलेल्या व्यक्तीचा मृत्यू झाला. गुरुवारी रात्री आठच्या सुमारास वारद चाळीतील घरात ती व्यक्ती चक्कर येऊन पडल्यानंतर त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सिध्देश्वर शंकर तोडकर (वय ५८, रा. वारद चाळ, भैय्या चौक, सोलापूर) असे व्यक्तीचे नाव आहे. सिध्देश्वर यांना रात्री १०.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. तेव्हा त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते. उपचारादरम्यान शुक्रवारी रात्री १.३० वाजता ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## सांगोल्यातील महात्मा फुले चौक ते भोपळे रस्त्याचे अखेर डांबरीकरण

**सांगोला, दि. १८ जुलै-**

सांगोला शहरातील महात्मा फुले चौक ते भोपळे रोड रस्त्याचे डांबरीकरण अखेर



करण्यात आले. व्यापारी व नागरिकांच्या सततच्या मागणीमुळे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी यासंदर्भात दोन वेळा बैठका घेऊन तातडीने हा रस्ता डांबरीकरण करून वाहतुकीसाठी खुला करावा असा सूचना दिल्या होत्या. आ. देशमुख यांच्या सूचनेनंतर कामाला वेग आला आणि नागरिकांच्या मागणीनुसार संपूर्ण रस्ता सुरळीत वाहतुकीसाठी सज्ज करण्यात आला. महात्मा फुले चौक ते भोपळे रोड रस्ता दुरुस्तीसाठी अनेक वेळा पाठपुरावा करून देखील आमच्या मागणीची कोणी दखल घेत नव्हते. आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या कानावरती ही बाब घालताच त्यांनी बैठक घेत रस्ता डांबरीकरण करण्याच्या सक्त सूचना दिल्या होत्या. आ.देशमुख यांच्या प्रयत्नामुळे डांबरीकरणाचा रखडलेला प्रश्न मार्गी लागला असल्याचे व्यापारी सर्फराज तांबोळी व शंकर माने यांनी सांगितले.

## दारुच्या नशेत डोक्यावर ब्लेडने जखमा करून तरुण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै -**

दारुच्या नशेत ब्लेडने डोक्यावर मारून घेऊन तरुणाने स्वत:ला जखमी केले. हा प्रकार रेल्वे लाईन भागातील राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयाच्या पाठीमागे पहाटे पाचच्या सुमारास घडला. शकील इब्राहिम शेख (वय ३३) असे स्वत:ला जखमी करून घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी पहाटे पाचच्या सुमारास शकील हा दारुच्या नशेत असताना, त्याने ब्लेडने स्वत;च्या डोक्यात ब्लेडने मारून घेतले. यामुळे त्याच्या डोक्यात जखमा झाल्याने सकाळी ८.१० च्या सुमारास महेबूब शेख याने शासकीय रुग्णालयात उपचपारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### विवाहितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर :** सासरच्या त्रासाला कंटाळून विवाहितेने माहेरच्या घरी जुन्या आठ ते दहा गोळ्या खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार गुरुवारी सायंकाळी साडेसहा वाजता शिमला नगरात घडला. शाहिन महिबूब शेख (वय २५, रा. शिमला नगर) असे विवाहितेचे नाव आहे. शाहिन ही सासरच्या त्रासाला कंटाळून माहेरी घरी आली. गुरुवारी सायंकाळी तिने घरातील जुन्या गोळ्या खालल्याने तिला त्रास होऊ लागला. ही बाब माहित होताच काका अकिस नदाफ याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## घरकुल व उमेद क्षेत्रात डॉ. ठोंबरे यांचे कार्य उल्लेखनीय

### अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीणकर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर ,दि. १८ जुलै -**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांनी उमेद व घरकुल विभागाचे कामकाज अतिशय उल्लेखनीय केल्याने या कामकाजात सोलापूर जिल्हा अग्रेसर असल्याचे मत सोलापूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीणकर यांनी व्यक्त केले.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या सभागृहात डॉ.सुधीर ठोंबरे यांची हिंगोली येथे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल आयोजित निरोप समारंभ कार्यक्रमात कोहीणकर बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक अमोल जाधव, महिला बालकल्याण विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, विवेक जमदाडे, शंकर कवितके, जस्मिन शेख, ठोंबरे, सहाय्यक प्रकल्प संचालक रतीलाल साळुंखे, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, लेखाधिकारी सूर्यकांत तोडकरी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी संदीप कोहीणकर म्हणाले की, उमेद अभियान असो की घरकुल विभाग यामध्ये सुधीर ठोंबरे यांनी वेगवेगळया नाविन्यपुर्ण योजना राबवून विभागाचे काम चांगले केला आहे. अतिशय



शांत , संयमी व्यक्तिमत्त्व म्हणून नेहमीच सर्वांना सोबत घेवून कामकाज केले. उमेद अभियान मधील ड्रोनची अवजार बँक असेल किंवा घरकुल मधील वाळूचे धोरण असेल यामध्ये त्यांनी अतिशय उल्लेखनीय कार्य केले आहे. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, अमोल जाधव, प्रसाद मिरकले, शंकर कवितके, जस्मिन शेख, रतीलाल साळुंखे, सचिन चवरे यांनी मनोगत व्यक्त केले. उमेद अभियान व घरकुल विभागाचे सर्व जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन दयानंद सरवळे यांनी तर आभार सूर्यकांत तोडकरी यांनी मानले.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम 13 (2) सूचना दिनांक | कलम १३ (2) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 79580859 | मालमत्तेवर कर्ज | 1. रणजितसिंह नागेश मोरे<br>2. नागेश विठ्ठल मोरे | 05/07/2025 | INR 4,88,962.42/- |

**मालमत्तेचा पत्ता:** मालमत्ता क्रमांक 326 असलेल्या निवासी घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्रफळ 720 चौ.फूट, आणि दगड, विटा आणि कॉंक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला आहे = 720.00 चौ.फूट, एकूण बांधलेले क्षेत्रफळ: 720.00 चौ.फूट, मुंढेवाडी गावात स्थित, ग्रामपंचायत मुंढेवाडीच्या नोंदणीमध्ये, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-413304, आणि पूर्वेला अशी सीमा: रस्ता पश्चिम: मालमत्ता क्रमांक 327 (भाग्यवंत विठ्ठल मोरे) उत्तर: मालमत्ता क्रमांक २५१ (महादेव श्रीमंत मोरे) दक्षिणेला : मालमत्ता क्रमांक 277/1 (चंद्रकांत ज्योती मोरे)

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : १९/०७/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

## महत्वाचे...



### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी विठ्ठल ढेपे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक मनीष बांगर, संतोष बुलबुले, भगवान मुंडे, सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, रियाज आतार, अमोल गायकवाड, नितीन अंकुश, भगवान गायकवाड, सौदागर वाघमारे, सचिन बर्मा, सचिन जाधवर, विजय लोकरे, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, भालचंद्र साखरे, सचिन साखरे, सायली ढोले उपस्थित होते.




### 'श्राविका'त अण्णाभाऊ साठे स्मृती दिन साजरा

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

उमाबाई श्राविका कनिष्ठ महाविदयालय व साने गुरुजी कथामाला महाविद्यालयीन शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य सुकुमार मोहोळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृतीदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. अविनाश मुळकूटकर यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन चरित्र उलगडून सांगितले. प्रास्ताविक प्रा. गणेश लेंगरे यांनी केले तर आभार प्रा. सोमनाथ राऊत यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा कंगळे यांनी केले. कार्यक्रमास प्रा. अविनाश मुळकूटकर,प्रा. अर्चना कानडे, प्रा. ज्योती बांगर, प्रा. प्राजक्ता काळे, प्रा. कल्याणप्पा हायगोंडे उपस्थित होते.

# पत्नीचा खून करून वकिल पोलिस ठाण्यात हजर

- घर बांधण्यासाठी पैसे न दिल्याचा राग धरल्याचे कारण
- शुक्रवारी सकाळी स्वराज विहारमध्ये घडलेली घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जुलै -**

घर बांधण्यासाठी पैसे न दिल्याचा राग मनात धरून वकिलाने पत्नीचा चाकूने गळ्यावर व मानेवर वार करून खून केला. पत्नीचा खून केल्यानंतर वकिल पती स्वतःहून पोलिस ठाण्यात हजर झाला.

ही घटना शुक्रवारी सकाळी वसंत विहार परिसरातील स्वराज विहारमध्ये घडली. याप्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाग्यश्री प्रशांत राजहंस (वय ३९, रा. मित्र नगर, पंढरपूर रोड, मंगळवेढा, सध्या रा. प्लॉट नं. १४८, स्वराज विहार, वसंत विहार, सोलापूर) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत मयत भाग्यश्री यांचा भाऊ रत्नदिप विद्याधर भोसले (वय ३७, रा. घर नं. २२/१२९, मिलींद नगर, बुधवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रशांत रविंद राजहंस (वय ४४, रा. मित्र नगर, पंढरपूर रोड, मंगळवेढा, सध्या रा. प्लॉट नं. १४८, स्वराज विहार, वसंत विहार, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशांत राजहंस हे व्यवसायाने वकिली करतात. शुक्रवारी सकाळी ११ च्या सुमारास राजहंस हे फौजदार चावडी पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक राऊत यांच्याकडे स्वतःहून हजर झाले व त्यांनी आपल्या पत्नीचा खून केल्याची माहिती दिली. पत्नी भाग्यश्री हिच्याशी भांडण झाल्याने त्यांनी चाकूने तिच्या गळ्यावर वार केले असल्याचे सांगितल्याने फौजदार चावडी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व पाहणी केली. त्यावेळी भाग्यश्री या जखमी आणि बेशुद्धावस्थेत बेडरूममधील बेडवर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आढळल्या. पोलिसांनी बेशुध्दावस्थेतील भाग्यश्री यांना त्वरित शासकीय रुग्णालयात दाखल केले, परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.



भाग्यश्री राजहंस

दरम्यान, याची माहिती पोलिस हवालदार प्रविण चुंगे यांनी भाग्यश्री यांचा भाऊ रत्नदीप यास फोनवरून दिली. त्यानंतर रत्नदीप भोसले यांनी स्वराज विहार येथे राजहंस यांच्या घरी जाऊन पाहणी केली. रत्नदीप यांची बहिण मयत भाग्यश्री या मंगळवेढा येथे राहण्यास न गेल्याने व प्रशांत राजहंस यास घर बांधण्यासाठी पैसे न दिल्याचा राग मनात धरून प्रशांत याने पत्नी भाग्यश्री हिच्या गळ्यावर व मानेवर चाकूने वार करून तिचा खून केला, अशी फिर्याद रत्नदीप भोसले यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यावरुन खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी प्रशांत राजहंस यास अटक केली आहे. पोलिस निरीक्षक तानाजी दराडे पुढील तपास करीत आहेत.

## सोलापुरात उद्या पत्रकारांसाठी कार्यशाळा

- तीन सत्रांमध्ये होणार तज्ज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शन
- सात रस्ता येथील जिल्हा नियोजन भवन येथे होणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सामाजिक शास्त्रे संकुल आणि सोलापूर श्रमिक पत्रकार संघ तसेच जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार २० जुलै रोजी सात रस्ता येथील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे ''आधुनिक पत्रकारिता आव्हाने आणि संधी'' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी सकाळी १०:३० वाजता इंडिया टुडे, मुंबईचे वरिष्ठ पत्रकार अभिजित कारंडे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी दै.सुराज्यचे मुख्य संपादक राकेश टोळ्ये, धर्मराज काडादी, रघुवीर शिराळकर, महेश रामदासी उपस्थित राहणार आहेत.

त्यानंतर प्रथम सत्रात इंडिया टुडे, मुंबईचे वरिष्ठ पत्रकार अभिजित कारंडे यांचे मार्गदर्शन होणार असून अध्यक्षस्थानी पत्रकार विजयकुमार देशपांडे हे राहणार आहेत. सोलापूर जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या चर्चासत्रात मुंबई तकचे वरिष्ठ पत्रकार निलेश झालटे, दै. पुढारीचे निवासी संपादक संजय पाठक, मिलिंद कुलकर्णी हे मार्गदर्शन करणार आहेत.




समारोप सत्रात पुणे विभागीय माहिती विभागाचे उपसंचालक डॉ. किरण मोघे आणि मुंबई येथील प्रसिद्ध मुक्त पत्रकार प्रशांत कदम यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा हे या समारोप सत्राचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. याप्रसंगी केंद्रीय संचार ब्युरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, दै. तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, पत्रकार सिद्धाराम पाटील, अपूर्वाईचे संपादक डॉ. रवींद्र चिंचोलकर आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या एकदिवसीय कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थी आणि पत्रकारांना सहभाग प्रमाणपत्राचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व पत्रकार आणि पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेस उपस्थित राहावे,

असे आवाहन पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे संकुलचे संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे, विद्यापीठाच्या जनसंज्ञापन विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे यांनी केले आहे.

## महिलेला घरात घुसून मारहाण; पाच महिलांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जुलै -**

शहरातील बुधवार पेठेतील वडार गल्लीमध्ये महिलेला घरात घुसून मारहाण केल्याप्रकरणी पाच महिलांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जगदेवी सिद्राम कोळी (वय ४०, रा. बुधवार पेठ, वडार गल्ली, बाळीवेस) या महिलेच्या फिर्यादीवरुन नागम्मा यमपुरे, साधना यमपुरे, रेश्मा इरकल, मधुरा इरकल, पल्लवी यमपुरे (रा. वडार गल्ली, बुधवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जगदेवी कोळी व नागम्मा यमपुरे या शेजारी राहण्यासत आले. १६ जुलै रोजी दुपारी जगदेवी कोळी या मुलगी संपदा हिच्यासोबत घरी होत्या. त्यावेळी कोळी यांच्या घरात नागम्मा यमपुरे, साधना यम पुरे, रेश्मा इरकल, मधुरा इरकल, पल्लवी यमपुरे घुसून पल्लवी हिने नागम्मा हिला कोळी यांच्या सासूला २ लाख रूपये जगदेवी यांच्याजवळ असल्याचे चुकीची गोष्ट सांगितली असे सांगितल्याच्या कारणावरून नागम्मा हिने जगदेवीचा गळा पकडून खाली पाडले.

त्यावेळी जगदेवी यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र तुटून कोठेतरी पडून गहाळ झाले व नुकसान झाले. जगदेवी खाली पडल्यानंतर इतरांनी हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. तसेच पल्लवी यमपुरे हिने घरातील चटणीचा डबा आणून जगदेवी यांच्या अंगावर टाकून पाणी घातले व नागम्मा हिने जगदेवी यांना बघून घेण्याची धमकी दिली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक खंडागळे पुढील तपास करीत आहेत.

## दिव्यांगाना न्यायालयीन सेवा मोफत

- जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मल्हार शिंदे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जुलै -**

दिव्यांगावर होणारे अन्याय, स्वतःचा गुन्हा दिव्यांगावर ढकलण्याची समाजवृत्ती आणि वारसा हक्काबाबत होणारी फसगत अशा आणि आवश्यक असणाऱ्या न्यायालयीन सेवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत मोफत पुरविण्यात येतात अशी माहिती जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचे सचिव मल्हार शिंदे यांनी दिली.




रोटरी नॉर्थ राधा किशन फोम रा मूक बधिर विद्यालयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाबाबत दिव्यांगाना देण्यात येणाऱ्या न्यायालयीन सेवांबाबतची माहिती आणि जागृती बाबत प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी प्राधिकरणाचे सचिव व मुख्य दिवाणी न्यायाधीश मल्हार शिंदे बोलत होते. प्रास्ताविक मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केले. रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थचे अध्यक्ष संतोष सपकाळ आणि शाळेचे सचिव सुनील दावडा मान्यवरांना स्मृतिचिन्ह आणि शाल देऊन गौरविले. मुख्य अधिक्षक ॲड स्नेहल राऊत यांनी विधी प्राधिकरणाबाबत प्रास्ताविक केले तर ॲड एम डी सोलनकर यांनी दिव्यांगासाठी असणाऱ्या कायद्यातील तरतुदींची आणि या विभागाकडून दिल्या जाणाऱ्या सेवेची सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमास संबंधित विभागाचे एस एस झुरळे, माळवदकर, शाळेचे सचिव सुनील दावडा, राजगोपाल झंवर, मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे, बळीराम पावडे, संजय चौगुले, रेणुका पसपुले, संध्या चंदनशिवे, विजया पिताळकर, योगिता बोधले, अश्विनी ढोणे, नागनाथ बसाटे, दिनेश ताटे, सोमनाथ ठाकर, सकलेन बडेखान, आनंद पारेकर, विठ्ठल सातपुते, चिदानंद बेनुरे, गंगाधर मदभवी, साहेब गौडा पाटील, अजित पाटील, सोमनाथ थोरात, बाबासाहेब पवार, शबाना शेख आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन सुनील दावडा यांनी मानले.

## लहान मुलांच्या भांडणातून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जुलै -**

पाण्याच्या टाकीखाली थांबलेल्या तरुण टाकी पडल्याने सर्वांगास मुकामार लागून जखमी झाला. ही घटना गुरुवारी दुपारी ४.१५ वाजता हगलूर शिवारात घडली. शुभम श्रीधर घुले (वय २१, रा. लष्कर सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. गुरुवारी दुपारी चारच्या सुमारास शुभम हा हगलूर शिवारातील पाण्याच्या टाकीखाली थांबलां होता. तेव्हा अचानक पाण्याची टाकी खाली पडली. यात सर्वांगास मुकामार लागून शुभम जखमी झाला. त्यास प्रीतम कारंजे याने शासकीय रुग्णालयात सायंकाळी ५.२० वाजता दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**पुण्यातील शरद मोहोळ खून खटला**

## विशेष सरकारी वकिल म्हणून ॲड. प्रदिपसिंग राजपूत यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जुलै -**

पुण्यातील कोथरूड भागात राहणारे शरद हिरामण मोहोळ ऊर्फ भाऊ यांचा खून ५ जानेवारी २०२४ रोजी गोळ्या घालून करण्यात आला होता. याप्रकरणी अरुण ध्रुपद धुमाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोथरूड पोलीस स्टेशनला आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले होते. याप्रकरणात शासनाच्या वतीने कामकाज पाहण्यासाठी सोलापूर जिल्हयाचे जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केल्याचा अध्यादेश महाराष्ट्र शासनाच्या वतीने नुकताच काढण्यात आला आहे.



सोलापूर जिल्हयाचे जिल्हा सरकारी वकील यांनी आजपर्यंत १०९ गुन्हेगारांना जन्मठेप तर, २ आरोपींना फाशीची शिक्षा घेण्यामध्ये यश मिळविले, असून इतर अनेक गुन्हेगारांना १ वर्ष ते २५ वर्षापर्यंत देखील शिक्षा घेण्यामध्ये यश मिळविले आहे, तसेच इतर अनेक गुन्हयामधील आरोपींचे जामीनांचे अर्ज व अटकपूर्व जामीनांचे अर्ज देखील नामंजूर करून घेतले आहेत आणि लातूर जिल्हा व सत्र न्यायालय येथे विशेष सरकारी वकील म्हणून महाराष्ट्र शासनाने यापूर्वी त्यांची नियुक्ती केलेली होती. तसेच महाराष्ट्र शासनाने ॲड. राजपूत यांची पुण्यातील इतर २ मोक्काच्या खटल्यांमध्ये विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली असून तसेच मुंबई उच्च न्यायालयामध्ये देखील काही खटल्यांमध्ये विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. सदर ॲड. राजपूत यांनी जवळपास २९ वर्षे विविध जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये फौजदारी वकील म्हणून काम केले असून, सोलापूर जिल्हयाचे जिल्हा सरकारी वकील म्हणून गेली ७ वर्षे ते काम करत आहेत. त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### आनंद शिंदे आत्महत्या प्रकरणात

## शकलेश जाधव यास अटकपूर्व जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

आनंद शिंदे यास आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी शकलेश जाधव, रा. सेटलमेंट, सोलापूर यांस प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांनी अंतरीम अटकपूर्व जामीन मंजूर केला.

यात हकीकत अशी की, मयत आनंद हा त्याच्या कुटुंबीयांसमवेत दमनी नगर येथे राहत होता व तो जागेच्या देवाण घेवाणीचा व्यवसाय करीत होता. मयत आनंद व शकलेश जाधव यांचेत सात रस्ता येथे भांडण झाले होते, त्यावेळी शकलेश याने मयत आनंद यांस मारहाण केली होती, तसेच अरुण रोडगे व मयत आनंद यांच्यात भांडण झाले होते तेव्हा अरुण रोडगे यांनी मयतास मारहाण केली होती. त्यानंतर शकलेश जाधव व अरुण रोडगे हे दोघे मयत आनंद यास त्रास देत होते. असे मयताने त्याच्या आईस सांगितले होते. दि. १४ जुलै २०२५ रोजी मयत आनंद हा त्याची मावशी शहाबाई जगताप हिचे कडे गेला होता. तेव्हापासून तो मावशीकडेच होता. दि. १५ जुलै २०२५ रोजी मयताची मावशी ही स्वयंपाकासाठी बाहेर गेली होती, त्यावेळी आनंद हा घरी एकटाच होता. दुपारी सव्वा एक वाजता मावशी कामावरून घरी आली त्यावेळेस आनंद हा गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. त्यावेळी त्याच्या हातात दोन चिठ्ठ्या मिळून आल्या,मी असा नव्हतो, माझी इच्छा न्हवती फाशी घ्यायची मला घ्यायला भाग पाडले, माझा मोबाईल हॅक करून निराश केले - अरुण रोडगे, व दुसऱ्या चिठ्ठी मध्ये, शकलेश जाधव, व सही असे लिहिलेले होते. त्यावरून मयताची आई अंजना दादाराव शिंदे यांनी दि.१५ जुलै २०२५ रोजी शकलेश जाधव व अरुण रोडगे यांच्या त्रासाला कंटाळून मुलगा आनंद याने आत्महत्या केली आहे, अशा आशयाची फिर्याद सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली होती.

आपणास अटक होऊ नये म्हणून शकलेश जाधव यांनी ॲड. जयदीप माने यांचेमार्फत न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. जामीन अर्जाच्या सुनावणी वेळी आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी आपले युक्तीवादात, फिर्यादीचे अवलोकन केले असता, सकृतदर्शनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे दिसून येत नसल्याचा युक्तिवाद मंडला, त्यावरून न्यायाधीशांनी २५ हजार रुपयाच्या जातमुचलक्यावर पाच दिवस पोलिस ठाण्यात हजेरी देण्याच्या अटीवर आरोपी शकलेश जाधव यास अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला. यात आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने, ॲड. प्रणित जाधव यांनी काम पाहिले.

## पत्नीने पतीला केली मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जुलै -**

घरगुती वादातून पती पत्नीच्या झालेल्या वादातून पत्नीने पतीला लाथाबुक्यांनी बदडले. ही मारहाण शुक्रवारी सकाळी ८.३० च्या सुमारास न्यू धोंडिबा वस्ती येथे घडली. राजू भिमण्णा जाधव (वय ३७, रा. न्यू धोंडिबा वस्ती) असे मारहाण झालेल्या पतीचे नाव आहे.

शुक्रवारी सकाळी आठच्या सुमारास राजू आणि त्याच्या पत्नीमध्ये घरगुती कारणातून वाद झाला. वाद चांगलाच टोकाला गेल्याने संतापलेल्या राजूच्या पत्नीने त्याला लाथाबुक्यांनी घरात बदडले. तसेच लाकडानेही मारहाण केल्याने राजूच्या सर्वांगास मुकामार लागला. यानंतर राजू स्वतः शासकीय रुग्णालयात सकाळी १०.१५ वाजता उपचाराकरीता दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## २० जुलैला गोरेगावमध्ये 'शासन आपल्या दारी' आणि गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थिती, सिद्धेश कदम यांचा पुढाकार**

**मुंबई, १७ जुलै २०२५**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेला 'योजना कल्याणकारी शासन आपल्या दारी' हा विशेष उपक्रम २० जुलै २०२५ रोजी, सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत, गोरेगाव येथील मुंबई प्रदर्शनी केंद्र अर्थात नेस्को येथे संपन्न होणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष व शिवसेना सचिव सिद्धेश कदम यांच्या पुढाकाराने व शिवतेज आरोग्य सेवा संस्थेद्वारे हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

या उपक्रमात नागरिकांना विविध शासकीय सेवा, योजना आणि प्रमाणपत्रे एकाच ठिकाणी सहज उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या भव्य उपक्रमासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतः उपस्थित राहणार असून, समाजकारणाच्या माध्यमातून लोकांपर्यंत शासनाच्या सेवा पोहोचवण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. या कार्यक्रमाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे १०वी व १२वी इयत्तेमध्ये ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा होणार असून यामध्ये विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. तसेच या कार्यक्रमाच्या निमित्ताने व्याख्याते विठ्ठल कांगणे सरांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरणार आहे.






शासन आपल्या दारी या उपक्रमाअंतर्गत नागरिकांना आधार कार्ड, पॅन कार्ड, ज्येष्ठ नागरिक कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, रहिवासी दाखला, राष्ट्रीयत्वाचा दाखला, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, स्मार्ट रेशन कार्ड, मतदान कार्ड, जातीचा दाखला, नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला असे अनेक शासकीय प्रमाणपत्र एकाच ठिकाणी मिळवता येणार आहेत. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी सर्व नागरिक, पालक आणि विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवतेज आरोग्य सेवा संस्था व सिद्धेश कदम यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# गोविंदराज गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी गोसकी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**



जूना विडी घरकुल येथील गोविंदराज गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी अनिल गोसकी तर सचिवपदी व्यंकटेश दोंता यांची एकमताने निवड करण्यात आली.

गोविंद गाजूल यांच्या निवासस्थानी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही निवड करण्यात आली. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख यांच्या स्थानिक विकास निधीतून चार अंतर्गत रस्ते कामाला सुरुवात झाली याबद्दल आ. विजयकुमार देशमुख यांचे आभार मानण्यात आले.

या गणेशोत्सव काळात समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष म्हणून गणेश तुम्मा, खजिनदार अमर कोलप्याक, सहखजिनदार शंकर श्रीकोंडा, सहसचिव अंबादास संगा, कार्याध्यक्ष गोविंद गाजूल,पूजा प्रमुख रोहित संगा, आदित्य दुडम, स्पर्धा प्रमुख चक्रधर अन्नलदास, दिनेश दुडम, प्रसिध्दी प्रमुख राजेश मामडयाल, आरोग्य शिबीर समिती सुशांत शेंडगे, प्रमोद मार्गम, हिरालाल माकम, भारत मेरगू, प्रविण एडके, मिरवणूक प्रमुख व्यंकटेश कारमपुरी सल्लागार बाळकृष्ण अवधूत, दिगंबर मार्गम, उमेश गायकवाड, श्रीशैल बंदगी,जगपती मिठ्ठा, तुळशीदास वाझंरे ,उमेश कामुर्ती, श्रीनिवास गुंडला, बालाजी पोबत्ती, श्रीनिवास इदनूर, किरण रच्चा, विनायक ताला यांची निवड करण्यात आली.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## महत्वाचे...

### कंत्राटदार महासंघाची उद्या साताऱ्यात बैठक

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

राज्यातील जलजीवन मिशनचे कंत्राटदार यांच्या देयके व इतर प्रश्न व समस्याबाबत सातारा येथे रविवारी २० जुलै रोजी राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनाचे राज्य अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी दिली. या बैठकीत राज्यातील जलजीवन मिशनचे कामे केलेले २५ जिल्ह्यातील संघटना व कंत्राटदार उपस्थित रहाणार आहेत. राज्यातील जलजीवन मिशनचे काम केलेले सर्व कंत्राटदार आर्थिक अडचणीत आहेत. यावर चर्चा व निर्णय घेण्यासाठी दि. २० जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता हॉटेल सुरूबन, सातारा येथे आयोजित करण्यात आली आहे. बैठकीस राज्यातील कंत्राटदार यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सातारा जलजीवन संघटनाचे अध्यक्ष प्रशांत भोसले, संजय जाधव, सिकंदर डांगे, समाधान घोरपडे, युवराज पवार यांनी केले आहे.

### पैसे नाहीत म्हणणाऱ्या महिलेला विटेने मारहाण

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

हातउसने पैसे नाहीत असे म्हणणाऱ्या महिलेला विटेने मारहाण करणाऱ्या दोघी महिलांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अलका विशाल साखरे (रा. रमाबाई आंबेडकर नगर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन अलका शहाजी कांबळे आणि पल्लवी शहाजी कांबळे (रा. न्यु बुधवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ जुलै रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास अलका साखरे या घरी होत्या. त्यावेळी शेजारी राहणाऱ्या अलका कांबळे व पल्लवी कांबळे या दोघांनी साखरे यांच्या घराजवळ येऊन त्यांना ५० हजार रुपये हात उसने दे असे म्हणाल्या. त्यावेळी साखरे यांनी पैसे नाहीत असे सांगितल्यावर दोघींनी मिळून शिवीगाळ करून साखरे यांना हाताने माराहण केली. तसेच पल्लवी कांबळे हिने विटेचा तुकडा हातात घेऊन साखरे यांच्या डोक्यात मारून जखमी केले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक फौजदार ओव्हळ पुढील तपास करीत आहेत.

### मोलकरणीच्या पगारासाठी पैसे आण म्हणून विवाहितेचा छळ


**सोलापूर, दि. १८ जुलै-**

मोलकरणीच्या पगारासाठी माहेरून पैसे आण म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सनाफातिमा जुबेर जहागीरदार (वय २१, रा. राम वाडी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती जुबेर, सासू नाजीम (रा. दर्गा रोड, भिवंडी, ठाणे), पतीची मामी परवीन कलकत्ते (रा. देवळाली कॅम्प, नाशिक), नणंद मेहजबीन जईद कादरी (रा. भिवंडी, ठाणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ नोव्हेंबर २०२३ ते ऑगस्अ २०२४ या कालावधीत सनाफातिमा या पती जुबेरसोबत सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती जुबेर व इतरांनी मिळून सनाफातिमा हिस शिवीगाळ करून मारहाण करून मोलकरणीच्या पगारासाठी माहेरून पैसे आण म्हणून शारीरीक व मानसिक छळ केला. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार चौधरी पुढील तपास करीत आहेत.

### शहरातून दोन दुचाकींची चोरी

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

शहर परिसरातून चोरट्यांनी दोन दुचाकींची चोरी केली. मजर जावीद शेख (वय २८, रा. साईनाथ नगर, अमन चौक, सोलापूर) यांनी १३ जुलै रोजी त्यांची एमएच १३ सीएक्स ८०८५ क्रमांकाची दुचाकी ही कुमठा नाका येथे हॅन्डल लॉक करून पार्क करून ठेवली होती. त्यावेळी ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार मुलाणी पुढील तपास करीत आहेत. नागेश मल्लिनाथ शिरसी (वय ३७, रा. चाटी गल्ली, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ बीई ८९७० क्रमांकाची दुचाकी ही ९ जुलै रेजी घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. त्यावेळी ती चोरटयाने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार भोगशेट्टी पुढील तपास करीत आहेत.



# अक्कलकोट बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद; सर्व व्यवहार ठप्प





## प्रदेशाध्यक्ष गायकवाड यांच्यावरील हल्ला प्रकरण

### खंडोबा मंदीरापासून निघाला निषेध मोर्चा, हजारोंची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ जुलै-**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्यावर झालेली शाईफेक व भ्याड हल्ला तसेच अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, अमोलराजे भोसले, बाळासाहेब मोरे यांची विनाकारण होत असलेली बदनामी याच्या निषेधार्थ श्री फत्तेसिंह शिक्षण संस्था, संभाजी ब्रिग्रेड, सकल मराठा समाज बांधव तसेच सकल बहुजन समाजाच्या वतीने आज दि. १८ जुलै रोजी अक्कलकोटमध्ये बंद पाळण्यात आला. त्याला सर्व व्यापाऱ्यांसह नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सर्व व्यवहार ठप्प ठेवले होते. यानिमित्ताने आज खंडोबा मंदिरापासुन शहरातील प्रमुख मार्गावरुन निषेध मोर्चा काढण्यात आला. त्यामध्ये हजारो नागरिक सहभागी झाले होते. तहसीलदार विनायक मगर यांना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी निवेदन सादर केले.

बहुजन चळवळीतील सर्व संघटना, नेते मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले आणि अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्यावर कांही जणांनी जाणूनबुजून बदनामीचे षडयंत्र सुरू केले होते. मात्र या प्रकरणाची खरी माहिती प्रवीण गायकवाड यांना देण्यात आली असल्याने त्यावर पडदा देखील पडल्याचे उपस्थित समाजबांधव व संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले. सभास्थळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. सकल मराठा समाज हा हल्ला कदापिही खपवून घेणार नाही. या घटनेच्या निषेधार्थ शुक्रवारी अक्कलकोट कडकडीत बंद पाळुन बहुजन समाजाची ही एकजुट व वज्रमुठ पहायला मिळाल्याचे मराठा समन्वयक माऊली पवार यांनी सांगत तेथे हल्ला घडला तेथेच प्रदेशाध्यक्ष गायकवाड यांचा भव्य सत्कार करण्याचा निर्धार व्यक्त केला. उपस्थितांनी हात ऊंचाऊन पाठिंबा दर्शविला. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष दिलीप सिद्धे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, भारीपचे जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, तालुका आरपीआय अध्यक्ष अविनाश मडीखांबे, दहिटणेचे उपसरपंच विकीबाबा चौधरी, ॲड. नदीम डोणगावकर, संभाजी ब्रिगेड महिला आघाडीचे जिल्हा अध्यक्ष निलम दास, लहूजी शक्ती संघटनेचे वसंतराव देडे, प्रहार संघटना जिल्हा संपर्क प्रमुख जमीर शेख, संभाजी आरमारचे श्रीकांत डांगे, देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा अध्यक्ष अमोल शिंदे, राजन जाधव, जिल्हा काँग्रेसचे अश्पाक बळोरगी यांनी भाषणातून घटनेचा निषेध व्यक्त केला.

याप्रसंगी डॉ. सुवर्णा मलगोंडा, दिलीप कोल्हे, नाना काळे, राम गायकवाड, तात्या वाघमोडे, सोमा राऊत, ॲड. गणेश कदम, शाम कदम, प्रताप चव्हाण, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजीराव भोसले, शहर अध्यक्ष शिरीष जगदाळे, निशांत कवडे, मनीषा कोळी, दिलीपराव निंबाळकर, अरविंदराव शेळके, शिवाजी चापले यांच्यासह जेष्ठ समाज सेवक सुरेशचंद्र सूर्यवंशी, श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रल्हाद जाधव, बाळासाहेब मोरे, संतोष फुटाणे, अमर शिंदे, सुधाकर गोंडाळ, अमोल पाटील, बाबासाहेब निंबाळकर, शामराव मोरे, अभय खोबरे, पद्माकर डीग्गे, संतोष भोसले, प्रा.प्रकाश सुरवसे, मनोज निकम, उबाठाचे तालुका प्रमुख आनंद बुक्कानवरे, विलासराव सुरवसे, अकिल बागवान, मतीनभाई पटेल, बंद्देनावज कोरबू, केरबा होटकर, शीतल जाधव, प्रवीण देशमुख, दहिटणे सरपंच नितीन मोरे, महादेव अनगले, युवराज लोणारी, मनोज गंगणे, कुपेंद्र ढाले, सुनील खवळे, राजू पाटोळे, नागू ऐवळे, सुरेश कदम, दयानंद काजळे, अरुण जाधव, अतुल जाधव, लाला राठोड, विलासराव राठोड, चंद्रकांत सोनटक्के, तम्मा शेळके, संदीप फुगे पाटील, संजय गोंडाळ, सागर गोंडाळ, वैभव नवले, राजू माकणे, सौरभ मोरे, गोविंदराव शिंदे, प्रवीण घाडगे, वरूण शेळके, प्रसन्न हत्ते, विजय माने, बाळासाहेब पोळ, निखील पाटील, अतिश पवार, अतिश कटारे, अंकुश चौगुले, सनी सोनटक्के, अशोक जाधव, शिंदे गटाचे शहर प्रमुख योगेश पवार, वैभव मोरे, विशाल कलबुर्गी, महेश पाटील, सत्तार शेख, सोमशेखर जमशेट्टी, महेश दणके, लक्ष्मण मचाले, मंगेश जाधव, अजय जाधव, मंगेश सूर्यवंशी, प्रसाद मोरे, गणेश पाटील, जोतीबा पारखे, मुन्ना राठोड, बाळासाहेब कुलकर्णी देसाई, सर्फराज शेख, मुबारक कोरबू, शरणप्पा अचलेर, राजेंद्र लिंबीतोटे, कांत झिपरे, योगेश कबाडे, बाबा घंटे, जितेंद्र यारोळे, गणेश होटकर, मैनुद्दीन कोरबू, अलीबाशा अत्तार, इसुप पटेल, अतिक अरब, अश्पाक शहर काझी, बरगली गुड्डे, सद्दाम शेरीकर, अमीन मुजावर, सागर याळवार, शिवा मंगरुळे, पिंटू दोडमनी, श्रीशैल शाली, शाकीर पटेल, धानप्पा कामाटी, श्रीनिवास सोनटक्के, मल्लिनाथ पाटील, मतीन बागवान, शिवानंद फुलारी, स्वामिनाथ गुरव, गिरीश गवळी, पिंटू साठे, तुकाराम धोत्रे, लक्ष्मण झंपले, वासू कडबगांवकर, आकाश शिंदे, मल्लिनाथ नंदिकोले, फहीम पिरजादे, योगेश पवार, लक्ष्मण विभूते, उत्तम इंगळे, सुमित कल्याणी, ऋषी लोणारी, अतिक अरब, रइस टीनवाला, संजय देशमुख, दत्ता माडकर, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, राजू पवार, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, रुद्रय्या स्वामी, शिव स्वामी, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.

या बंदमध्ये शाळा, महाविद्यालये, दुकाने व अन्य व्यवहार बंद होती. दवाखाने आणि मेडिकलसारख्या अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात आली होती. बाहेरून येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये आणि स्थानिक जनतेला अडचण होऊ नये म्हणून बंद फक्त दुपारी दोन वाजेपर्यंत असला तरी तो पूर्णतः कडकडीत होता. सूत्रसंचालन व आभार फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे संचालक बाळासाहेब मोरे यांनी मानले. या मोर्चा व सभास्थळी नसरोद्दीन मालीनमली यांनी पाणी बॉटलचे वाटप केले.

#### विविध संघटना बंदमध्ये सहभागी

मोर्चास ५० सामाजिक संघटना, पक्ष यांनी पाठींबा दर्शविला होता. बंदमध्ये अक्कलकोट व्यापारी असोशिएशन, शाळा, महाविद्यालय यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. श्री कमला राजे चौक येथे निषेध मोर्च्याचे विराट सभेत रुपांतर झाले.

# कुमठा नाका परिसरातील तुषार रॉय या बोगस डॉक्टरावर गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

कुमठा नाका परिसरात डॉक्टरकीची कोणतीही पदवी नसताना बेकायदेशीरपणे डॉक्टर पदवी लावून क्लिनीक चालविणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महापालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद मरिअप्पा कुमार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुषार देवेंद्रनाथ रॉय (वय ४२, रा. ९९ गंगाधर नगर, एम आयडीसी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून बोगस डॉक्टरांची शोध मोहिम सुरु करण्यात आली आहे. या मोहिमेतील आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद यांना कुमठा नाका परिसरात तुषार रॉय हा बोगस डॉक्टर क्लिनीक चालवित असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून महानगरपालिकेच्या पथकाने कुमठा नाका येथील तुषार रॉय याच्या क्लिनीकवर छापा टाकला. यावेळी पथकाने केलेल्या तपासणीमध्ये तुषार रॉय याच्याकडे कसल्याचही प्रकारची वैद्यकीय व्यवसायाकरीता लागणारी शैक्षणिक पात्रता नसल्याचे दिसून आले. तसेच नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठीचीदेखील पात्रता नसल्याचे दिसून आले. त्यामुळे बोगस कागदपत्रांच्या आधारे तुषार रॉय हा डॉक्टर उपाधी लावून सामान्य नागरीक व प्रशासनाची फसवणुक करीत असल्याचे दिसून आले. त्यामुळे याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक अहिवळे पुढील तपास करीत आहेत.



# हेरिटेज मणिधारी येथे शिव मंदिराचे लोकार्पण

### जलकुंभ मिरवणुकीत महिलांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

येथील अक्कलकोट रोड वरील हेरिटेज मणिधारी एम्पायर येथील जिर्णोद्धार करण्यात आलेल्या शिवमंदिराचा लोकार्पण सोहळा व शिवलिंग तसेच नागोबा मूर्ती प्राणप्रतिष्ठापना कळसारोहण समारंभ जलकुंभ मिरवणुकीने संपन्न झाला.

यावेळी श्रीश्री १००८ जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य भगवत्पाद, काशीपीठ यांच्या अमृत हस्ते हा विधी झाला. यावेळी हिरेमठ संस्थान आचलेरचे श्री.ष.ब्र. अभिनव सुत्रेश्वर शिवाचार्य महास्वामी, दुधनीच्या विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र.डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजी, नागणसूर मठाचे श्री.ष.ब्र. श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती. येथील गुरुशांत गाडी यांनी कै. मल्लेशप्पा गाडी यांच्या व पूर्वजाच्या स्मरणार्थ या मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे. यावेळी विजयालक्ष्मी गाडी, शंकर गाडी, माधुरी गाडी, सिद्धण्णा गाडी, ईश्वरी गाडी आदींसह परिसरातील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शुक्रवारी दि. १८ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता जलकुंभ मिरवणूक काढण्यात आली. इरकल साडी परिधान केलेल्या व डोक्यावर कळशी घेतलेल्या महिलांचा सहभाग होता. मिरवणुकीस दत्त मंदिरापासून सुरुवात झाली. गेट नंबर दोन हायवेवरून गेट नंबर एकमधून सोसायटीत प्रवेश करत ही मिरवणूक गाडी यांच्या घराकडे जाऊन येळमेली घरासमोरुन जाऊन गणपती मंदिराजवळ विसर्जित झाली. प्रतिष्ठापनेनंतर सर्वांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# डॉ. हेडगेवार रक्तपेढीचा उद्या रक्तदाता कृतज्ञता सोहळा

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जुलै-**

डॉ. हेडगेवार रक्तपेढी संस्थेच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त रविवारी दि. २० जुलै रोजी शिवस्मारक येथे सकाळी १० वाजता रक्तदाता कृतज्ञता समारंभाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती रक्तपेढीचे अध्यक्ष रमेश विश्वरूपे यांनी दिली.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उद्योजक नित्यानंद दर्बी, तसेच सामाजिक समरसता मंचाच्या महाराष्ट्र प्रांताचे निमंत्रक डॉ. रमेश पांडव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अनेक रुग्णांना, अपघातग्रस्तांना रक्ताची नितांत गरज असते. अशावेळी ऐच्छिक रक्तदाते पुढाकार घेऊन रक्तदान करून हजारो रुग्णांचे प्राण वाचवतात. रक्तदात्यांना रक्तदान करता यावे याकरिता अनेक सामाजिक संस्था, संघटना, महाविद्यालये, लोकप्रतिनिधी तसेच श्री गणेशोत्सव, श्री शिवजयंती, नवरात्रोत्सव अशा मंडळांकडूनही मोठ्या प्रमाणावर रक्तदान शिबिरे आयोजित केली जातात. अशा सर्व रक्तदात्यांविषयी आणि आयोजकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदाता कृतज्ञता समारंभास रक्तदाते आणि आयोजकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष श्री. विश्वरुपे यांनी केले आहे. प.पू.



सरसंघचालक तथा संघ संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या जन्मशताब्दीत सेवाकार्याचे जाळे देशभर उभारले गेले. अशाच प्रकारचे एक सेवाकार्य सोलापुरात ३५ वर्षापूर्वी सुरू झालेल्या डॉ.हेडगेवार रक्तपेढीच्या रूपाने सुरू झाले. १९८९ मध्ये डॉ.हेडगेवार जन्मशताब्दी झाली. तत्कालिन पू.सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी संघकार्यात सेवाकार्य हे आयाम जोडले. त्यानंतर अल्पावधीत देशभरात संघाची सेवाकार्ये उभारली गेली. त्यामागे सेवाभावाचे जागरण आहे. याच उदात्त भूमिकेतून



१९९० ला सोलापुरात डॉ. हेडगेवार रक्तपेढीची मुहूर्तमेढ रोवली गेली. रा.स्व. संघ सेवाकार्य विभागाचे अ.भा.प्रमुख डॉ. सूर्यनारायणराव यांच्या हस्ते रक्तपेढीचा शुभारंभ झाला. तेव्हापासून दरवर्षी रक्तपेढीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून रक्तदात्यांविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते.

# पाच लाख अन् तीन तोळे सोन्यासाठी विवाहितेचा छळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जुलै-**

कर्ज फेडण्यासाठी पाच लाख रूपये तसेच तीन तोळे सोने माहेरून घेऊन ये म्हणून विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह पाचजणांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रांजली शुभम आवटे (वय २४, रा. रक्षक पार्क, विजापूर रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती शुभम, सासू सुवर्णा, सासरे केदारनाथ, दीर योगीनाथ, नितीन (सर्व रा. साई पार्क, दहिटणे, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रांजली आवटे या २७ डिसेंबर २०२० ते मार्च २०२५ या कालावधीत सासरी पतीसोबत नांदण्यास होत्या. त्यावेळी पती शुभम व त्याच्या घरातील लोकांनी कर्ज फेडण्यासाठी प्रांजली हिने माहेरून पाच लाख रूपये व तीन तोळे सोने घेऊन यावे म्हणून तिला शिवीगाळ करून मारहाण केली तसेच मानसिक त्रास देऊन उपाशीपोटी ठेऊन जाचहाट केला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११८२

**जेणें मुखें स्तवी ।**
**तेंचि निंदेपाठीं लावी ।।**

निंदा हा स्वत:च्या बाबतीत कोणालाही न आवडणारा विषय आपला तरी अनेकांना इतरांची निंदा करण्यात आनंद वाटत असतो. त्याचबरोबर स्तुती हा जवळपास सर्वांनाच आवडणारा विषय असला तरीही सत्य असूनही इतरांची स्तुती करणे अनेकांना आवडत नाही. अर्थात, जो योग्य नाही तो विषय चर्चिण्यात आनंद वाटावा आणि जो योग्य आहे तो विषय टाळण्यात आनंद वाटावा हे आश्चर्यच आहे. विशेष म्हणजे या आश्चर्याचा अनुभव जवळपास सर्वांनाच येत असतो. कळत न कळत आपल्याकडूनही अशा प्रकारचे आश्चर्य घडले जात असावे. दुसऱ्याला कमी लेखण्याने आपणाला मोठेपण मिळत नसले तरीही अनेक लोक इतरांना नको ती नांवे ठेवून आपण त्यांच्यापेक्षा मोठे, चांगले, योग्य कसे आहोत, हे दाखविण्याचा प्रयत्न करीत असतात. बऱ्याचवेळा केवळ समोरच्याला बरे वाटावे किंवा त्याच्या सहवासातील इतरांना बरे वाटावे म्हणून लोक समोर गोड-गोड किंवा स्तुतीप्रिय बोलतात आणि समोरच्यापासून बाजूला



जाताच त्याच उपस्थित लोकांसमोर किंवा इतरांसमोर त्या व्यक्तीबद्दल निंदात्मक बोलू लागतात. अशा दुतोंडी लोकांबद्दल बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, जेणें मुखें स्तवी । तेंचि निंदेपाठीं लावी ।। विंचू लाभेंविण । तुका म्हणे वाहे शिण ।।

एखाद्याला वाईट म्हणण्यासाठी प्रथम आपण वाईट व्हावे लागते. अर्थात, आपल्या मनात वाईट विचारांना जन्म द्यावा लागतो. आपल्याकडे वाईट नसेलच तर आपल्या मूखातून वाईट बाहेर पडण्याचा प्रश्नच उद्भवतच नाही. एखाद्याची निंदा करायची म्हणजे आपल्या मनात, डोक्यात वाईट, निंदात्मक विचाराचे ओझे वाहावे लागते. या ओझ्यातून कोणाचे कांहीही चांगले होत नाही. तरीपण विंचू जसा त्याच्या नांगीमध्ये विषाचे ओझे घेऊन फिरत असतो, तसा माणूस इतरांबद्दल विषारी, कुजक्या विचाराचे ओझे मनात घेऊन फिरत राहातो. अशा वाईट, कुविचारी माणसाचे तोंडही पाहण्याची वेळ आपल्यावर येऊ नये, असे तुकाराम महाराज म्हणतात. समोर एक आणि माघारी एक बोलणाऱ्यांची समाजात संख्या कांही कमी नाही. समोरचा बाजूला सरकताच घाण ओकणारे लोक पुन्हा तो व्यक्ती समोर येताच कौतुकास्पद बोलू लागतात. अशा दूतोंडी बोलणाऱ्या लोकांना तेवढया वेळेपुरता आनंद मिळत असला तरीही समाजाच्या नजरेत मात्र अशा लोकांना चांगले स्थान नसते. कालांतराने असे दुतोंडी लोक स्वत:च्याही नजरेतून उतरु लागतात. स्वत:च्या नजरेतून स्वत:ला उतरविणे अत्यंत लज्जास्पद असते. अशी लज्जास्पदाची वेळ ज्ञानोबा-तुकोबांच्या भक्तांवर कधीही येणार नाही. कारण ज्ञानोबा-तुकोबांचे भक्त कोणाचीही निंदा करीत नाहीत. आपल्या सद्गुरुंच्या नांवाकडे कोणीही चुकीच्या दृष्टीकोनातून बोट करु नये. असे आपणाला वाटत असेल तर आपण स्वप्नातही कोणाची निंदा करु नये. त्याचबरोबर अकारण कोणाची स्तुतीही करु नये, अशी संत ज्ञानोबा-तुकोबारायांच्या भक्तांना नम्र प्रार्थना.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष- चांगला दिवस |
| दि. १९ जुलै २०२५ | श्री जयराम बाबा पुण्यतिथी |
| विक्रम संवत् २०८१ | |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - आषाढ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. नवमी (१४.४२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - भरणी (२४.३७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शुल (२४.५४) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (२५.२८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** बुद्धीचे कामे अधिक करू नका. आहारात नियमितता ठेवा. व्यापार मध्यम राहील. व्यक्तिगत समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील जबाबदारीकडे लक्ष द्या.

**वृषभ :** अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. व्यापारात फायदा होईल. मोठ्या लोकांशी संबंध वाढतील. आर्थिक चिंता सलत राहील. कौटुंबिक तणाव रहाण्याची शक्यता.

**मिथुन :** आपल्या चातुर्याचे आपले अधिकारी कौतुक करतील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. आर्थिक आवक वाढेल. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा.

**कर्क :** व्यवसायात अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. भ्रमात न राहता स्व:विवेक बुद्धीने काम करा. कौटुंबिक परिस्थिती तणावपूर्ण राहील.

**सिंह :** शुभचिंतकाची भेट झाल्यामुळे आनंदी रहाल. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर मान सन्मान व प्रतिष्ठा मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कन्या :** विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. आशाजनक वातावरण निर्माण होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. प्रवास शक्यतो टाळा.

**तुळ :** कोणत्यातरी प्रसिद्ध व्यक्तिशी संबंध वाढतील. आरोग्य चांगले राहील व्यापारामध्ये विस्तार होईल. स्थावर मालमत्तेची विक्री करतांना घाई गडबड करू नका.

**वृश्चिक :** कौटुंबिक सहकार्य मिळाल्याने आजचा दिवस आनंदी जाईल. पराक्रम व क्षमतेमुळे आपल्याला यश व फायदा होईल. खर्च विचार करून करा. रोजगारात प्रगती राहील.

**धनु :** धार्मिक, शुभकार्याची आखणी कराल. आपल्या लोकप्रियतेचा फायदा होईल. आरोग्य मध्यम राहील. मेहनतीवर विश्वास ठेवा चांगले फळ मिळेल. कौटुंबिक सुख मिळेल.

**मकर :** चांगल्या व्यक्तींचा संपर्क ठेवा. आर्थिक आवक वाढणार आहे. आपल्यापेक्षा मोठ्या लोकांचा आदर व सेवा करा. आळस सोडून द्या. समाजात आपली पत वाढेल. मानसिक ताण कुटूंबाचा खूप राहील. आर्थिक फटका बसेल.

**कुंभ :** व्यापारातील फायदा, मानसिक प्रसन्नता व उत्साह वाढविल. मुलांच्या भविष्याची काळजी राहील. आर्थिक स्थिती चांगली राहील.मीन : रोजगारात परिवर्तन कींवा नवीन संधी चालून येईल.

# शालेय विद्यार्थ्यांवर संशोधन, कौशल्य, उद्यमशीलतेचे संस्कार करा: कुलगुरू डॉ. महानवर

## सोलापूर विद्यापीठात प्राथमिक व माध्यमिकच्या दोन हजार शिक्षकांचे प्रशिक्षण सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

शालेय जीवनातील मुलांमध्ये उत्सुकता आणि विचार करण्याची प्रचंड क्षमता असते. त्यामुळे चांगले संशोधक घडून त्यातून उत्तम समाज निर्मिती व्हावी, याकरिता दैनंदिन जीवनातील समस्यांना संशोधनाशी जोडण्याचे शिक्षण शिक्षकांनी विद्यार्थ्यांना देण्याची आवश्यकता आहे. तसेच शालेय वयातच त्यांच्यावर संशोधन, कौशल्य व उद्यमशीलतेचे संस्कार करावे, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व सहचर्य विभागातर्फे प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या शिक्षकांकरिता आयोजित उद्यमशाळा या दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन शुक्रवारी विद्यापीठात कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, राष्ट्रीय शोधयात्रा अभियानाचे राष्ट्रीय समन्वयक चेतन पटेल, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख, गटशिक्षणाधिकारी बापूराव जमादार, विद्यापीठाच्या इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. विकास पाटील, कौशल्य विकास विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी प्रिसिजन फाउंडेशन, सर फाउंडेशन, सेवावर्धिनी, स्वदेशी जागरण मंच, साविष्कार या संस्था सहआयोजक आहेत. एकूण दोन हजार शिक्षकांचा यामध्ये सहभाग आहे. कुलगुरू डॉ. महानवर म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात आणि महाराष्ट्रात बुद्ध्यांक अधिक असलेले विद्यार्थी प्रचंड मोठ्या प्रमाणात आहेत. भविष्यात विद्यार्थ्यांनी नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारे बनावे, असे स्वप्न शिक्षकांनी दाखवावे. त्याकरिता शालेय विद्यार्थ्यांना संशोधन, कौशल्याधारित शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती रुजवल्यास जागतिक दर्जाचे संशोधक आणि उद्योजक निश्चितपणे घडतील, असा आशावादही कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी व्यक्त केला.





### अशा कार्यशाळांचा निश्चित उपयोग

शिक्षणाधिकारी शेख म्हणाले, बाल वयातच विद्यार्थ्यांना कौशल्य शिक्षण देण्याची गरज आहे. त्याचा उपयोग त्यांना पुढील आयुष्यात होणार आहे. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणातही यावर भर दिलेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये संशोधक आणि उद्योजक वृत्ती घडण्यासाठी अशा कार्यशाळांचा निश्चित उपयोग होईल. प्रा. विकास पाटील यांनी प्रास्ताविक केले. सेवावर्धिनीचे वरिष्ठ प्रकल्प अधिकारी चन्नवीर बंकुर यांनी परिचय करून दिला. प्रा. तेजस्विनी कांबळे आणि प्रा. श्रुती देवळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रिसिजन फाउंडेशन जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे, सर फाउंडेशनचे सिद्धाराम माशाळे, बाळासाहेब वाघ, सेवावर्धिनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश देगावकर, स्वदेशी जागरण मंच प्रांत संयोजक मुकुल वैद्य, उद्यम इनक्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेश गुराणी, अरविंद दोरवट, चन्नवीर बंकुर, साविष्कारचे शिवरत्न पवार, आदित्य मुसके, ओम इंगळे, एस. एन. डी. टी. विद्यापीठाचे प्रा. डॉ. सचिन लड्डा, भगीरथ ग्रामविकासचे डॉ. प्रसाद देवधर, अनघा जाधव आदी उपस्थित होते.

### शालेय विद्यार्थ्यांना दाखवणार विद्यापीठातील संशोधन

सोलापूर जिल्हाभरातील शालेय विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात खडकशास्त्र, पुरातत्वशास्त्र, रसायनशास्त्र अशा विविध विभागांमध्ये सुरू असलेले संशोधन तसेच विद्यापीठा नजीक असलेले विज्ञान केंद्र दाखविण्यात येईल, असे कुलगुरू प्रा. डॉ. महानवर यांनी याप्रसंगी सांगितले.

### विविध स्टार्टअपमध्ये सहभाग घ्यावा

प्र- कुलगुरू डॉ. दामा म्हणाले, सोलापूर विद्यापीठ विद्यार्थ्यांसाठी संशोधन, क्रीडा, पर्यावरण, कौशल्य विकास आदी क्षेत्रात कार्य करत आहे. विद्यार्थ्यांनी विविध स्टार्टअपमध्ये सहभाग घ्यावा. विद्यार्थ्यांना या विषयात रुची निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत.

**विद्यार्थ्यांना निश्चितपणे प्रेरणा मिळेल**

चेतन पाटील म्हणाले, शिक्षकांनी मुलांच्या कल्पनांना प्रोत्साहन द्यावे. त्यातून संशोधक, उद्योजक, शास्त्रज्ञ घडतील. कोणतेही संशोधन समस्या संपवते. शालेय शिक्षणाला समाजाशी जोडण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना संशोधक, चांगली शेती करणारे शेतकरी, उत्कृष्ट कारागीर यांची प्रत्यक्ष भेट घालून देणे आवश्यक आहे. यातून विद्यार्थ्यांना निश्चितपणे प्रेरणा मिळेल.

## विधानभवनातील मारहाण न शोभणारी : राष्ट्रवादी शरद पवार गट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

विधान भवनातील लॉबीमध्ये गुरुवारी जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्याला मारहाण झाली, ही भाजपाच्या संस्कृतीला न शोभणारी आहे. मुख्यमंत्री हे बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या वतीने आंदोलनावेळी चंद्रकांत पवार यांनी केला.

शुक्रवारी (दि. १८ जुलै) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे विमुक्त जाती भटक्या जमाती सेलच्या वतीने निदर्शने आंदोलन करण्यात आली. लोकशाही वाचवा संविधान वाचवा, चले जाव चले जाव मुख्यमंत्री चले जाओ, गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी घोषणाबाजी करत विधानभवनामध्ये गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांनी केलेल्या हल्ल्याचा निषेध करण्यात आला. पडळकर हे वारंवार शरदचंद्र पवार यांच्या कुटुंबीयांवर आरोप करत असतात. असल्याचा आरोप दादाराव रोटे यांनी बोलताना केला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे महंमद इंडिकर, अक्षय जाधव, राकेश सोनी, रामप्रसाद शागलोलु, प्रवीण वाडे, राम पवार, रविकांत चौगुले, जावेद शिकलगर, सूर्यकांत शेरखाने, शक्ती कटकधोंड आदी उपस्थित होते.







## बागबान जमियततर्फे गुणवंत विद्यार्थांना पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

शहर बागबान जमियत सिटी ट्रस्टतर्फे विद्यार्थाना पारितोषिक वितरण जमियते उलेमा हिंदचे अध्यक्ष मौलाना इब्राहिम कासमी व नवनिर्वाचित न्यायधीश मुंजरीन जेलर हे प्रमुख पाहुणे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बागबान जमियतचे अध्यक्ष डॉ. एम. ए. दलाल यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमात दहावी, १२वी, पदवी व पीएच.डी. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या २५० विद्यार्थ्यांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात मौलाना इब्राहिम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, शिक्षणाशिवाय प्रगती होऊ शकत नाही. इस्लाममध्ये असणारे शिक्षणाचे महत्व त्यानी विशद केले. मुंजरीन जेलर यांनी सुद्धा विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कि, उद्दिष्टये डोळ्यासमोर ठेवून उपलब्द सामुग्रीच्या माध्यमाने जिद्दीने व प्रामाणिक प्रयत्न केल्यास निश्चित यश प्राप्त होते. अध्यक्षीय भाषण डॉ. एम.ए. दलाल यांनी केले. प्रारंभी जमियतचे उपाध्यक्ष अल्ताफ लिंबूवाले यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. हारून बागवान यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमास महाराष्ट्र बागबान एज्यूकेशन ट्रस्टचे सेक्रेटरी नसीर अहमद खलिफा, लवाद समितीचे चेअरमन अ‍ॅड. रफिक बागबान, लवाद समितीचे सदस्य मुख्तार हुमनाबादकर, राजा बागबान, मौलाबक्ष तुळजापुरे, जमियतचे उपाध्यक्ष मुश्ताक अहमद चौधरी, सेक्रेटरी अखलाख मर्चंट, खजिनदार इम्तियाज दलाल, जॉईंट सेक्रेटरी फय्याज बागबान, संचालक मुश्ताक एम. राऊंड, अय्युब कल्याणी, सादीक बागवान, नाजीम कामतीकर, इफ्तेकार तुळजापुरे, अश्फाक बागवान, दाऊद बागवान, हाफिज अ. सलाम, अ‍ॅड. आमिर बागवान, इंजि. मुश्ताक बागवान, जमियतचे माजी उपाध्यक्ष अ. मुनाफ चौधरी, माजी संचालक अ. रहिमान तुळजापुरे उपस्थित होते. सूत्रसंचालन मोहंमद अली यांनी केले तर आभार अशपाक बागवान यांनी मानले.

## श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक परिसरात ५०० वृक्षारोपण करण्याचा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण हे अत्यंत आवश्यक आहे. दिवसेंदिवस होत चाललेले प्रदुषण तापमानातील वाढ आणि नष्ट होत चाललेले जैवविविधतांचे संतुलन यावर तोडगा म्हणजे अधिकधिक झाडे लावणे व संगोपण करणे. त्यामुळे श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक परिसरात ५०० वृक्षारोपण करण्याचा संकल्प केल्याचे प्राचार्य गजानन धरणे यांनी सांगितले.

श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक एनएसएस विभाग व भारत विकास परिषदतर्फे करण्यात आलेल्या वृक्षारोपणप्रसंगी ते बोलत होते. महाराष्ट्र शासनाच्या 'झाडे लावा झाडे जगवा' ही संकल्पना घेऊन वेगवेगळ्या



प्रकारची ७० रोपे लावण्यात आली आणि पर्यावरण संगोपनाची शपथ घेण्यात आली. प्लॅस्टिक वापरणे टाळा व सेंद्रिय खत वापरा असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

यावेळी सिद्धेश्वर पंच कमिटीचे सदस्य काशिनाथ ढोले, अ‍ॅड. आर.एस. पाटील, भारत विकास परिषदचे अध्यक्ष महादेव न्हावकर, पर्यावरण गतिविधीचे प्रमुख अजितकुमार देशपांडे, रा.स्व संघाचे शहर संघचालक राजेंद्र काटवे, महेश देशपांडे, कोषाध्यक्ष कुर्रा, गौरी आमडेकर, किशोरी भट, स्मिता देशपांडे, महेश साठे, प्रवीण तळे, एन. एस. कुलकर्णी, हेमा मोडक, आनंद मोहोळकर, प्रमुख प्रतिभा पाटील, डॉ.नीता आळंगे, प्रमोद शिवगुंडे, नवनाथ माने,श्रीशैल माळेवाडी, प्रमोद मेणसे, स्वाती मनियाल व विभाग सदस्य आदि उपस्थित होते.

## ४७० परिचारिकांचे बेमुदत काम बंद आंदोलन

### कंत्राटी पद्धत बंद करून कायमस्वरूपी जागा भरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

वेतन त्रुटी रद्द करण्यात यावी, कंत्राटी पद्धत बंद करून कायम स्वरूपी जागा भरण्यात याव्यात. ८०-२० धोरण रद्द करा, पुरुष संवर्गाला न्याय द्यावा अशा विविध मागण्यांसाठी १८ जुलैपासून महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर व सोलापूर शाखेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज सर्वोच्च रुग्णालय येथे ४७० स्टाफ नर्स बेमुदत काम बंद आंदोलनावर गेले आहेत. सबंध महाराष्ट्रातून साडेचार हजार परिचारिकांचा या बेमुदत काम बंद आंदोलनामध्ये सहभाग आहे.


राज्यातील परिचारिकांना केंद्राप्रमाणे नर्सिंग भत्ता ७२००, गणवेश भत्ता १८०० मंजूर करावा. पात्र परिचारिकांना शैक्षणिक भत्ते मंजूर करावे. केंद्राप्रमाणे राज्यातील परिचारिकांच्या पदनामांमध्ये बदल करा. राज्य शुश्रुषा सेल स्थापन सक्षम करून परिचारकांचे संवर्गाचे तीन प्रतिनिधी व सर्व पदे भरा. वाढती लोकसंख्या व खाटानुसार परिचारिकांची पद निर्मिती करा. ग्रामीण रुग्णालयातील रद्द केलेले परिसेविका पद पुनर्जीवित करा. परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी नवीन निवासस्थान उपलब्ध नसल्यास निवासस्थाना ऐवजी देय असलेला अतिरिक्त घर भाडे भत्ता द्यावा. कर्तव्यावरील परिचारिकांवर सुरक्षेबाबत ठोस उपाययोजना करण्यात याव्यात. परिचारिकांना बायोमेट्रिक या प्रणाली मधून वगळण्यात यावे. राज्यातील सर्व रुग्णालयांमध्ये पाळणाघर व चेंजिंग रूम उपलब्ध करून करावेत. राज्यातील सर्व संस्थांमध्ये रिपोर्टिंग साठी डेटा एन्ट्री ऑपरेटर उपलब्ध करून द्यावेत किंवा परिचारिकांचे अतिरिक्त पद निर्माण करावे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांना ध्येय असलेला प्रोत्साहन भत्ता सप्टेंबर २०१८ पासून दयावा. अशा विविध मागण्या परिचारिका संघटनेच्या आहेत.

यावेळी राज्याध्यक्ष डॉ.मनीषा शिंदे, शाखा अध्यक्ष संध्या गावडे, सचिव आशा माने, कार्याध्यक्ष नागराज वमने, संघटक अभिजित बेगमपुरे, सहसचिव विरेष महाजनी, मीरा चव्हाण, शशीकांत साळवी, ओंकार कर्नेकर, सदाशिव केंद्रे, गणेश धज, महिंद्रा बिराजदार, पुष्पा गायकवाड आदी उपस्थित होते.




### मागण्या पूर्ण होण्यासाठी पत्र व्यवहार करू

रुग्णालयाचे डीन डॉ. ऋत्विक जयकर यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन परिचारिकांच्या प्रलंबित मागण्या लवकरात लवकर पूर्ण व्हाव्यात यासाठी संस्था स्तरावरून जिल्हाधिकारी यांच्या मार्फत प्रशासनाशी पत्रव्यवहार करू असे आश्वासित केले.



## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाकडून अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार सोलापूर शहर-जिल्ह्याच्यावतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या हस्ते भैय्या चौक, सोलापूर येथील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी चंद्रकांत पवार, प्रवीण वाडे,विजय भोईटे, व्ही.डी. गायकवाड, प्रमोद भवाळ, ज्ञानेश्वर सोनवणे, डॉ. गोवर्धन सूंचू, संजय जाबा, सुनीता दळवी, बिरप्पा बंडगर, शहर सरचिटणीस सुरेश कुंभार, संदीप साळुंखे, रामप्रसाद शागालोलू व शक्ती कटकधोंड उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते ओंकार कारखाना परिवाराचा सन्मान

**पिलीव, दि. १८ जुलै-**

ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील व संचालक प्रशांत बोत्रे-पाटील यांनी ग्रामीण भागावर लक्ष केंद्रीत करुन बंद पडलेले साखर कारखाने सुरू करुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांनमध्ये यांच्यामध्ये विशवासहरता निर्माण करुन ग्रामीण भागाचा प्रचंड कायापालट केला आहे. यामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबाना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. ओंकार परिवारची या क्षेत्रातील दैदीप्यमान कामगिरी पाहुन नवी दिल्ली येथे विकसीत भारत २०२५ लिडरशिप या कार्यक्रमात केंद्रीय रस्ते वाहतुक व दळणवळण मंत्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते संचालक ओमराजे बोत्रे-पाटील यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंद्र यादव, केंद्रीय उदयोग मंत्री चिराग पासवान उपस्थित होते. ओंकार साखर कारखाना परिवाराने ग्रामीण भागातील शेतकरी, कामगारांचे जिवनमान उंचावणयाचे काम प्रामाणिकपणे केले आहे. साखर कारखानदारी बरोबरच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी कारखाना स्थळावर वृक्षारोपण तसेच त्याचे संगोपन केले, अशी अनेक सामाजिक कामे करीत या परिवाराने आगळावेगळा ठसा उमटविला आहे. याबद्दल ओंकार परिवाराचे संचालक ओमराजे बोत्रे-पाटील यांना केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



### खळवे येथे यशस्वी गुणवंताचा गौरव

**अकलूज, दि. १८ जुलै-**

खळवे गावातील निखिल ननवरे हा विद्यार्थी नुकताच चार्टर्ड अकाउंट परीक्षा उत्तीर्ण झाला असून त्याने गावाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला आहे. तसेच याच गावातील डॉ. विशाल आणासो नाईकनवरे यांनी केंद्र व राज्य शासन आयोजित कायाकल्प आरोग्य प्रकल्पात सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे, म्हणून गावातील प्रतिष्ठित असा सुरवसे परिवार जो नेहमीच गावातील यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देतो अशा परिवाराकडून म्हणजेच संजय सुरवसे, पै. सुधीर सुरवसे, सुनील सुरवसे व संपूर्ण सुरवसे परिवार यांनी निखिल व त्याचे वडील उत्तम ननवरे व डॉ. विशाल व त्यांचे वडील आण्णासो नाईकनवरे यांचा सन्मान केला. सत्कार सोहळ्यासाठी रेवन ननवरे, गणेश प्रधाने, भगवान चव्हाण, संताजी माने देशमुख, नवनाथ ननवरे, सोमनाथ ननवरे, किसन ननवरे, सुधाकर ननवरे पपु ननवरे, दादासाहेब ननवरे, गणेश ननवरे, सुखदेव भुसणर, संजय ननवरे, अमोल माने-देशमुख, पै. किरण कदम, तानाजी जगताप, उपसरपंच विनोद जाधव, अमोल देशमुख, विजय देशमुख उपस्थित होते.




### कृषी कन्यांकडून झिंजेवस्ती येथे मशरुम शेतीबाबत मार्गदर्शन

**पिलीव, दि. १८ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथे पाणीव येथील श्रीराम महाविदयालयाच्या कृषीकन्यांनी मशरुम शेतीबाबत प्रभावी माहीती व प्रत्यक्ष मशरूम उतपादनाचे प्रात्यक्षिक दाखविले. या सदरच्या उपक्रमात कृषीकन्या तृप्ती बनकर, श्रावणी भांबुरे, योगिता चोरमले, स्वरांजली एकतपुरे, संजना गोसावी, सलोनी कांबळे, भाग्यश्री सानप यांनी अगोदर महाविद्यालयात मशरुमच्या पिशव्या तयार करुन त्यावर यशस्वी उत्पादन घेतले आणी त्यानंतर त्याच मशरुमचे प्रात्यक्षिक गावातील शेतकऱ्यांनसमोर सादर केले. यामध्ये मशरूम शेती कशी करावी, लागवड पद्धती, हवामान व स्वच्छता, आर्थीक लाभ, बाजारपेठ उपलब्धता या मुददयावर माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. शेतकऱ्यांनी यामध्ये मोठ्या हिरीरीने भाग घेत माहीती जाणून घेतली. यासाठी श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, मार्गदर्शीका श्रीलेखा पाटील, उपाध्यक्ष करण पाटील, सचिव अभिषेक पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी प्रमोद झगडे,प्राचार्य डॉकटर एच. बी. हाके, उपप्राचार्य डॉकटर एस.डी. राऊत, रावी प्रमुख डॉकटर जबीन शेख, प्रा. संगणणा कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

### सिनेसृष्टीत नवतारकांना योग्य व्यासपीठ मिळवून देण्यासाठी स्क्रीनचा पुढाकार

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

इंडियन एक्सप्रेस ग्रुप आणि स्क्रीन या प्रकाशन संस्थेने बुधवारी स्क्रीन ॲकॅडमीची घोषणा केली आहे. व्यावसायिक प्रगतीसाठी या ॲकॅडमीची उभारणी होत नसल्याचे अकॅडमीच्यावतीने स्पष्ट करण्यात आले. नवोदित कलाकारांना योग्य व्यासपीठ देणे स्क्रीन अकॅडमीचे मुख्य उद्दिष्ट आहे.कान्स आणि ऑस्कर पुरस्कार विजेते गुनीत मोंगा, पायल कपाडिया, रेसुल पुकुट्टी तसेच ज्येष्ठ पटकथा लेखक अंजुम राजाबली आदी मान्यवर या स्क्रीन अकॅडमीचे सदस्य म्हणून काम पाहतील.लोढा फाऊंडेशनचे संस्थापक अभिषेक लोढा यांनी या अकॅडमीच्या उभारणीसाठी आर्थिक साहाय्य केले. स्क्रीन अकॅडमी नवोदित कलाकारांना चित्रपटाशी संबंधित मूलभूत शिक्षण देईल.अर्जप्रक्रियेचा तपशील www.screenacademy.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# रिटेवाडी सिंचन योजनेचे सर्वेक्षण करा; जलसंपदा मंत्र्यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**आ. नारायण पाटील यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १८ जुलै-**

करमाळा तालुक्यातील नियोजित रिटेवाडी उपसा सिंचन योजनेबाबत तात्काळ सर्वेक्षण करून पुढील कार्यवाही करण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सूचना दिल्या असल्याची माहिती आमदार नारायण पाटील यांनी दिली.

रिटेवाडी उपसा सिंचन योजना, दहिगाव उपसा सिंचन खोली वाढवणे व माढा तालुक्यातील सीना माढा उपसा सिंचन योजनेत कुर्डु, पिंपळखुटे, अंबाड गावाचा समावेश करण्यासंदर्भात जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या उपस्थितीत विधानभवन येथे बैठक घेण्यात आली.



> दहीगांव उपसा सिंचन योजनेची पाणी पातळी ४९० मीटर आहे. उजनी धरणाची पाणी पातळी कमी झाल्यानंतर दहिगाव उपचा सिंचन योजनेच्या पंपाला पाणी मिळत नाही. त्यामुळे या पाणी पातळीत वाढ करण्याची मागणी केली असून याला जलसंपदा मंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत आमसभेत ठराव घेण्यात आला होता. त्यानंतर आपण विधानसभेतही दहिगांव उपचा सिंचन योजनेची पाणी पातळी वाढवण्याबाबत विधानसभेत आपण प्रश्न उपस्थित केला आणि आजच्या बैठकीत जलसंपदा मंत्री यांनी ही पाणी पातळी वाढवण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिली आहेत.
>
> **-आमदार नारायण पाटील**

या बैठकीला आमदार अभिजीत पाटील, जलसंपदा विभाग सचिव दीपक कपूर यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. बैठकीला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद ऑनलाइन उपस्थित होते. याबाबत अधिक माहिती देताना आमदार पाटील यांनी सांगितले की, करमाळा तालुक्यातील रिटेवाडी उपसासिंचन योजनेला मंजुरी मिळावी याबाबत आपण पाठपुरावा करत असून याबाबत विधिमंडळात प्रश्न उपस्थित केला आहे. त्यानुसार जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली .या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना रिटेवाडी उपसा सिंचन योजनेबाबत तात्काळ सर्वेक्षण करून पुढील कार्यवाही करण्यासंदर्भात आदेश देण्यात आले आहेत. तसेच कुर्डू, पिंपळकुंटे या भागाला सीना माढा योजनेतून ओव्हर फ्लोचे पाणी देण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना जलसंपदा मंत्र्यांनी सूचना दिली आहेत.

## वाढदिनानिममित्त शालेय साहित्य वाटपासह विद्यार्थ्यांना दिले भोजन

**पिलीव येथे सचिन भैस यांनी साजरा केला 'हटके' वाढदिवस**



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१८ जुलै-**

पिलीव (ता.माळशिरस) येथील सचिन जयसिंग भैस यांनी येथील पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना वह्यासह स्कुलबॅगचे वाटप करून त्यांना जेवण देत अनोख्या पध्दतीने वाढदिवस साजरा केला.

श्री. भैस यांनी प्रथमच एक वेगळा पायंडा पाडत अनोख्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला. यातून त्यांनी समाजात एक नवीन आदर्श घालून दिला आहे. आपला वाढदिवस मोठ्या हॉटेलमध्ये मित्रांसह किंवा कुटुंबातील व्यक्तीसोबत साजरा न करता शाळेतील पाचवी ते दहावीतील सर्व विद्यार्थ्यांसह साजरा केला. या विद्यार्थ्यांना त्यांनी भोजनही दिले. तसेच वसतिगृहात राहणाऱ्या बावीस विदयार्थना प्रत्येकी एक डझन वहया व स्कूल बॅग देऊन अतिशय अनोख्या पद्धतीने श्री. भैस यांनी आपला वाढदिवस साजरा करीत समाजापुढे एक आदर्श घालुन दिला आहे.. वाढदिवसानिमित्त वायपट खर्च न करता शाळेतील विद्यार्थ्यांसोबत वाढदिवस साजरा करुन समाजापुढे अनोखा आदर्श ठेवला आहे. यावेळी विद्यालयातील पाचवी ते दहावीचे विद्यार्थी, पर्यवेक्षक किरगत, शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक अशोक बागल यांनी श्री.भैस यांना वाढदिवसानिमीत्त शुभेच्छा देताना भैस यांनी आपला वाढदिवस शाळेच्या विद्यार्थ्यांसमवेत साजरा करताना समाजापुढे एक आदर्श घालुन दिला आहे. इतरांनीही सचिनचा आदर्श घेण्याचे आवाहन केले.

## बार्शी न्यायालयात 'राष्ट्रांसाठी मध्यस्थी' मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ जुलै-**

सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरण, मध्यस्थ आणि सामजस्य प्रकल्प समिती, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण व उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशाने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधीसेवा प्राधिकरण अध्यक्ष मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाने एम. पी. शिंदे यांच्या सहकार्याने बार्शी तालुका न्यायालयात 'राष्ट्रांसाठी मध्यस्थी' ही विशेष मध्यस्थी मोहिम १ जुलैपासून पुढील ९० दिवसांसाठी राबविण्यात येत आहे, अशी माहिती तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी दिली.

तालुका न्यायालय बार्शी येथे 'राष्ट्रांसाठी मध्यस्थी' ही विशेष मध्यस्थी मोहीम सर्वोच्च न्यायालय व राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरण, नवी दिल्लीमार्फत राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गतबार्शीयेथीलन्यायालयातील प्रलंबित प्रकरणे, तडजोडपात्र प्रकरणे विशेष मध्यस्थी मोहिमेद्वारे निकाली काढण्यात येणार आहे. तसेच या मोहिमेअंतर्गत न्यायालयातील प्रलंबित असलेली तडजोड पात्र प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार आहेत. तालुका न्यायालय बार्शी येथील ज्या पक्षकारांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत व ती प्रकरणे मध्यस्थी अंतर्गत तडजोडीने मिटावीत अशी ज्यांची इच्छा आहे अशा पक्षकारांची प्रकरणे या विशेष मध्यस्थी मोहिमेअंतर्गत तडजोडीने निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत. यात संबंधित पक्षकार प्रत्यक्ष अथवा आभासी पध्दतीने यात सहभागी होऊ शकतात. न्यायालयामध्ये बरेच खटले प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे 'राष्ट्रांसाठी मध्यस्थी' या मध्यस्थी मोहिमेच्या माध्यमातून तडजोडीने मिटविता येतील. त्यामुळे पैसा, श्रम आणि वेळेचीही बचत होते. मध्यस्थी मोहिमेच्या माध्यमातून सुलभ, जलद न्याय मिळतो. तडजोडीसाठी पक्षकार यांनी तालुका विधी सेवा समिती येथे संपर्क साधावा, असे आवाहन तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष व्ही. के. मांडे यांनी केले आहे.

### अरळी येथे एका शेतकऱ्याने गळफास घेवून केली आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १८ जुलै**

अरळी येथे एका ४८ वर्षीय शेतकर्याने शेतातील आंब्याच्या झाडाला नॉयलॉनच्या दोरीने गळफास घेवून आत्महत्या करण्याचा प्रकार घडला असून या घटनेची मंगळवेढा पोलीसात अकस्मात मयत अशी नोंद झाली आहे. पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी,दि.१४ जुलै रोजी सकाळी ९.२० पुर्वी यातील मयत यशवंत चंद्राम सोनलकर (वय ४८) याने आपल्या स्वत:च्या शेतामधील आंब्याच्या झाडाला अज्ञात कारणावरुन गळफास घेवून आत्महत्या केली. वाटेत खबर देणारे म्हाळाप्पा पांढरे यांची मावशी पार्वती हि जोर जोरात रडत येवून सांगितले की, भाऊ यशवंत याने शेतात आंब्याच्या झाडाला गळफास घेतला आहे. तद्नंतर ही घटना उघडकीस आली. याचा अधिक तपास पोलीस हवालदार नवले हे करीत आहेत.

## ढोराळे सरपंचपदी माधुरी शिंदे



**एकाच पॅनेलचे सर्व सदस्य असतानाही गटबाजी**

**सोलापूर, दि.१८ जुलै-**

ढोराळे (ता. बार्शी) ग्राम पंचायतीच्या सरपंचपदी माधुरी नंदकुमार शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीने शिंदे या येथील तिसऱ्या सरपंच ठरल्या आहेत.

सोमवारी गणपूर्तीच्या कारणामुळे तहकूब करण्यात आलेली सरपंच नविडीची सभा मंगळवारी दवाखान्यात ॲडमिट असलेला ग्रामपंचायत सदस्य उपस्थित राहिल्यानंतर सुरळीत पार पडली. येथील ग्रामपंचायतमध्ये एकूण सात सदस्य आहेत. मंगळवारी झालेल्या निवड प्रक्रियेत राहुल खरात, अमोल जाधव, मालन चवरे, सुरेखा बनसोडे आणि माधुरी शिंदे हे पाच सदस्य उपस्थित होते. तर दोन सदस्य अनुपस्थित होते. यावेळी सरपंच पदासाठी शीतल जाधव व माधुरी शिंदे यांचे अर्ज सादर झाले. शिंदे यांना चार सदस्यांनी हात उंचावून संमती दिली. या ग्रामपंचायतीवर माजी आमदार राजेंद्र राऊत गटाची सत्ता आहे. सातही सदस्य एकाच गटाचे आहेत. मात्र अंतर्गत मतभेद असल्याने निवडणूक घ्यावी लागली. माजी सरपंच दीपक देशमुख यांनी राजीनामा दिल्यामुळे सरपंचपद रिक्त होते. त्यासाठी सोमवारी ढोराळे ग्राम पंचायत कार्यालयात निवड प्रक्रिया ठेवण्यात आली होती. मात्र पाच पैकी राहुल खरात वैद्यकीय उपचारासाठी दवाखान्यात दाखल होते. त्यामुळे पुरेशी गणपूर्ती होऊ शकली नाही. परिणामी ही निवड प्रक्रिया तात्पुरती रद्द करण्यात आली होती.त्यानंतर दुसऱ्या दिवशी मंगळवारी निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी निवडणूक प्रक्रियेसाठी निरीक्षक म्हणून नायब तहसीलदार संजीवन मुंडे, अध्यासी अधिकारी शरद शिंदे, तलाठी रमाकांत देशमुख, ग्रामसेवक मानसिंग जाधव यांनी काम पाहिले.

## बार्शीत आतापर्यंत १३२.३८ टक्के खरीप पेरणी पूर्ण

**यंदा ही सोयाबीनचाच बोलबाला**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ जुलै-**



यंदाच्या खरीप हंगामात बार्शी तालुक्यात कृषी खात्याच्या साप्ताहिक पेरणी अहवालानुसार आतापर्यंत ९६८७३ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. सरासरी क्षेत्र ७३१७७ हेक्टर असून एकूण पेरणीचे प्रमाण १३२.३८ टक्क्यांवर पोहोचले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले म्हणाले यंदा उडीद ८४४२ हे (१११.१४%), सोयाबीन ८४३५८ (१४९.३८%), मुग ३६९ (२९.०७%), मका १८९ (५२.४४%), तूर ३४९९ (४७.७१%), खरीप ज्वारी व बाजरीसारख्या पिकांची पेरणी मात्र अद्याप झालेली नाही. सोयाबीन, उडीद आणि मुग या कडधान्य पिकांची पेरणी लक्षणीय असून सोयाबीन सर्वाधिक म्हणजे ८४३५८ हेक्टरवर पेरणी झाली आहे. त्याखालोखाल उडीद ८४४२.हेक्टर, तर तूर ३४९९ हेक्टरवर पेरण्यात आले आहे. यंदा वेळेच्या अगोदर पाऊस पडल्याने पेरण्या योग्य वेळी झाल्या. मात्र नंतर पावसाने खंड दिला होता. आता पुन्हा पाऊस पडण्यास सुरुवात झाली आहे. पावसाच्या नियमितते नुसार पीक वाढ आणि उत्पादनावर परिणाम होणार आहे.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकरिता राज्यस्तरीय स्पर्धा

**५ लाखांचे प्रथम पारितोषिक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जुलै-**

राज्य शासनाच्या पु.ल. देशपांडे कला अकादमी, सांस्कृतिक कार्यविभाग, यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशात्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. स्पर्धेचा अर्ज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पार्टलव्दारेच दि.२० जुलै पासून दि. २० ऑगस्टपर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत.

सदर स्पर्धा नि:शुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतिचे जतन व संवर्धन याकरीता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे याविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्य, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेश भक्तांसाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या



कार्याचा गौरव व्हावा आणि असेच सामाजाभिमुख उपक्रम अधिकाअधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

२७ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या गणेशात्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे चार जिल्हे प्रत्येकी ३ आणि ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार ४४ शिफारसी राज्यस्तरीय परिक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपपल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील.

राज्स्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख, १ लाख, रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना रू. २५ हजार रू. पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाअधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

### उत्तर सोलापूरच्या काँग्रेस कमिटी अध्यक्षपदी भारत जाधव

**सोलापूर, दि. १८ जुलै-**



तिऱ्हे (ता.उत्तर सोलापूर) येथील भारत जाधव यांची काँग्रेसच्या उत्तर सोलापूर तालुका अध्यक्षपदी निवड झाली आहे. कळमण (ता.उत्तर सोलापूर) येथील गाव भेटीवेळी तालुकाध्यक्ष नेमण्याची मागणी खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे कार्यकर्त्यांनी केली. त्यावेळी त्यांनी भारत जाधव यांची तालुका अध्यक्षपदी निवड जाहीर केली व लवकरच त्यांना नियुक्तीचे पत्र देण्यात येईल असे सांगितले.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड,
परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सिद्धेश्वर गुंड आत्महत्या प्रकरणी तिघांना अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै -**

अनगर (ता. मोहोळ) येथील सिद्धेश्वर सत्यवान गुंड (वय ३५) यांचे आत्महत्येप्रकरणी दत्तात्रय नागनाथ गुंड (वय ३०), गजानन नागनाथ गुंड (वय ३०, रा. भोसे, ता. पंढरपूर) व सौ. आर. डी डोके (रा. सोलापूर) यांना सोलापूर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश जयदिप मोहिते यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला.



१६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९ च्या सुमारास सिद्धेश्वर गुंड यांनी शेतातील जांभळाचे झाडास गळफास घेवून आत्महत्या केली. त्याबाबत त्यांचे सासरे एस. एस. सालगुडे यांनी मयत सिद्धेश्वर गुंड यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी त्यांचे सख्खे चुलत भाऊ व भावकीतील एकूण १३ व्यक्तींविरोधात मोहोळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. मोहोळ पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यात अटक होईल म्हणून मयताचे चुलत भाऊ दत्तात्रय गुंड, गजानन गुंड व बहीण आर डी डोके यांनी सत्र न्यालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. त्याची सुनावणी होऊन आरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद विचारात घेऊन न्यालयाने तीनही आरोपीस अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला. सदर प्रकरणात सरकारपक्षातर्फे ॲड. एस. एस. क्यातम यांनी तर तीनही आरोपीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. देवदत्त बोरगावकर, ॲड. प्रसाद अग्निहोत्री, ॲड. आदित्य आदोने यांनी काम पाहिले.

### महत्वाचे...



## माळशिरस तालुका वृत्तपत्र संघटनेच्या अध्यक्षपदी कुलकर्णी

**अकलूज, दि. १८ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांच्या घेण्यात आलेल्या बैठकीत अध्यक्ष म्हणून सर्वानुमते आण्णा कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. दि. १६ जुलै रोजी धुमाळ पेपर स्टोल अकलूज येथे माळशिरस तालुक्यातील सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत माळशिरस तालुक्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांची सद्य स्थिती, व्यवसायात येणाऱ्या अडचणी, विक्रेत्यांचे आरोग्य, आर्थिक स्थिती व इतर अनेक गोष्टीवर चर्चा करण्यात आली. वृत्तपत्र विक्रेत्यांच्या उन्नतीसाठी सर्वांनी एकत्र यावे. त्यासाठी जेष्ठाच्या सल्यानुसार काम काज व्हावे या विचाराने संघटनेच्या अध्यक्षपदी जेष्ठ वृत्तपत्र विक्रेते आण्णा कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. संघटनेचे पुढील प्रमाणे पदाधिकारी निवडण्यात आले. तात्या सपकाळ (सल्लागार), सचिन धुमाळ (उपाध्यक्ष), सूर्यकांत भिसे (कायदेशीर सल्लागार), अमोल राऊत (सचिव) तर संघटनेच्या सदस्यपदी बाळासो यादव, अजितकुमार देशपांडे, संजय रोकडे, कुमार कुलकर्णी, मारुती सातपुते, जावेद पठाण, सागर पोटे, सुनील रणवरे, रमजान तांबोळी, सुधाकर कुलकर्णी, चव्हाण, रुपेश गांधी, केशव कुंभार, रणजित भोसले अशी कार्यकारणी निवडण्यात आली.

## अज्ञात कारणावरुन तरुणाची गळफास घेवून आत्महत्या

**मंगळवेढा दि. १८ जुलै-**

सलगर बु।। येथे अज्ञात कारणावरुन राहते घरी पत्र्याच्या अँगलला दोरीने गळफास घेवून एका ३६ वर्षीय तरुणाने आत्महत्या केली असून पापण्णा बिराजदार असे त्या तरुणाचे नाव आहे. दरम्यान या घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील मयत पापण्णा बिराजदार याने दि.१४ जुलै रोजी सकाळी ११.३० च्या पुर्वी सलगर येथील राहते घरी अज्ञात कारणावरुन पत्र्याच्या अँगलला पांढऱ्या रंगाच्या दाव्याने गळफास घेवून जीवनाचा शेवट केला असल्याची खबर मलाप्पा बिराजदार याने पोलीसात दिल्यानंतर अकस्मात मयत अशी नोंद झाली असून याचा अधिक तपास पोलीस हवालदार काळे हे करीत आहेत.



## जि.प. शाळा भिमनगर येथे एक पेड माँ के नाम उपक्रम

**सांगोला, दि. १८ जुलै-**

सांगोला शहरातील जि. प. प्राथमिक शाळा भिमनगर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृती दिनानिमित्त एक पेड माँ के नाम उपक्रम साजरा करण्यात आला. याप्रसंगी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बापूसाहेब ठोकळे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याविषयी माहिती दिली. तसेच एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत झाडांचे महत्त्व, झाडांची गरज याविषयी मार्गदर्शन केले. वन विभाग सांगोला यांनी वृक्ष उपलब्ध करुन दिले. वनविभागाच्या वनिता इंगवले यांच्या हस्ते शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कोमल बनसोडे, दामोदर साठे, विकास बनसोडे, डॉ. अक्षय कांबळे, भारत आठवले, बाबासाहेब बनसोडे, जयंती बनसोडे, लक्ष्मी बनसोडे, सहशिक्षिका मैना गायकवाड, मुख्याध्यापिका वैशाली शेळके उपस्थित होते.

## मैंदर्गी नगर पालिका स्वच्छ भारत सर्वेक्षण अभियानात यश

**मैंदर्गी, दि. १८ जुलै-**



नगरपालिका स्वच्छ भारत अभियान सर्वेक्षणात गतवर्षी पेक्षा कामगिरी सुधारणा झाली आहे. स्वच्छ भारत अभियान २०२४-२५ मधील कार्मागिरीचा निकाल लागला आहे मैंदर्गी नगर परिषदेला ऑडिओ प्लस प्लस व जीएफसी स्टार एक दर्जा प्राप्त झाला आहे नगरपालिका: गेल्या वर्षीपेक्षा चांगला कामगिरी झाली आहे २० हजार पेक्षा कमी लोकसंख्या गटामध्ये मैंदर्गी नगर पालिकेने राज्यात १६३ शहरापैकी ८१ क्रमांक व देशात २०३५ शहारामध्ये २४४ क्रमांक मिळविला आहे मैंदर्गी शहर हे हागणदारी मुक्त शहर मानांकनांत ओडीएफ + + व कचरामुक्त शहर मानांकनात एक स्टार दर्जा प्राप्त केल्याची माहिती नगर पालिका प्रशासक तथा मुख्याधिकारी अर्जुन सुरवसे यांनी दिली आहे या यशामुळे मुखाधिकारी सुरवसे यांनी नगरपालिका सर्व कर्मचाऱ्याचे अभिनंदन केले आहे.

## अकलूज बाजार समितीत डाळिंबाला उच्चांकी दर

- प्रति किलो 301 रूपयांचा मिळाला भाव

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१८ जुलै-**

सहकार पंढरी अशी ओळख असलेल्या अकलूज बाजार समितीमध्ये डाळींबाला ३०१ रुपये प्रति किलो उच्चांकी दर मिळाल्याने अकलूज आता डाळींब पंढरी च्या रूपाने पुढे येत आहे.

अकलूज बाजार समितीमध्ये सिध्दीविनायक फ्रुट कंपनीचा सागर नागणे यांचा आडत दुकानी दत्तात्रय पाटील (रा. फोंडशिरस) या शेतकऱ्याच्या भगवा जातीच्या डाळींबाला प्रतिकिलो ३०१ रूपयांचा दर मिळाला तसेच बालाजी फ्रुट कंपनी चालक अमोल जाधव यांच्या आडत दुकानी शेतकरी युवराज मारकड (रा. मारकडवाडी) यांच्या भगवा जातीच्या डाळींबाला प्रतिकिलो ३०१ रुपयांचा दर मिळाला. जय अंबे फ्रुट कंपनी चालक मनोज जाधव यांच्या आडत दुकानी तुकाराम पावले तसेच मोहम्मद साद फ्रुट कंपनी चालक राजूभाई बागवान यांच्या आडत दुकानी अंकुशराव केचे यांच्या भगवा जातीच्या डाळींबाला प्रतिकिलो ३०१ रुपयांचा दर मिळाला. तसेच शेतकरी गणेश लवटे (रा. फोंडशिरस) यांच्या डाळींबाला गेले आठ दिवस दररोज प्रतिकिलो २५० रुपयांच्या दराने डाळींबीची विक्री होत आहे. सौदे बाजाराच्या वेळी सर्व आडते, खरेदीदार व शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. डाळींब पूर्व सिझन सुरु होत असताना चांगल्या दरामुळे शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे. अकलूज बाजारपेठ मध्यवर्ती असल्याने इंदापूर, माढा, माण, खटाव, फलटण येथून शेतकरी डाळींब विक्रीसाठी अकलूज बाजार समितीकडे आणत आहेत. बाजार समितीमध्ये शेतमालाची योग्य प्रतवारी, मापाडी तोलार यांच्याकडून चोख वजन ,शेतमालाची रोख पट्टी या गोष्टीमुळे अकलूज बाजार समितीचे नाव झाले आहे. बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार पेठेमध्ये सुक्ष्म नियोजन व पायाभूत सुविधा यामुळे बाजार घटक समाधानी आहेत.



## आमदार कल्याणशेट्टींचा माथाडी कामगारांकडून सत्कार

- नरेंद्र पाटील यांची उपस्थिती
- नवी मुंबईतील भाजीपाला मार्केटमध्ये झाला कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जुलै-**

श्री स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट, माथाडी कामगार आणि अक्कलकोट रहिवासी वर्ग यांच्या वतीने नवी मुंबईतील भाजीपाला मार्केट येथे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्या उपस्थितीत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी झालेल्या संवाद कार्यक्रमाच्या माध्यमातून माथाडी कामगारांच्या अडचणी व त्यांच्या गरजा जाणून घेत आमदार कल्याणशेट्टी यांनी माथाडी कामगार बांधवांच्या हक्कांसाठी कायम तुमच्या सोबत असल्याचा विश्वास व्यक्त केला. यासोबतच, कामगारांच्या हितासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमास माथाडी संघटनेचे संयुक्त सरचिटणीस रविकांत पाटील, बाजार समिती संचालक शंकर पिंगळे, आयोजक आणि स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अशोक बिराजदार, पंडित सोडगी, आनंद पाटील, लक्ष्मीपुत्र बिराजदार, राजकुमार जमादार, सिद्धाराम संगपाळ, लिंगायत महासंघाचे प्रा. नीलकंठ बीजलगावकर व इतर व्यापारी आणि कामगार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मंगळवेढा भूमीअभिलेख कार्यालयास

## पूर्णवेळ अधिकारी मिळत नसल्याने शेतकऱ्यांची कामे रेंगाळली

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १८ जुलै-**

मंगळवेढा भूमीअभिलेख कार्यालयातील भूमी अधिक्षक राजू तळपे हे सेवानिवृत्त झाल्यापासून आजतागायत या कार्यालयास पुर्णवेळ अधिकारी न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची अनेक कामे रेंगाळत पडल्याने या कार्यालयाबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

तत्कालीन भूमी अधिक्षक राजू तळपे हे ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाल्यापासून येथील कार्यालयास पुर्णवेळ अधिकारी मिळालेच नाहीत. मागील आठवड्यात शासनाने भूमी अभिलेख कार्यालयातील वरिष्ठ अधिकार्यांची बदली केल्याने अक्कलकोट येथील भूमी अधिक्षक शैलेंद्र शिंगणे यांच्या नियुक्तीचा आदेश मंगळवेढा कार्यालयास येवून धडकला आहे. मात्र या अधिकाऱ्यांची मंगळवेढ्यास येण्यास मानसिकता नसल्याने शेतकऱ्याची शेतजमीन मोजणी तसेच प्लॉट मोजणी आदी महत्वाची कामे रेंगाळत पडली आहेत. यापुर्वी महिनाभर कर्मचार्यांनी संप पुकारल्यामुळे परिणामी कार्यालयीन कामकाज होवू शकले नाही. गेली दोन महिने या कार्यालयातील काम काजाचे ऐशी तैशीच सुरु आहे. शेतकरी मात्र कामाच्या आशेपोटी कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. तळपे यांच्या बदलीनंतर सोलापूरनगर भूमापन येथील गजानन पोळ यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार मंगळवेढ्याचा देण्यात आला असून ते आठवड्यातून केवळ तेथील कामकाज पाहून मंगळवारी येथे येत असल्याने कामाचा ढिगारा हटता हटेना असल्याचे चित्र आहे. दरम्यान गुरुवार दि.१७ रोजी सोलापूर जिल्हा भूमी अधिक्षक दादासो घोडके यांनी मंगळवेढा कार्यालयास भेट दिल्यावर प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, सोमवारपर्यंत येथे पूर्णवेळ अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल असे, आश्वासन दिल्याने येथील नागरिक त्या अधिकार्याच्या प्रतिक्षेत आहेत.

## बीबीदारफळ येथे आजाराला कंटाळून तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

आजाराने त्रस्त असलेल्या तरुणाने राहत्या घरात छताच्या अँगलला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ गावात पहाटे चारच्या सुमारास उघडकीस आली. रोहित सुरेश बारसकर (वय ३३, रा. बीबी दारफळ ता. उ. सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. रोहित हा अनेक दिवसांपासून आजाराने त्रस्त झाला होता. उपचार करूनही त्यातून दिलासा मिळत नसल्याने तो मानसिक तणावाखाली होता. शुक्रवारी पहाटे चारच्या सुमारास त्याने राहत्या घराच्या छताच्या अँगलला दोरीने गळफास घेतला. ही बाब माहिती होताच नातेवाईकांनी त्यास गळफासातून सोडविले. त्यानंतर सकाळी ७.५० वाजता भाऊ राहुल याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## गौडगाव येथील शिबिरात ४८८ रुग्णांची तपासणी

- ग्रामपंचायत आणि नर्गिस दत्त कॅन्सर हॉस्पिटलचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१८ जुलै-**

गौडगाव (ता. बार्शी) येथे ग्रामपंचायत व बार्शीच्या नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलच्यावतीने झालेल्या आरोग्य शिबिरात ४८८ जणांची तपासणी करण्यात आली. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या या शिबिरात ११७ जणांची कॅन्सरची तपासणी करण्यात आली.



शिबिराचे उदघाटन सरपंच वैशाली पैकेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी सदस्य धनश्री गरड, नागेश काजळे, ग्रामपंचायत अधिकारी औदुंबर कराड, विनोद सोनवणे, अंगणवाडी सेविका आशा स्वयंसेविका, आशा गटप्रवर्तक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आरोग्य तपासणी केली. या शिबिरासाठी नर्गिस दत्त कॅन्सर हॉस्पिटलचे डॉ. अपर्णा सरोदे, कविता गोहने, अलका चव्हाण यांच्यासह समन्वयक रवी रत्नपारखे, त्वचारोग तज्ञ डॉ. मोनिका केदार, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी रणजित पाटील यांनी रुग्णांची तपासणी केली. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेविका रहनाबी शेख, एस. एच. पाटील, ज्योती जमदाडे, सी. एच. चव्हाण, आरोग्य सहाय्यिका सानप अरबी, एल. टी. लिखे, औषध निर्माता अधिकारी एस. ए. महाडिक यांनी परिश्रम घेतले.यावेळी सिमर असलेले ८८ रुग्ण मिळाले. एका रुग्णाची बायएप्सी करण्यात आली. त्वचारोगाचे ९४ रूग्ण मिळाले. जनरल फिजिशियनकडून २८७ रुग्णांची तपासणी झाली.

## साडीने गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

घराच्या लाकडी वाशाला साडीने गळफास लावून घेऊन तरुणाने आत्महतया केली. ही घटना लिमयेवाडी परिसरातील सनद नगरात गुरुवारी रात्री ११.३० च्या सुमारास उघडकीस आली. शंकर हणमंतु गायकवाड (वय ३५, रा. सनद नगर) असे तरुणाचे नाव आहे. शंकरने सनद नगरातील राहत्या घराच्या लाकडी वाशाला साडीने गळफास घेतला. नातेवाईकांनी त्याला गळफासातून सोडवून पोलीस नाईक चौधरी यांनी बेशुध्दावस्थेत शुक्रवारी रात्री १२.४५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## गोल्डन सीताफळ चर्चासत्रात २०० शेतकऱ्यांची उपस्थिती

- युवा किसान शेतकरी उत्पादक कंपनीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.१८ जुलै-**

निमगाव केतकी (ता. इंदापूर) येथे दि. १६ जुलै रोजी युवा किसान शेतकरी उत्पादक कंपनीच्यावतीने 'गोल्डन सीताफळ चर्चासत्र हंगाम २०२५' चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेतला.




मागील वर्षी मधुबन नर्सरी, बार्शी येथे झालेल्या चर्चासत्राला मिळालेल्या प्रतिसादानंतर शेतकऱ्यांच्या मागणीनुसार यंदाही असेच चर्चासत्र घेण्याचा निर्णय कंपनीने घेतला. या चर्चासत्रात NMK गोल्डन सीताफळाचे जनक नवनाथ कसपटे, युवा किसान कंपनीचे संचालक सोमनाथ जुगदर, विशाल टाके, श्रीकांत कोठावळे तसेच रिलायन्स फ्रेशचे अधिकारी दत्तात्रय मोरे आणि के. पी.एन. फ्रेशचे गोरक्षनाथ जंबुकर यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन कंपनीचे संचालक सोमनाथ जुगदर यांनी केले. कसपटे यांनी सीताफळ बागेतील फलधारणा, फळमाशी नियंत्रण आणि अळी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती दिली. त्यांनी कामगंध सापळे, जेलचा वापर, व आठवड्याला पालटून कीडनाशकांची फवारणी याबरोबरच फळ कव्हर/बॅगिंग ही सर्वाधिक प्रभावी पद्धत असल्याचे नमूद केले. श्रीकांत कोठावळे यांनी फळमाशीच्या भीतीने बागा काढून टाकणाऱ्या शेतकऱ्यांना आवाहन केले की, समस्या टाळण्याऐवजी त्यावर उपाय शोधावेत. सीताफळ पिशवीत कव्हर करणाऱ्या शेतकऱ्यांना बाजारपेठेतील सरासरी दरांपेक्षा जास्त दराने खरेदी करण्याची हमीही त्यांनी दिली. कार्यक्रमात विशाल टाके यांनी कंपनीच्या संकलन केंद्रांची माहिती दिली. तर रिलायन्स फ्रेश व के. पी.एन. फ्रेश या कंपन्यांचे प्रतिनिधींनी त्यांच्या कार्यपद्धतीचे विवेचन केले. मागील वर्षी पिशवीचा वापर करुन चांगले उत्पादन व दर मिळवलेल्या शेतकऱ्यांनी आपले अनुभवही शेअर केले. कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या शेतकऱ्यांना येणाऱ्या हंगामासाठी योग्य दिशा व स्पष्ट नियोजन मिळाले.

## जनसेवा संघटनेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे उद्या प्रशिक्षण

**अकलूज, दि. १८ जुलै-**

महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांसाठी रविवार दि.२० जुलै रोजी प्रशिक्षणाचे आयोजन केले असून त्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थीत राहावे असे आवाहन संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ धवलसिंह मोहिते-पाटील यांनी केले आहे. महाराष्ट्र जनसेवा संघटनेची नुकतीच पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाच्या तसेच प्रत्येक नगर पंचायत,नगर परिषदांतील प्रभाग प्रमुखांच्या नियुक्त्या केल्या आहेत.याशिवाय एक मुख्य व प्रत्येक तालुक्या साठी एक गव्हरनींग कमिटी अशा नियुक्त्या केल्या आहेत. या सर्वांसाठी रविवार दिनांक २० जुलै रोजी सकाळी १० ते १ या वेळेत प्रतापगड धवलनगर येथे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.

